नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर – ४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १९७ * * नागपूर * शनिवार, दिनांक १८ ऑक्टोबर २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## ऑनलाइन जुगार : सुप्रिम कोर्टाची केंद्राला नोटीस

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १७ :
ऑनलाइन जुगार आणि बेटिंग प्लॅटफॉर्मवर बंदी घालण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी केली आणि केंद्र सरकारला नोटीस बजावली.

न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि के.व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने म्हटले की, हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. सरकारी वकिलाला याचिकेची प्रत द्या. ते त्यात लक्ष घालतील आणि पुढील सुनावणीत आम्हाला मदत करतील. शौर्य तिवारी व एका संघटनेने ही जनहित याचिका दाखल करीत ऑनलाइन जुगार आणि बेटिंग ॲप्सवर कठोर कारवाई करण्याची सरकारला विनंती केली आहे.

अग्रलेख

## खरीखरी..

## दोन ध्रुव जुळले

२००६ सालापासून राज ठाकरे यांनी शिवसेनेतून बाहेर पडून नवा मार्ग शोधण्यास सुरुवात केली. प्रबोधनकार ठाकरे यांचे दोन पुत्र बाळासाहेब आणि श्रीकांत हे आयुष्यभर एकमेकांना पूरकच ठरले. त्या काळात मार्मिकचे आधारस्तंभ हे दोन भाऊच होते बाळासाहेबांची व्यंगचित्रे आणि श्रीकांतजींचे सिने प्रिक्षान तुफान लोकप्रिय ठरले होते. १९६६ सालामध्ये प्रबोधनकार ठाकरे यांच्या आशीर्वादाने बाळासाहेब ठाकरे यांनी मोठ्या दिमाखात शिवसेनेची स्थापना केली. श्रीकांतजी मात्र मार्मिकचे प्रकाशन आणि इतर कलाकृतीमध्ये मग्न होते. त्यानंतर बाळासाहेबांच्या तिन्ही मुलांपैकी राजकारणात आले ते उद्धवजी आणि तेही फार उशीरा आले. तत्पूर्वी शिवसेनेची दुसरी बाजू म्हणजे विद्यार्थी चळवळीतले राज ठाकरे होते. बाळासाहेबांसारखी ठाकरी भाषा, रोखठोक शैली आणि मराठीचा प्रखर अभिमान यामुळे बाळासाहेबांची गादी राज ठाकरे सांभाळतील असे बोलले जात होते. बाळासाहेबांच्या तिन्ही पुत्रांपैकी केवळ उद्धवजींनाच राजकारणात थोडाफार रस होता. ते शिवसेनेत सक्रिय झाले त्यानंतर बरीच वर्षे हे दोघे बंधू शिवसेनेचे कर्णधार म्हणून पुढे आले. मात्र काही वर्षानंतर एका मेळाव्यामध्ये बाळासाहेबांनी शिवसेनेचा व्याप उद्धवजी सांभाळतील असे राज साहेबांच्या समोरच घोषित केले. हा ठराव कसा झाला ते आम्हाला माहीत नाही. मात्र आता एका म्यानामध्ये दोन तलवारी कशा राहतील आणि मग राज साहेबांनी काही महिन्यानंतर बराच विचार करून महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्थापन केली. राज साहेबांची तडाखेदार भाषणे, जन आंदोलने आणि जनतेच्या मनातील प्रश्नांना वाचा फोडणारे राजकारण त्या काळामध्ये लोकप्रियतेच्या कळसावर होते. पहिल्या झटक्यातच पक्ष स्थापनेनंतर १३ आमदार निवडून आणणे. त्यानंतर नाशिक महापालिका आणि इतर अनेक ठिकाणी मनसेचा चांगलाच बोलबाला होता. पण पुढील काही वर्षामध्ये या लोकप्रियतेला माणसे भाषण ऐकायला जमली तरी फळे मिळत नव्हती. विधानसभेत एखादा आमदार आणि महापालिकेत निवडून येणारे काही नगरसेवक अशी स्थिती झाली होती. तरीही त्यावेळी राज साहेबांची मुलुखमैदानी तोफ जी धडधडत होती ती आजपर्यंत लोकप्रिय आहेच. २०१९ सालाच्या निवडणुकीमध्ये शिवसेनेच्या मदतीशिवाय भारतीय जनता पक्षाला पर्याय नव्हता पण तेव्हा काही जमले नाही आणि त्यानंतर उद्धवराव मुख्यमंत्री झाले. त्यांना दोन्ही काँग्रेसची साथ मिळाली आणि मग नवा अध्याय सुरु झाला. मुख्यमंत्र्यांकडून कोरोनामध्ये उत्तम काम झाले पण तो कोरोना खुद्द शिवसेनेलाच वाळवीप्रमाणे बाधित करू लागला, शिवसेनेतील बहुसंख्य आमदार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेला सोडून बाहेर पडले आणि त्यानंतर आपलीच शिवसेना खरी आहे असे त्यांनी म्हणजे शिंदे यांनी न्यायालयाकडून मंजूर करून घेतले. तोच प्रयोग शरद पवार साहेबांच्या राष्ट्रवादीचाही झाला. त्यानंतर उद्धवरावांच्या पक्ष फुटवेगिरीला मोठाच धक्का बसला. लोकसभेत उद्धवरावांची चांगली कामगिरी झाली पण त्याआधी, कधीच राज साहेब आणि उद्धवराव यांना दोघांना एकत्र येऊनही सत्तेचे गणित सोडवता आले नाही. मूळ शिवसेना पक्ष आणि त्यांचे नेते ठाकरे हे जनतेच्या मनात असले तरी खरी शिवसेना पक्ष आणि चिन्ह एकनाथ शिंदे यांचेच आहे. यामुळेच गेल्या अनेक दिवसांपासून हे दोन भाऊ एकत्र येणार, एकत्र येणार अशा वावड्या उठत होत्या. पण आज ते एकत्र आले आणि संयुक्त ठाकरे परिवाराची दिवाळी शिवतीर्थावर साजरी झाली. आता या दोन कुटुंबांच्या दीपावली मिलनानंतर सत्तेची समीकरणे विशेषता मुंबई मनपाची सूत्रे ताब्यात घेण्यासाठी आणि आगामी राजकारणाच्या देवघेवीसाठी हे दोन्ही बंधू एकत्र आलेले आहेत. आज आपल्या मावशीच्या घरी आपल्या काकांचे दर्शन घेण्यासाठी उद्धवराव आले आणि 'दोन ध्रुवांवर असलेले दोन्ही बंधू एकमेकांच्या प्रेमबंधनात' अडकले. हे बंधन आयुष्यभर असेच टिकून राहो आणि दोन्ही भावांना चांगलेच दिवस येवोत. अशी आमची मनापासून शुभेच्छा आहे, बाकी जय महाराष्ट्र!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023



# स्वदेशी तेजसची झेप!

### संरक्षण मंत्री राजनाथ सिंहांनी केले पहिल्या उत्पादन युनिटचे उद्घाटन : वर्षाला ८ तेजसची होणार निर्मिती

■ वृत्तसंस्था, नाशिक, दि. १७ :
भारतीय हवाई दलाला मार्क १ ए लढाऊ विमानांचा पुरवठा जलदगतीने करण्यासाठी, हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडने महाराष्ट्रातील नाशिक येथे तिसरी उत्पादन लाइन सुरू केली आहे.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी शुक्रवारी या लाइनचे उद्घाटन केले. नाशिकमधील ओझर येथील सुविधेत तयार केलेल्या पहिल्या हलक्या लढाऊ विमानाने शुक्रवारी पहिले उड्डाण केले.

या उत्पादन लाइनमुळे २०३२-३३ पर्यंत हवाई दलाला १८० तेजस विमाने मिळण्यास मदत होईल. सध्या येथे आठ लढाऊ विमाने तयार केली जात आहेत, जी १० पर्यंत वाढवता येतील. हवाई दलासाठी तेजस विमान तयार करणाऱ्या एचएएलला गत सप्टेंबर महिन्यातच चौथे इंजिन पाठवले होते. या लढाऊ विमानाचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या पंखांमध्ये नऊ क्षेपणास्त्र माउंट्स बसवले आहेत.

प्रत्येक तेजस मार्क १ ए ची सरासरी किंमत ६०० कोटी आहे. या लढाऊ विमानाचा कमाल वेग २२०५ किमी/तास आहे. तो आवाजाच्या वेगापेक्षा जवळपास दुप्पट आहे. देशातील ५०० हून अधिक देशांतर्गत कंपन्यांनी संयुक्तपणे हे उत्पादन केले आहे. म्हणूनच त्याला स्वदेशी तेजस असेही म्हटले जात आहे. यामुळे वायुदलाची ताकद अधिकच वाढली आहे.

## २०८ नक्षलवाद्यांचे छत्तीसगडमध्ये आत्मसमर्पण



■ वृत्तसंस्था, रायपूर, दि. १७ :
छत्तीसगड राज्यातील २०८ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण करून सरकारच्या पुनर्वसन योजनांचा लाभ घेण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. यामध्ये ९८ पुरुष आणि ११० महिलांचा समावेश असून, त्यांनी आपल्या सोबत १५३ अत्याधुनिक शस्त्रसामग्री आत्मसमर्पित केली आहे. या आत्मसमर्पणामुळे राज्यातील नक्सलवादग्रस्त भागांमध्ये एक मोठा बदल घडवून आणण्याची शक्यता आहे.

आत्मसमर्पण करणाऱ्या नक्षलवाद्यांनी आपल्या सोबत एके-४७ रायफल, एसएलआर रायफल, इंसास रायफल, कार्बाइन आणि पिस्टल यांसारखी १५३ शस्त्रसामग्री सरकारकडे सुपूर्त केली.

छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णु देव साय यांनी नक्षलवाद्यांच्या आत्मसमर्पणावर प्रतिक्रिया देताना म्हटले, आजचा दिवस छत्तीसगडसाठी आणि संपूर्ण देशासाठी ऐतिहासिक आहे. लाखो लोकांच्या जीवनात सुधारणा आणणारा, एक ऐतिहासिक पल आज घडला आहे. नक्षली आपल्यासोबत विकासाच्या प्रवासात सामील होण्यासाठी तयार झाले आहेत. सरकार त्यांच्या पुनर्वसनासाठी प्रत्येक उपाययोजना करेल.

मुख्यमंत्री साय पुढे म्हणाले, नक्षलवादाच्या विरोधात आमचा संघर्ष अविरत सुरू राहील, आणि आजचे आत्मसमर्पण त्याच संघर्षाचा भाग आहे. या आत्मसमर्पणामुळे छत्तीसगडच्या उत्तर बस्तर जिल्ह्यात नक्सलवादावर लक्षणीय परिणाम होईल, अशी अपेक्षा आहे. या आत्मसमर्पणामुळे इतर नक्सलवाद्यांना सुधारणेची प्रेरणा मिळू शकते, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

छत्तीसगड सरकारने नक्षलवाद्यांसाठी एक व्यापक पुनर्वसन योजना तयार केली आहे. या योजनेअंतर्गत, सरेंडर केलेल्या नक्षलवाद्यांना रोजगार, शैक्षणिक व सामाजिक सहाय्य, तसेच सुरक्षित जीवनासाठी आवश्यक सर्व सुविधा प्रदान करण्यात येणार आहेत. यामुळे हे नक्षलवादी आपले पूर्वीचे जीवन सोडून समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होऊ शकतात, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## ही मराठी माणसाची एकजूट..



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :
मनसेच्या शिवाजी पार्क येथील दीपोत्सवाचे यंदा शिवसेनेचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झाले. यावेळी आपल्या धाकट्या भावाच्या या दीपोत्सव कार्यक्रमाला उद्धव ठाकरे त्यांच्या पत्नी रश्मी ठाकरे आणि खासदार संजय राऊत, खासदार अनिल देसाई आणि शिवसेनेची नेतेमंडळी आवर्जून उपस्थित होती. यावेळी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी प्रसारमाध्यमांच्या विनंतीनंतर एकत्र पोझ देत फोटोसेशन करु दिले.

उद्धव ठाकरे यांनी यावेळी सर्वांना दिवाळीच्या खास शुभेच्छा दिल्या. यावेळी ते म्हणाले की दिवाळीच्या सर्वांना शुभेच्छा आणि आजची दिवाळ ही वेगळी आहे. विशेष आहे. आणि मला खात्री आहे. मराठी माणसाची एकजूट आणि त्या एकजूटीचा प्रकाश सर्वांच्या आयुष्यामध्ये आनंद घेऊन आल्याशिवाय राहणार नाही. असेच सर्व जण आनंदात राहा, प्रकाशात राहा आणि सर्वांना आनंद देत रहा.

## गुजरातचे नवे कॅबिनेट २६ मंत्र्यांनी शपथ घेतली



■ वृत्तसंस्था, गांधीनगर, दि. १७ :
गुजरातमधील भूपेंद्र पटेल सरकारच्या नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. २६ आमदारांना मंत्रीपद देण्यात आले आहे, ज्यात तीन महिलांचा समावेश आहे. मुख्यमंत्र्यांसह आठ मंत्री पटेल समाजाचे आहेत. आठ ओबीसी, तीन एससी, चार एसटी आणि तीन महिला आहेत. १९ नवीन चेहरे आहेत.

हर्ष संघवी हे शपथ घेणारे पहिले होते. त्यांना उपमुख्यमंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. त्यांनी यापूर्वी गृहमंत्रीपद भूषवले होते. क्रिकेटपटू रवींद्र जडेजाच्या पत्नी रिवाबा यांनाही मंत्रीपद देण्यात आले आहे.

## राज्यातील सात जिल्ह्यांसाठी १३५६ कोटींची मदत

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :
सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या सातारा, कोल्हापूर, बीड, धाराशिव, लातूर, परभणी आणि नांदेड जिल्ह्यातील २१ लाख ६६ हजार १९८ शेतकऱ्यांच्या १५ लाख १६ हजार ६८१.२१ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी १३५६ कोटी ३० लाख २२ हजार रुपयांची मदत वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आल्याची माहिती राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली.



बीड जिल्ह्यासाठी सर्वाधिक ५७७ कोटी ७८ लाखाचा निधी जाहीर झाला असून या मदतीसंबंधीचा शासन निर्णय निर्गमित केला आहे.

## जनगणनेची पहिली प्री-टेस्ट नोव्हेंबरमध्ये

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १७ :
रजिस्ट्रार जनरलने गुरुवारी २०२७ च्या जनगणनेच्या पूर्व-चाचणीच्या पहिल्या टप्प्याची घोषणा केली.

ही चाचणी घरांची यादी आणि गृहसंख्या गणना यावर केंद्रित असेल आणि देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये १० ते ३० नोव्हेंबर दरम्यान चालेल.

## आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे निधन



■ वृत्तसंस्था, अहिल्यानगर, दि. १७ :
ज्येष्ठ नेते आणि राहुरीचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे आज सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. वयाच्या ६७ व्या वर्षी शेवटचा श्वास घेतला. सकाळी अचानक छातीत दुःख असल्याने त्यांना तातडीने रूग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.
राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार संग्राम जगताप यांचे ते सासरे होते. शिवाजीराव कर्डिले यांचे राहुरी मतदार संघात एकहाती प्रभुत्व होते. अपक्ष म्हणून आमदार म्हणून ते पहिल्यांदा निवडून आले. राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस असा प्रवास करून सध्या ते भाजपात होते. त्यांनी सहा वेळाया मतदार संघाचे प्रतिनिधित्व केले.

राज्यातील अनेक नेत्यांनी शिवाजीराव कर्डिले यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे. आमदार कर्डिले यांच्या निधनामुळे तळागाळातील घटकांच्या विकासासाठी साठी झटणारे नेतृत्व हरपले, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रद्धांजली वाहिली. अजित पवार, भुजबळ यांच्यासह अनेकांनी श्रद्धांजली वाहिली.

महासागर
२०२५
दिवाळी विशेषांक

: मराठी गझल आणि आव्हाने :
प्रदीप निफाडकर यांचा अभ्यासपूर्ण लेख
: स्वातंत्र्याबरोबर येणाऱ्या जबाबदारीविषयी :
प्रा. शिला गाढे यांचा चिंतन करायला लावणारा लेख
: मातीकडे परतणारी माणसे :
अंतर्मुख करायला लावणारा स्वाती पेशवे यांचा लेख
: अल्पसंख्याकांच्या रक्षणाविषयी :
एका ज्वलंत समस्येवर आरिफ शेख यांचे विश्लेषण
: युद्धखोरीने ग्रासले जग :
विश्वाला भेडसावणाऱ्या संकटावर चिंतनीय लेख
: संध्याछाया भिवविती हृदया :
वृद्धांच्या समस्येवर अभय गोखले यांनी टाकलेला प्रकाश

याशिवाय....
भारतीय संविधान आहे तरी कसे?
नक्षलवाद अस्ताच्या उंबरठ्यावर..
सक्षमीकरण अडले कुठे?
.. वाचनीय लेख

■ भरगच्च आणि दर्जेदार साहित्याचा नजराणा ■
:मुल्य: रू.१२५/-
वितरकांनी आपली मागणी आजच नोंदवावी, जेणेकरून तेवढ्या प्रती पाठविता येतील.
पुरण शुंकर ८८८८६४७७५३




जाहिरात संकलन - श्रीकृष्ण काकडे, महासागर प्रतिनिधी मेहकर

# शेतकऱ्यांसाठी यंदा काळी दिवाळी साजरी करणार



**पुणे :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकार शेतकऱ्यांना मोकळ्या हाताने मदत करत नाही. त्यामुळे आमच्या पक्षाने शेतकऱ्यांच्या दुःखात सहभागी होण्यासाठी यंदा काळी दिवाळी साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी शुक्रवारी सरकारवर निशाणा साधताना केली. दिवाळीनंतर आपण या प्रकरणी मुख्यमंत्र्यांची भेट घेणार असल्याचेही ते यावेळी म्हणाले. शरद पवार यांनी शुक्रवारी सकाळी बारामतीमध्ये पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी सरकारची शेतकऱ्यांना सढळ हाताने मदत करण्याची तयार नसल्यामुळे काळी दिवाळी साजरी करण्याची वेळ आल्याचा आरोप केला. ते म्हणाले, मराठवाड्यासह संपूर्ण राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यानंतरही हे सरकार शेतकऱ्यांना मोकआळ्या हाताने मदत करण्यात कुचराई करत आहे. त्यामुळे आमच्या पक्षाने राज्यभरात काळी दिवाळी साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे. मला या प्रकरणी राजकारण करायचे नाही. पण या सरकारची शेतकऱ्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असल्याचे मला वाटते.

# ओबीसी नेत्यांचा महाएल्गार

■ **महासागर प्रतिनिधी, बीड, दि. १७ :**

ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी आज, 17 ऑक्टोबर रोजी बीडमध्ये राज्याच्या समस्त ओबीसी समाजाची एक मोठी महाएल्गार सभा आयोजित करण्यात आली आहे. मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वात होणाऱ्या या सभेला राज्यभरातील महत्त्वाचे ओबीसी नेते उपस्थित होते. सभेच्या आधी छगन भुजबळ, धनंजय मुंडे आणि लक्ष्मण हाके यांच्यात हॉटेल सनराईज येथे बैठक झाली.

महाएल्गार सभेत बोलताना छगन भुजबळ म्हणाले, अनेकांना या सभेचे निमंत्रण दिले नाही म्हणून अनेकजण नाराज आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो, अधिकार के लढाई में निमंत्रण नहीं भेजा करते. जिनका जमीर जिंदा हें, वो खुद समर्थन में आ जाते हें. हमारे हक पर जहा आच आये तो टकराना जरूरी हें. मी तुम्हाला सांगू इच्छितो आपल्या सभेत काही लोक घुसवले जाण्याची शक्यता आहे. मी असेही ऐकले की काही लोक सुतळी बॉम्ब घेऊन आले आहेत. ते काहीतरी गडबड करतील, त्यांना तिथेच दाबायचं आणि गपचूप पोलिसांच्या हवाली करायचं.

या सभेत अनेक नेते उपस्थित होते. मनोज जरांगे यांच्यावर यावेळी जोरदार टीका करण्यात आली. लक्ष्मण हाके यावेळी बोलताना म्हणाले, भुजबळ साहेब आणि धनंजय मुंडे यांची जोडी व्यासपीठावर बघून आज स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांची आठवण झाली.





गोपीनाथ मुंडे यांनी जातीनिहाय जनगणना करावी या मागणीसाठी दिल्लीतील संसदेत आवाज उठवला होता. आपण बीड जिल्ह्यात सर्वजण उपस्थित आहात, भुजबळ साहेब इथे दोन दिवस झाले सांगितले जात होते की भुजबळांना बीडमध्ये येऊ देणार नाही. भुजबळ साहेब तर लांब त्यांच्या कार्यकर्त्यांच्या केसाला सुद्धा धक्का लाऊ शकत नाहीत.

पुढे बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, मी एक जीआर घेऊन आलो आहे, त्यातले एकच वाक्य मी वाचून दाखवतो. हा जीआर ओबीसींचे आरक्षण संपवणारा आहे. त्यात असे लिहिले आहे, मराठा समाजास जात प्रमाणपत्र मिळण्याच्या प्रक्रियेत अधिक सुलभता यावी यासाठी शासन निर्णय घेत आहे. छगन भुजबळ साहेब तुम्ही सरकारमध्ये आहात, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगा राज्यातला मागासवर्ग आयोग बंद करा. दुसऱ्यांदा सांगा की सर्वोच्च न्यायालयाने मराठा समाजाचे सामाजिक मागासलेपण नाकारले आहे. औरंगाबाद खंडपीठाने मराठा समाज आणि कुणबी एकच असल्याचे मानणे नाकारले आहे. त्यामुळे सरकारने जो जीआर काढला आहे, तो सर्वोच्च न्यायालयाचा अपमान करणारा आहे.

लक्ष्मण हाके पुढे म्हणाले, हा जीआर म्हणजे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसीमध्ये घुसवण्याचा प्रयत्न आहे. माझी तुम्हाला हात जोडून कळकळीची विनंती आहे, एका चौथी नापास माणसाच्या सांगण्यावरून या महाराष्ट्रातल्या ओबीसीच्या आरक्षणात माती कालवण्याचे काम इथल्या लोकनियुक्त सरकारकडून झाले आहे. हा जरांगे कोणावर टीका करतो छगन भुजबळ साहेबांवर करतो, धनंजय मुंडेंवर करतो. हा चौथी नापास गडी. मुख्यमंत्र्यांची आई-माय काढणारा हा माणूस. ज्या लोकांनी आमच्या आरक्षणाला विरोध केला त्यांना आम्ही घरी बसवले.

# चितळे डेअरीकडून पूरग्रस्तांसाठी एक कोटीची मदत



■ **महासागर प्रतिनिधी, सांगली, दि. १७ :**

मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टी व पुराने मोडलेले संसार पुन्हा उभे करण्यासाठी चितळे डेअरीकडून मुख्यमंत्री सहायता निधीसाठी एक कोटीची मदत दिली. चितळे डेअरीच्या वतीने भागीदार श्रीपाद चितळे, विश्वास चितळे व व्यवस्थापकीय भागीदार निखिल चितळे यांनी मदतीचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला.

मराठवाड्यातील सोलापूर, लातूर, बीड, धाराशिव जिल्ह्यांत अतिवृष्टी व नद्यांना आलेल्या पुरामुळे शेती व शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक संसार उघड्यावर पडले आहेत. अशा पूरग्रस्तांना मदतीचा हात देऊन पुन्हा उभे करण्यासाठी चितळे डेअरीने एक सामाजिक जबाबदारी म्हणून आपला वाटा उचलला आहे. चितळे डेअरी उद्योगाच्या वतीने एक कोटी रुपयांची मदत जाहीर करत मदतीचा धनादेश मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला.

चितळे डेअरी गेल्या ८६ वर्षांपासून दुग्ध व्यवसायासोबतच समाजकार्यातही सातत्याने अग्रस्थानी राहिली आहे. करोनासारख्या जागतिक महामारीच्या प्रसंगीही चितळे डेअरी मदतीसाठी पुढे आली होती. तसेच सांगली जिल्ह्यातील कृष्णाकाठचा भिलवडी परिसर, तर चितळे डेअरीचा स्थानिक भाग, या भागात पूरस्थिती निर्माण झाल्यानंतर चितळे डेअरीने स्थानिक नागरिकांना मदतीचा हात दिला होता. शेतकरी हा आपल्या देशाचा कणा आहे. या वर्षी राज्याच्या काही भागांत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आणि पुनर्बांधणीसाठी हातभार लावणे ही आमची जबाबदारी आहे, असे चितळे डेअरीचे व्यवस्थापकीय भागीदार निखिल चितळे यांनी सांगितले.

भिलवडी परिसरात चितळे डेअरी शेतकऱ्यांना कृषी पूरक दूध व्यवसाय करण्यासाठी कायम प्रोत्साहित करत आहे. म्हैस खरेदीसाठी मदत करण्याबरोबरच उत्पादित दुधही खरेदी केले जाते. याचबरोबर पशुपालनात अत्याधुनिक ज्ञान पशुपालकांना देण्याबरोबरच त्यांना अडचणीच्या काळात मदतीचा हातही दिला जातो. यापुर्वी कृष्णा नदीला आलेल्या महापूरावेळी अनेक जनावरांचा बळी गेला. अशांना मदती करण्यासाठी चितळे डेअरीने हात पुढे करून पुन्हा त्यांना उभे करण्याचे काम चितळे डेअरीने केले आहे.

# बसस्थानकांवर मोफत वाचन कट्टा

## मंत्री प्रताप सरनाईक यांची घोषणा



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंचाहत्तरीनिमित्त महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने एक आगळावेगळा, लोकाभिमुख आणि संस्कारमूल्ये जपणारा उपक्रम हाती घेतला आहे. राज्यातील प्रमुख ७५ एसटी बसस्थानकांवर मोफत वाचनालय उभारून ज्ञान, साहित्य आणि संस्कृतीचा दिवा जनतेसाठी प्रज्वलित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एसटी महामंडळाच्या मुख्यालयात झालेल्या ३०९ व्या संचालक मंडळाच्या बैठकीत या निर्णयाची घोषणा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली. या बैठकीस परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, तसेच उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर उपस्थित होते. मंत्री सरनाईक म्हणाले, विद्यमान खासदार श्रीकांत शिंदे आणि ज्येष्ठ नेते विनय सहस्रबुद्धे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम आकाराला आला आहे. मोदीजींच्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत खुले वाचनालय उभारण्यात येणार आहे. या वाचनालयामध्ये वि.स. खांडेकर, कुसुमाग्रज, पु.ल. देशपांडे, नामदेव ढसाळ, व.पु. काळे, विश्वास पाटील अशा नामवंत साहित्यिकांच्या कृती उपलब्ध असतील. तसेच एमपीएससी व यूपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मौल्यवान संदर्भग्रंथ ठेवण्यात येणार आहेत. हा वाचन कट्टा मराठी भाषेचा समृद्ध वारसा जपणारा ठरेल आणि समाजात वाचन संस्कृतीचा नवा सुवर्णप्रकाश पसरवेल, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले.

# आईने यकृत देऊन वाचविले मुलीचे प्राण

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :**

महिन्यांपासून यकृताच्या गंभीर आजाराशी झुंज देत होती. डॉक्टरांनी अखेर यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया हा एकमेव पर्याय असल्याचे सांगितले. तसेच उपचारासाठी 20 लाख रुपए खर्च येणार असल्याचे सांगितले. मात्र, भाजीपाला विक्रीचा छोटा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबापुढे या उपचाराचा खर्च परवडणारा नव्हता. तसेच देवांशीच्या आईने तिला यकृत दिल्यानंतर भाग देवून तिच्यावर यशस्वी उपचार करण्यात आले. वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर तालुक्यातील वरूड (बु) येथे राहणारे रवींद्र गावंडे हे भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मागील अनेक दिवसांपासून त्यांची मुलगी देवांशी पोटदुखी, ताप, मळमळ होणे आदींमुळे सतत आजारी पडत होती. पालकांनी सुरूवातीला मंगरूळपीर आणि अकोला येथे तिच्यावर उपचार केले. परंतु तिच्या प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने अखेर तिला नागपूर येथे हलविण्यात आले.

# भाजप नेते मुरलीधर मोहोळ अडचणीत



**मुंबई:** पुण्यातील जैन बोर्डिंग हाऊसच्या जागेची बेकायदेशीर विक्री केल्याच्या प्रकरणावरून सध्या पुण्याचे राजकारण प्रचंड तापले आहे. या व्यवहारात खासदार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जैन समाजाने मोहोळ यांच्यावर गंभीर आरोप करत संताप व्यक्त केला आहे. आरोपानुसार, ज्या गोखले कन्स्ट्रक्शन कंपनीला ही जमीन विकण्यात आली, त्यामध्ये मुरलीधर मोहोळ यांची भागीदारी असल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी मोहोळ यांच्यावर थेट आरोप करत, मोहोळ यांनी बिल्डरांना हाताशी धरून जैन बोर्डिंगची जमीन हडपली, असा आरोप केला आहे. या पार्श्वभूमीवर जैन समाज आक्रमक झाला असून, पुणे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वादग्रस्त प्रकरणात लक्ष घालत जैन समाजाची समजूत काढण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, या आश्वासनानंतरही समाजातील संताप कमी झालेला दिसत नाही. समाज प्रतिनिधींनी स्पष्ट भूमिका घेत सांगितले की, आम्हाला केवळ आश्वासन नको

# टीव्ही अभिनेत्री ठरली डिजिटल अरेस्ट घोटाळ्याची शिकार

## बनावट पोलीस अधिकाऱ्यांकडून ६.५ लाखांची फसवणूक

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १७ :**

देशात सध्या डिजिटल अरेस्ट नावाच्या नव्या सायबर-घोटाळ्याचे जाळे वेगाने पसरत आहे. सायबर गुन्हेगार स्वतःला पोलिस किंवा सरकारी अधिकारी म्हणून सादर करतात, खोटे आरोप करून पीडितांना धमकावतात आणि आर्थिक व्यवहाराच्या नावाखाली पैसे उकळतात. याच पद्धतीने मुंबईतील एका 26 वर्षीय टेलिव्हिजन अभिनेत्रीला सात तास डिजिटल अरेस्टमध्ये ठेवून तिच्याकडून 6.5 लाख रुपये उकळण्यात आले आहेत. ही धक्कादायक घटना सोमवारी घडली असून, अभिनेत्रीने ओशिवरा पोलीस ठाण्यात एफआयआर नोंदवला आहे.

या प्रकरणात फिर्यादीने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, अभिनेत्रीला एका अज्ञात व्यक्तीचा फोन आला, ज्याने स्वतःची ओळख एका मोबाइल कंपनीच्या अधिकाऱ्याच्या नावे दिली. त्याने सांगितले की, तिच्या सिम कार्डवरून बँक फसवणुकीचे व्यवहार करण्यात आले आहेत आणि हे प्रकरण गंभीर आहे. त्यानंतर तो कॉल एका तथाकथित दिल्ली पोलिस अधिकाऱ्याला ट्रान्सफर करण्यात आला. त्या बनावट अधिकाऱ्याने गणवेश घालून व्हिडीओ कॉल केला आणि सर्वोच्च न्यायालयाची खोटी नोटीस दाखवून अभिनेत्रीला धमकावले.

त्या खोट्या अधिकाऱ्याने अभिनेत्रीला सांगितले की, चौकशी पूर्ण होईपर्यंत तिने 6.5 लाख रुपये एका खात्यात जमा करावे लागतील, अन्यथा तिचा पासपोर्ट आणि बँक खाती गोठवली जातील. हे केवळ चौकशीसाठी आहे, पैसे परत केले जातील, असे सांगत फसवणूक करणाऱ्यांनी अभिनेत्रीला मानसिकदृष्ट्या दबावाखाली ठेवले. घाबरलेल्या अभिनेत्रीने त्यांच्या सूचनेनुसार दिलेल्या खात्यात रक्कम ट्रान्सफर केली.

घटना इथेच थांबली नाही. पैसे भरल्यानंतरही तो बनावट अधिकारी तिला व्हिडीओ कॉलवरून चौकशी सुरू ठेवत होता. या सततच्या संपर्कामुळे अभिनेत्रीला संशय आला. तिने तिच्या मोबाईलवरील स्पॅम-फ्लॅगिंग ॲप तपासले आणि त्यावरून समजले की हा कॉल फ्रॉड कॉल आहे.

तात्काळ अभिनेत्री ओशिवरा पोलिस स्टेशनला धाव घेतली आणि सविस्तर तक्रार दाखल केली. सध्या पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला असून, पैसे ज्या खात्यात पाठवले गेले त्या खात्याचा मागोवा घेतला जात आहे.

# एसटी उलटून विद्यार्थ्यांसह १२ प्रवासी जखमी

■ **महासागर प्रतिनिधी, संगमनेर, दि. १७ :**

नाशिक-पुणे महामार्गावरील संगमनेरमधील चंदनापुरी घाटात आज, गुरुवारी सकाळी संगमनेरहून साकुरच्या दिशेने निघालेली एसटी बस (एमएच ०७ सी ९२५२) उलटली गेली. या अपघातात बसमधील शालेय विद्यार्थ्यांसह १० ते १२ प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. सुदैवाने अपघातात कोणतीही प्राणहानी झाली नाही.



अपघाताबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संगमनेरहून साकुरकडे प्रवासी घेऊन जाणारी एसटी बस चंदनापुरी घाटातून जात असताना धोकादायक वळणावर चालकाचा बसवरील ताबा सुटला आणि बस रस्त्यावर उलटली गेली. अपघात होताच झालेल्या मोठ्या आवाजाने परिसरात खळबळ उडाली. या बसमधून शालेय विद्यार्थ्यांसह अनेक प्रवासी प्रवास करत होते. मात्र, जीवितहानी टळल्याने अनर्थ टळला. अपघातात किरकोळ जखमी झालेल्या १० ते १२ प्रवाशांना तातडीने जवळच्या खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

प्राथमिक उपचारानंतर त्यांना घरी सोडून देण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक वांबळे यांच्यासह डोळासने महामार्ग पोलीस पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि मदतकार्य सुरू केले. अपघातामुळे महामार्गावर काहीकाळ वाहतुकीची मोठी कोंडी झाली होती.

# दिवाळीत वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १७ :**

दिवाळीत शहरातील विविध पोलीस ठाण्यांमधील १७ वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले. येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र शेळके यांची वाहतूक शाखेत करण्यात आली. मुंढवा पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक माया देवरे यांची बदली गुन्हे शाखेत करण्यात आली. पुणे पोलिसांच्या नियंत्रण कक्षातील पोलीस निरीक्षक सुनील पंधरकर यांची आर्थिक गुन्हे शाखेत बदल करण्यात आली. विशेष शाखेतील (स्पेशल ब्रँच) पोलीस निरीक्षक विजय टिकोळे यांची वाहतूक शाखेत,बदली करण्यात आली.

नियंत्रण कक्षातील पोलीस निरीक्षक अजय संकेश्वरी यांची आर्थिक गुन्हे शाखेत बदली करण्यात आली. नियंत्रण कक्षातील पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे यांची पोलीस निरीक्ष गुन्हे म्हणून बदली करण्यात आली आहे. विशेष शाखेतील निरीक्षक संदिपान पवार यांची गुन्हे शाखेत बदली करण्यात आली आहे.

अरूण हजारे यांची नियंत्रण कक्षातून आर्थिक गुन्हे शाखेत, गुरूदत्त मोरे यांची नांदेड सिटी पोलिस ठाण्यातून विशेष शाखेत बदली करण्यात आली आहे. विश्रांतवाडी पोलीस ठाण्यातील गुन्हे शाखेचे निरीक्षक दत्ताराम बागवे यांची गुन्हे शाखेत बदली करण्यात आली आहे.

गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अंजुम बागवान यांची येरवडा पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी बदली करण्यात आली आहे. मंगेश हांडे यांची विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली. गुन्हे शाखेतील पोलीस निरीक्षक कुमार घाडगे यांची कोंढवा पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलिस निरीक्षकपदी बदली करण्यात आली आहे.

# दिवाळी सुरू होऊनही कर्मचाऱ्यांना बोनस नाही

## आदित्य ठाकरेंची टीका

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :**

आज दिवाळी सुरु होऊनही मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना आणि बेस्ट कर्मचाऱ्यांना अजूनही हक्काचा 'बोनस' मिळालेला नसल्याची टीका शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी केली आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने स्थानिक पातळीवरील राजकारण चांगलेच पेटल्याचे दिसत आहे.

आदित्य ठाकरे यांनी ट्विट करत म्हटले की, आज दिवाळी सुरु होऊनही मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना आणि बेस्ट कर्मचाऱ्यांना अजूनही हक्काचा 'बोनस' मिळालेला नाही. कर्मचाऱ्यांची आणि त्यांच्या कुटुंबीयांची दिवाळी आनंदात जाण्यासाठी हा बोनस अत्यावश्यक असतो. आमची मागणी आहे की मागच्या वर्षाहूनही अधिक रकमेचा बोनस महानगरपालिकेच्या व बेस्टच्या कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेकडून तत्काळ मिळायला हवा. महानगरपालिकेची मदत बेस्टला लागेल हे जरी सत्य असले तरी ती करणे हे महानगरपालिकेचे कर्तव्यच आहे.

## राज्यातील ५०० मंदिरे, ६० राज्य संरक्षित किल्ले यांच्या संवर्धनासाठी आराखडा

# तीन जिल्ह्यांचे डेस्टिनेशन निर्माण करणार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १७ :**



राज्यातील समृद्ध सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी राज्य शासनाकडून मोठा उपक्रम राबविण्यात येत आहे. राज्यातील ५०० मंदिरे, ६० राज्य संरक्षित किल्ले आणि १८०० बारवा (जलस्त्रोत) यांच्या संवर्धनासाठी बृहत आराखडा तयार करण्याच्या सूचना सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी दिल्या आहेत. या बृहत आराखड्यामध्ये त्यांच जतन, संवर्धन आणि यापुढे पर्यटक, फुटफॉल वाढवणे याचा समावेश असेल मैत्रीच्या सोबतीने पुरातत्व विभाग यांमध्ये नोडल एजन्सी म्हणून काम करेल, अशा पद्धतीचा निर्णय आज घेण्यात आला. शिवाय पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक या तीन जिल्ह्यांतील ऐतहासिक स्थळे, मंदिरे, गडकिल्ले यांचा स्वतंत्र एकात्मिक बृहत आराखडा तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला.

राज्यातील मंदिरे, किल्ले आणि ऐतिहासिक वस्तू संवर्धनाविषयी मंत्रालयात मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी बैठक घेतली. बैठकीला मैत्रीचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, सांस्कृतिक विभागाचे सचिव किरण कुलकर्णी, पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे, सांस्कृतिक कला संचालनालयाचे संचालक विभिषण चवरे, पु. ल. देशपांडे कला अकदामीच्या संचालिका मीनल जोगळेकर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

आपला महाराष्ट्राला समृद्ध वारसा लाभला आहे. महाराष्ट्राचा इतिहास, ऐतिहासिक मूल्य असलेल्या वास्तू, मंदिरे, गड-किल्ले, बारव हा आपला अभिमान आहे. त्यामुळे जतन संवर्धनाबाबत योग्य नियोजनासाठी बृहत आराखड्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने ही बैठक घेण्यात आली. त्यामुळे या आराखड्यात राज्य संरक्षित वारसा स्थळांबरोबरच राज्य संरक्षित नसलेल्या ३५० किल्ल्यांचा देखील समावेश करण्यात यावा. आराखड्यानंतर प्रत्यक्ष संवर्धनाच्या कामांसाठी आवश्यक निधीची तरतूद करावी, तसेच खासगी भागीदारी विचारात घ्यावी. गरज असल्यास खासगी भागीदारीसाठी स्वतंत्र धोरणही तयार करण्यात यावे, अशा सूचना मंत्री ॲड.शेलार यांनी यावेळी केल्या.

आराखडा तयार करताना इतिहास, वास्तुशास्त्र, पुरातत्त्व, संवर्धन आणि व्यवस्थापन या क्षेत्रातील तज्ञांची नेमणूक करून प्रकल्पाची अंमलबजावणी सुसंगत आणि गुणवत्तापूर्ण करण्यावर भर देण्यात येणार आहे. त्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (पीआययू) यामध्ये चार नवीन अधिकाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती जाहिरात करून करणे, 15 डिसेंबरच्या अगोदर या पद्धतीच्या समितीच्या स्थापन करण्याचा निर्णयसुद्धा आज घेण्यात आला.

पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक या तीन जिल्ह्यातील ऐतिहासिक वस्तू संवर्धन आणि सांस्कृतिक प्रसिद्धी साठी डेस्टिनेशन मॅनेजमेंट ऑर्गनायझेशन निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असून या जिल्ह्यांतील ऐतहासिक स्थळे, मंदिरे, गडकिल्ले यांचा एकात्मिक बृहत आराखडा स्वतंत्रपणे करण्याचा निर्णय घेण्यात आला. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांशी संपूर्णतः चर्चा करून पुरातत्व विभाग नोडल एजन्सी आणि मित्राच्या मदतीने या विषयाचा एकात्मिक बृहत आराखडा बनवण्याचे नियोजनाचे निर्देश मंत्री ॲड शेलार यांनी दिले.

# वडिलांनी केलेल्या हल्ल्यात मुलीचा मृत्यू

**मुंबई :** वाकोल्यात एका इसमाने घरात झालेल्या भांडणादरम्यान पत्नी आणि मुलीवर चाकूने प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात १५ वर्षीय मुलीचा मृत्यू झाला तर पत्नी गंभीर जखमी झाली आहे. सांताक्रूझच्या वाकोला येथे गुरुवारी संध्याकाळी ही घटना घडली. हल्ल्यानंतर फरार झालेल्या पतीचा शोध सुरू आहे. वाकोला पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी सुलेमान हुजरा (४१) पत्नी नसिमा आणि मुलगी आशागरी (१५) सोबत वाकोला येथील शिवनगर परिसरात रहात होता. तो रंगारी असून त्याची पत्नी नसीमा मजूर म्हणून काम करते. पती-पत्नी मध्ये सतत आर्थिक गोष्टींवर वाद होत होते. सुलेमान आणि नसिमा यांच्यात गुरुवारी रात्री कडाक्याचे भांडण झाले. रागाच्या भरात सुलेमानने पत्नी आणि मुलीवर घरातील चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात दोघी गंभीर जखमी झाले आणि रक्ताच्या थारोळ्यात पडल्या. दोघांना तेथेच टाकून सुलेमान पसार झाला. याबाबत शेजाऱ्यांनी वाकोला पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी जखमी नसीमा आणि मुलगी आशागरी यांना रुग्णालयात दाखल केले. मात्र आशागरीचा मृत्यू झाला.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानाचा तिसरा टप्पा ३ नोव्हेंबरपासून

**मुंबई :** राज्यातील शाळांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानाचा तिसरा टप्पा हाती घेण्यात आला.

हा टप्पा ३ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत राबविण्यात येणार आहे. स्पर्धात्मक अभियानासह नवीन उपक्रमांचा समावेश असलेल्या या अभियानामध्ये विजेत्या शाळांना ७२ कोटी २२ लाखांची पारितोषिके देण्यात येणार आहेत. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण, क्रीडा इत्यादी घटकांबाबत जागृती करूने, या घटकाच्या वृद्धीस प्रोत्साहन देण्याच्या अनुषंगाने हा टप्पा राबविण्यात येणार आहे.

# गोपालकृष्ण वाचनालयात वाचनप्रेरणा दिन साजरा

■ **महासागर प्रतिनिधी मेहकर, दि. १७ :**



भारताचे माजी राष्ट्रपती, भारत रत्न, मिसाईल मॅन डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम याची जयंती निमित्त वाचनप्रेरणा दिन व वृत्तपत्र विक्रेता दिनाचे औचित्य साधून गोपाल कृष्ण सा. वाचनालय मेहकर येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते.

सभेच्या अध्यक्षस्थानी कवि तडकाकार प्रा. अशोक सारडा व प्रमुख अतिथी म्हणून साहित्यीक डॉ. अभिमन्यु मगर होते याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव निकम, सचिव केशवराव गिऱ्हे, रामदास राजेगावकर , राजेंद्र पवार ' प्रा वसंत गिरी, विजय गिऱ्हे यांनी समयोचित मार्गदर्शन केले. या प्रसंगी संतोष निबेंकर, ग्रंथपाल सुरेखा शहाणे, सुलोचना तळणकर, आनंद सोनुने व वाचकवर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.

इंटरनेट, व्हाटसअप इ. च्या मोहजालामुळे विद्यार्थी व युवकांमध्ये कधी नव्हे एवढी वाचनप्रेरणा घटलेली आहे ही गंभीरबाब असून तत्संबंधी जागृतता निर्माण करण्याचे कार्य समाजामध्ये सर्वतोपरी व्हावेत असे मत अशोक सारडा यांनी व्यक्त केले.

# पत्नीच्या मदतीने प्रियकराने केली प्रेयसीची हत्या

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १७ :

विवाहित प्रियकराने लग्नाचा तगादा लावणाऱ्या प्रेयसीची हत्या केल्याची धक्कादायक घटना चांदुर रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे. आरोपीने आपल्या पत्नीच्या मदतीने प्रेयसीचा गळा आवळून खून केला आणि नंतर अपघाताचा बनाव करण्यासाठी मृतदेह रेल्वे रुळावर फेकून दिला. अमरावती स्थानिक गुन्हे शाखेने या घटनेचा छडा लावत आरोपी शुभम विठ्ठलराव हटवार (वय २८, रा. डांगरीपुरा, चांदुर रेल्वे) आणि त्याच्या पत्नीला ताब्यात घेतले आहे.

चांदुर रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत १५ ऑक्टोबर रोजी एका २६ वर्षीय महिलेच्या आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मृत महिला (फियार्दीची बहीण) नवऱ्यासोबत पटत नसल्याने फियार्दीच्या घरी राहत होती. ती सकाळी घरात दिसली नाही. शोध घेत असताना, ती रेल्वे रुळावर अपघातात मरण पावल्याची माहिती मिळाली.

हा मृत्यू रेल्वे अपघातामुळे झाल्याचा प्राथमिक संशय होता. मात्र, शवविच्छेदनानंतर डॉक्टरांनी मृतदेहाच्या गळ्यावर गळा आवळल्यासारखे व्रण असल्याचा अभिप्राय दिला. यामुळे अपघाताचा संशय दूर होऊन खुनाचा संशय बळावला.

**पत्नीच्या मदतीने घरातच खून**

शुभमने आपल्या पत्नीला या कटाची माहिती दिली. योजनेनुसार त्याने प्रेयसीला रात्री घरी बोलावले. पत्नीच्या मदतीने त्याने घरातील दोरीने प्रेयसीचा गळा आवळला आणि तिचा खून केला. नंतर दोघांनी मृतदेह एका पोत्यात बांधला. मोपेडवर मध्यभागी तो ठेवून रेल्वे पुलाखाली नेला आणि नंतर रेल्वे रूळावर फेकून दिला, जेणेकरून तो अपघातासारखा दिसावा.

या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी सर्व बाबी तपासण्याचे आदेश दिले. त्यानुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मुलचंद भांबुरकर आणि त्यांच्या पथकाने चांदुर रेल्वे येथे तपास सुरू केला.

चौकशीतून मृत महिलेचे गावातील शुभम हटवार याच्यासोबत प्रेमसंबंध होते आणि त्यातूनच हा प्रकार घडला असण्याची शक्यता वर्तवण्यात आली.

पोलिसांनी शुभम हटवार याला ताब्यात घेऊन चौकशी केली. सुरुवातीला त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. परंतु, तांत्रिक बाबींचा अभ्यास करून प्रश्न विचारल्यावर त्याने आपला गुन्हा कबूल केला. त्याने सांगितले की, मृत महिलेचे आणि त्याचे प्रेमसंबंध होते. मात्र, ती शुभमला वारंवार लग्न करण्यासाठी तगादा लावत होती. ती त्याला पत्नीला सोडून माझ्याशी लग्न कर, असेही म्हणत होती. या त्रासाला कंटाळून शुभमने हत्येचा कट रचला.

# तीन लाखांच्या सोन्याच्या अंगठ्यांची लूट



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १७ :

अकोल्यातील एमआयडीसी परिसरातील जय महाकाली बार ॲण्ड हॉटेलमध्ये एका शेतकऱ्याची तब्बल ३ लाख २० हजार रुपयांच्या सोन्याच्या अंगठ्या मारहाण करून जबरदस्तीने हिसकावून नेण्यात आल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी महिलेसह तिघांना अटक करून ३ लाख ६० हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

१२ ऑक्टोबर २०२५ रोजी वाशीम जिल्ह्यातील शेलगाव येथील शेतकरी किशोर भाऊराव भोयर (४७) हे अमरावतीहून अकोल्यात आले होते. त्यांनी एमआयडीसी परिसरातील जय महाकाली बार ॲण्ड हॉटेल येथे जेवणासाठी थांबले. याठिकाणी त्यांचे ओळखीचे पवन गव्हाणे याने त्यांची ओळख नेहा रोडे या महिलेशी करून दिली. पुढे नेहा रोडे आणि भोयर हे दोघे हॉटेलमधील एका खोलीत गेले. तेथे मारहाण करून शेतकऱ्यास लुटले. पोलिसांनी तातडीने तपास करत तिन्ही आरोपींना लहु रोडे (रा. खडकी, अकोला), नेहा रोडे (रा. खडकी, अकोला) पवन गव्हाणे (रा. शांतता नगर, जुने शहर, अकोला) अटक केली. यावेळी आरोपींकडून तीनही सोन्याच्या अंगठ्या व गुन्ह्यात वापरलेले मोबाईल फोन सह तीन लाख ६० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. महिला आरोपी नेहा रोडे हिला न्यायालयीन कोठडी देण्यात आली असून, लहु रोडे आणि पवन गव्हाणे यांना पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. गुन्ह्याचा अधिक सखोल तपास सुरू असून आरोपींचा वाढीव पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात येणार आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# मेळघाटातील आदिवासी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मुक्कामी उपोषणाला

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १७ :



मेळघाटातील आदिवासींनी रस्ते, पूल आणि वीज पुरवठ्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मुक्कामी उपोषण सुरू केले आहे. तीन जणांचा बळी गेल्यानंतरही खंडू नदीवर पूल न बांधल्याने, तसेच रस्त्यांची दुरवस्था आणि गावांमध्ये अंधार असल्याने त्यांनी हे आंदोलन पुकारले आहे. दिवाळीपूर्वीच सर्व कामधंदे सोडून ते उपोषणाला बसले आहेत.

खुटीदा आणि एकताईमधून वाहणाऱ्या खंडू नदीवर पूल नसल्याने अनेक दुर्घटना घडल्या आहेत. १८ सप्टेंबर रोजी एकताई येथील रावजी रोना बेठेकर पुरात वाहून गेले, त्यांचा मृतदेह सहा किलोमीटर अंतरावर सापडला. यापूर्वी नंदलाल झोलांग बेठेकर यांचा दहा वर्षांचा मुलगा आणि एक अंगणवाडी सेविकाही पुरात वाहून गेल्या होत्या. पूल बांधण्याचे केवळ आश्वासन मिळाले, प्रत्यक्ष कृती झाली नाही, असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

खुटीदा आणि सिसोरीदरम्यानचा सहा किलोमीटरचा रस्ता अनेक दिवसांपासून खराब अवस्थेत आहे. खुटीदा येथील खंडू नदीपासून सुमोरीपर्यंत टिकाऊ रस्त्याची मागणी जुनी आहे.

तसेच, सुमीता गावापासून खुटिया-सुमोरी रस्त्यावरील नंदराम गुलाई फाट्यापर्यंत दोन किलोमीटरचा टिकाऊ रस्ता आणि सुमोरी ते आवला गुलाई हा तीन किलोमीटरचा रस्ताही अद्याप तयार झालेला नाही. खुटीदा फाट्यापासून गावापर्यंतच्या दीड किलोमीटर अंतरावर विजेचा पुरवठा नाही, त्यामुळे रात्रीच्या वेळी पूर्ण अंधार असतो. या मार्गावरून जाताना अनेकदा जंगली श्वापदांचा सामना करावा लागतो, ज्यामुळे हल्ल्याची भीती असते. त्यामुळे या रस्त्यावर वीज पुरवठा करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

गुरुवारी दुपारनंतर एकताई, खुटीदा, सुमीता, सुमोरी येथील आदिवासी जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचले. त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांची भेट घेतली. समस्या मांडून त्या सोडवण्याची मागणी केली, परंतु ठोस उत्तर न मिळाल्याने त्यांनी कलेक्ट्रेटवरच राहुटी ठोकून उपोषण सुरू केले आहे.

# कार उलटून अपघात
## १ ठार, ५ गंभीर जखमी

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १७ :

शिवसेना शिंदे गटाचे अकोला संपर्कप्रमुख आणि माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या कार्यकर्त्यांचा वाहनाला परतीच्या प्रवासात भीषण अपघात झाला. पंचगव्हाण फाट्याजवळ त्यांची गाडी उलटल्याने झालेल्या अपघातात एका कार्यकर्त्याचा मृत्यू झाला. तर शहरप्रमुखासह ५ गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात शनिवारी रात्री साडेदहा वाजता घडला.

अक्षय म्हसाळ असे मृत तरुणाचे नाव असून जखमींमध्ये शिवसेना शिंदे गट तेल्हारा शहर प्रमुख अनिकेत ढवळे, शहर उपाध्यक्ष निखिल हिवराळे, अंकित खंडारे राजेश गावत्रे आणि शिवराम गिरी यांचा समावेश आहे. सर्व जखमींवर अकोल्यातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. विधान परिषद माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया यांचा बुधवारी वाढदिवस होता. हा वाढदिवस साजरा करून कार्यकर्ते परतत असताना शनिवारी रात्री साडेदह वाजता हा अपघात झाला.

# जिल्हास्तरीय धम्म महोत्सवाचे १९ ऑक्टोबरला आयोजन

■ महासागर प्रतिनिधी,
मोताळा, दि. १७ :

भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने येथील मलकापूर मार्गावरील बुलडाणा अर्बन बँकेजवळ १९ ऑक्टोबर रोजी जिल्हास्तरीय धम्म महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाला मोठ्या संख्येने समाज बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

मागील जवळपास सात वर्षांपूर्वी २०१८ मध्ये धम्म महोत्सव पार पडला होता. त्यानंतर कोरोना काळ आला आणि विविध कारणांमुळे मागील सात वर्षांपासून धम्म महोत्सव कार्यक्रम घेण्यात आला नाही. परंतु आता सात वर्षानंतर भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने १९ ऑक्टोबर रोजी जिल्हास्तरीय धम्म महोत्सवाचे आयोजन शहरात करण्यात आले आहे. धम्म महोत्सवात धम्माच्या खऱ्या तत्त्वांची जनमानसात ओळख निर्माण करणे, युवकांना करुणा, प्रज्ञा व समतेचा मार्ग दाखविणे, समाजात ऐक्य आणी मैत्रीची भावना दृढ करणे ही या कार्यक्रमाची प्रमुख उद्दिष्टे असल्याची माहिती भन्ते विनयपाल आणी भीमराव तायडे यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. महोत्सवाला दुपारी तीन वाजता सुरुवात होणार असून यावेळी राजगृह बुद्धविहार येथून सचित्र धम्म महोत्सव रॅली काढण्यात येईल.

ही रॅली मुख्य मार्गाने मार्गक्रमण करीत चार वाजता आंबेडकर चौकात येईल त्यानंतर पाच वाजता रॅलीचे सभेच्या ठिकाणी आगमन होईल त्याठिकाणी धम्म चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा गुणगौरव करण्यात येईल. महोत्सवाचे उद्घाटन भारतीय बौद्ध महासभेचे राज्य अध्यक्ष यु. जी. बोराळे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भीमराव यशवंतराव आंबेडकर हे लाभणार आहेत. यावेळी संजय गुरचवळे, समाधान डोंगरे, दिलीप मेढे, संजय अंदूरकर, डब्लू. डी. वानखेडे, एस. एन. तेलंग, नवनीत शिरसाट, जी. एन. अहिरे, मुकींदा थाटे यांच्याअनेकांची उपस्थिती होती.

**CHANGE OF NAME**

I, Shabnam Abdul Gani Sheikh have change my name to **SHABNAM GANI SHEIKH**
Address : Itwari Peth, Umred, Nagpur
for all future purposes.

## कार्यालय नगर परिषद, खापा
ता. सावनेर, जि. नागपूर
Tele. 07113-286125, Toll Free – 1800-223-4728
Webside – https://khapmahaulb.maharashtra.gov.in
Email - npkhapa@gmail.com

जावक क्र. नपखा/माझी वसुंधरा/कावि/२१२२/२०२५ — दिनांक: १७/१०/२०२५

**कार्यालय नगर परिषद खापा, जि. नागपूर**
Email: npkhapa@gmail.com
ULB Code 802706

**"स्वच्छ दिवाळी - शुभ दिवाळी" व "माझी वसुंधरा अभियान 6.0" अंतर्गत फटाके बंदी व सिंगल युज प्लास्टीक बंदी बाबत जाहीर आवाहन**

खापा शहरातील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची अधिसूचना MPCB/JD/(APC)/TB/B-0073 दि. 03/10/2024 नुसार जास्त आवाज निर्माण करणाऱ्या वायू प्रदूषण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. अशा फटाक्यांचे उत्पादन विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे. तसेच आपणांस सर्वांना माहीतच आहे की, आपण वातावरणीय बदलास सामोरे जात आहोत. वातावरणीय बदलाच्या अनेक कारणांपैकी हवेचे प्रदूषण हे एक महत्त्वाचे कारण आहे. विविध सण /उत्सव प्रसंगी आपण वाजवत असलेल्या फटाक्यांमध्ये कार्बन व सल्फरचे प्रमाण अधिक असते. जे विषारी वायूंची श्रेणी तयार करतात. हे वायू वनस्पती, पक्षी, प्राणी तसेच मानवी प्रजातीस हानी पोहचवितात. हवेचे प्रदूषण थांबवण्याची क्रिया आपण स्वत: पासून सुरू करू शकतो. सबब माझी वसुंधरा अभियान व स्वच्छ सर्वेक्षण अभियान अंतर्गत येणाऱ्या सण/उत्सवात फटाके वाजविण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

एकल वापर प्लास्टीक बंदी प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी नगर परिषद खापाव्दारे पथक नेमून रस्त्यावरील विक्रेते, भाजीमंडीतील फुल विक्रेते, स्थानिक बाजारपेठ तपासणी इत्यादीवर लक्ष केंद्रित केलेले आहे. करिता सिंगल युज प्लास्टीकचा वापर किंवा साठवणूक करतांना आढळून आल्यास दंड आकारण्यात येईल व कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.
तरी सर्व नागरिकांनी याची अंमलबजावणी करावी असे आवाहन करण्यात येत आहे. येणारी दिवाळी ही स्वच्छ दिवाळी-शुभ दिवाळी हरित पर्यावरणपूरक म्हणून साजरी करुया. तसेच ही दिवाळी आनंदी व सुरक्षित राहो अशा सर्वांना नगर परिषद खापा कार्यालयातर्फे हार्दिक शुभेच्छा!

(सुमेध अलोणे)
मुख्याधिकारी
नगर परिषद, खापा
जि. नागपूर

# केळी वेफर आणि टोमॅटो केचप निर्मितीने शेतकऱ्यांचे लक्ष वेधले

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १७ :

कृषी महाविद्यालयाच्या ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील वणी रंभापूर गावात विद्यार्थ्यांकडून फार्म टू फूड या संकल्पनेवर आधारित प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले. या प्रात्यक्षिकाचा उद्देश शेतकऱ्यांना शेतीतील उत्पादनांना मूल्यवर्धन करून अधिक उत्पन्न मिळविण्याचे मार्ग दाखवणे हा होता.

विद्यार्थ्यांनी केळीपासून वेफर आणि टोमॅटोपासून केचप तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष सादर केली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी केवळ प्रक्रिया उद्योगाचे महत्त्व स्पष्ट केले नाही, तर ग्रामीण महिलांना लघुउद्योगातून स्वावलंबनाचे नवे दालनही दाखवले. ग्रामीण भागातील शेती उत्पादने साठवून त्यांचे मूल्यवर्धन कसे करता येते, याचे प्रेरणादायी उदाहरण या प्रात्यक्षिकातून पाहायला मिळाले. या उपक्रमाचे मार्गदर्शन कृषी महाविद्यालय अकोलाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संजय भोयर, उद्यानविद्या विभाग शाखा प्रमुख डॉ. सुधीर दलाल, ग्रामीण कार्यानुभव कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अतुल वराडे यांनी केले.

## कार्यालय खापा नगर परिषद, जिल्हा–नागपूर

क्र. नपखा/मा.व.अ.वि/२१२८/२०२५ — दि. १७/१०/२०२५

**निविदा सूचना**

मुख्याधिकारी, खापा नगर परिषद यांचे वतीने माझी वसुंधरा अभियान अंतर्गत नगर परिषद खापा आराखड्यातील मोकळ्या जागेवर वृक्षारोपण चे काम करावायचे आहे. तरी इच्छुक मान्यता प्राप्त/अनुभवी कंत्राटदार कडून उपरोक्त कामाची निविदा mahatenders.gov.in, या शासकीय संकेस्थळवर मागविण्यात येत आहे. निविदा सादर करण्याची कालावधी दि. १८/१०/२०२५ रोजी सकाळी ११.०० ते दि. २७/१०/२०२५ रोजी दुपारी ०४.०० पर्यंत आहे. निविदेशी संबंधित पुढील सर्व सूचना शासकीय संकेस्थळवर पहावयास मिळेल.

मुख्याधिकारी
खापा नगर परिषपद

# स्वच्छ भारत अभियान अंतर्गत
## मनपा शाळेत आरआरआर सेंटरचे उद्घाटन



■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १७ :

स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२५ अनुषंगाने अमरावती महापालिकेद्वारे अंबिका नगरातील मनपा शाळेत आरआरआर (रिड्यूस, रियूज, रिसायकल) सेंटरचे उद्घाटन मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले. पर्यावरणपूरक वस्तूंच्या वापरांना चालना देण्यासोबतच घरातील वस्तू फेकून न देता त्या गरजूंसाठी आरआरआर सेंटरच्या माध्यमातून उपलब्ध करून देणे हा आहे. या उद्घाटनप्रसंगी मनपा अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर तसेच सर्व मनपा विभाग प्रमुख,अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान आयुक्त सौम्या शर्मा यांनी आपल्या घरातील वापरात नसलेली भांडी प्रतिकात्मक स्वरूपात आरआरआर सेंटरमध्ये जमा करून उपक्रमाची सुरुवात केली. हा अडगळीच्या वस्तू कमी करणे, वस्तूंचा पुनर्वापर आणि निरुपयोगी वस्तूंना नष्ट करून पुनर्निर्मिती करणे, या तीन महत्त्वाच्या तत्त्वांवर आधारित एक सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम आहे. यामध्ये नागरिकांनी आपल्या घरातील न वापरले जाणारे, पण अजूनही वापरण्यायोग्य वस्तू सेंटरमध्ये आणायच्या आहेत. या वस्तू गरजू नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जातील. आरआरआर सेंटरमध्ये जुने पण चांगल्या स्थितीतील कपडे, शालेय साहित्य (पुस्तके, दप्तर, पेन-पेन्सिल), वापरण्यायोग्य खेळणी, घरगुती साहित्य (भांडी, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक वस्तू-जर त्या चालू स्थितीत असतील), वापरलेले पण चांगल्या स्थितीतील पादत्राणे, जुन्या पण कार्यक्षम सायकली, संगणक,मोबाइल (जर ते चालू स्थितीत असतील किंवा दुरुस्त करता येतील) तसेच इतर कोणत्याही दैनंदिन उपयुक्त वस्तू, ब्लँकेट दिले जाऊ शकतात. आरआरआर सेंटरचा उपयोग पर्यावरण पूरकतेस चालना देण्यासह वस्तू टाकून न देता त्यांचा पुनर्वापर केल्याने कचरा कमी होतो.

## महानिर्मिती — भु. औ. वि. कें.
### ई-निविदा सूचना क्र. ९८/२०२५-२६

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राकडून खालील पुरवठा/कामांसाठी ऑनलाईन निविदा मागविल्या जात आहेत.

| अनु. क्र. | निविदा क्र./विभाग | निविदा तपशील | निविदेची अंदाजित किंमत/बयाना रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १ | ३००००६२४०७<br>कोळसा हाताळणी विभाग<br>२ x २१० मे. वॅ | भु.औ.वि.केंद्र दीपनगर, २१० मेगावॅट येथे कोळसा वॅगनच्या मॅन्युअल/मॅकेनाइज्ड अनलोडिंगसाठी कामाचा करार. | रु. २,१९,१२,०००/-<br>रु. २,२२ ,६००/- |
| २ | ३००००६२२६३<br>बाष्पक संधारण विभाग<br>२x५०० मे. वॅ | भु.औ.वि.केंद्र दीपनगर, ५०० मेगावॅट क्षमतेच्या युनिट ४ च्या मिल डिस्चार्ज गेट्सवर एकत्रित कण दमन आणि नियंत्रण सुविधा प्रदान करण्याचे काम. | रु. २,१३,७८,०००/-<br>रु.२,१७,३००/- |
| ३ | ३००००६२३०२<br>राख हाताळणी विभाग<br>२x२१० मे. वॅ | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथे एएचपी २१० मेगावॅट क्षमतेच्या, यूनिट -३, एचटी ब्रेकर/स्विच गियर पॅनेल रूमच्या सुरक्षिततेसाठी ऊर्जा कार्यक्षम थर्मास रेग्युलेटिंग सिस्टम प्रदान करणे आणि निश्चित करणे. | रु.१,९४,५३,६००/-<br>रु.१,९८,०००/- |
| ४ | ३००००६२५२०<br>बाष्पक संधारण विभाग<br>१x६६० मे. वॅ | भु.औ.वि.केंद्र दीपनगर, येथील ६६० मेगावॅट क्षमतेच्या युनिट-६ मधील कोळसा मिल रिजेक्ट हँडलिंग सिस्टमला ऑपरेशन आणि सर्वसमावेशक देखभालीसाठी कामाचा करार. | रु.१,४७,००,०००/-<br>रु.१,५०,५००/- |
| ५ | ३००००६२४२२<br>कोळसा हाताळणी विभाग<br>२ x ५०० मे. वॅ | भु.औ.वि.केंद्र दीपनगर, कोळसा हाताळणी विभाग २x५०० मे. वॅ मध्ये स्थापित विविध हायड्रॉलिक सिस्टीमच्या देखभालीसाठी कामाचे करार. | रु.६३,७५,२५२/-<br>रु.६७,३००/- |
| ६ | ३००००६२२२१<br>मुख्य भांडार विभाग | भु.औ.वि.केंद्र दीपनगर, एमएसए-ए बीटीपीएस दीपनगर येथील १०० मेट्रिक टन क्षमतेच्या वजन काट्याचे पुरवठा डिझाइन, उभारणी आणि कार्यान्वित करणे. | रु.३६,४०,९५०/-<br>रु.३९,९००/- |

निविदा खर्च १ ,१८०/ – (जीएसटी सहित) आहे. अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या.
https://eprocurement.mahagenco.in/.

मुख्य अभियंता (सं.आणि सु.),
भु. औ. वि. कें, दीपनगर.

## महाराष्ट्र शासन
## कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय,
## बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर

ई मेल :-constdivnagpur.ee@mahapwd.gov.in — (दुरध्वनी क्र.०७१२-२५६११७६)

**ई –निविदा सुचना क्रमांक ३२ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) " बांधकाम संकुल" सिव्हील लाईन्स, नागपूर महाराष्ट्र बांधकाम खात्याकडून खालील कामाकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे योग्य त्या वर्गात पंजीबध्द असलेल्या कंत्राटदारांकडून "ब-१" नमुन्यातील निविदा (ऑनलाईन) मार्गवित आहेत. कोरे निविदा पपत्रे www.mahapwd.com Website Pay online Portal वर कोरे निविदा प्रपत्राची किंमत ऑनलाईन निविदा प्रपत्रे डाऊनलोड ऑनलाईन नमुद केलेले वेळापत्रकापर्यंत च्या कालावधीत करता येईल. तसेच सिलबंद निविदा लिफाफा क्र १ व २ ऑनलाईन नमुद केलेल्या वेळापत्रकानुसार या कार्यालयात स्विकारण्यात येतील व शक्यतोवर त्याच दिवशी निविदा उघडण्यात येतील.

| अ.क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजीत किंमत (रू.लक्ष) |
|---|---|---|
| १ | Repairs to Minor Bridge at Ch 1/450 on Nerla Dudhala Nimkheda Rajoli Karoda Izani Vakeshwar Vaygaon Dhargaon Kanhalgaon Road MDR 22 Tah. Mouda Dist.Nagpur | रू. ८.०० लक्ष |
| २ | Repairs to RCW at Ch 20/900 on Kanhan Chacher Aroli to Connect SH-345 MDR-23 at Mouda Tah.Mouda Dist.Nagpur | रू. ८.०० लक्ष |
| ३ | Repairst to RCW at Ch 14/400 on NH-53 to Wadoda Zulhar Kirnapur kopra kumbhalpur narsala gangner khandala chacher road MDR-52 tah.Mouda Dist.Nagpur | रू. ८.०० लक्ष |
| ४ | Repairst to RCW at Ch 10/400 on Lapka Korad Navegoan Dhanla Dahegaon Bhuvari to Join MDR-28 Road MDR-27 tah.Mouda Dist.Nagpur | रू. ९.०० लक्ष |
| ५ | Repairst to RCW at Ch 11/200 on SH-339 to Bobdev Isapur Ajangaon mouda to join MDR -25Road MDR-85 tah.Mouda Dist.Nagpur | रू. ९.०० लक्ष |
| ६ | Repairst to CD Work on Ch 23/150, 23/500, 23/800, 23/900 on MDR-25 to Chicholi Dahegaon Ghotmundhari Morgaon Dharmapur Nimkheda Road MDR-26 Tal.Mouda Dist.Nagpur | रू. ९.०० लक्ष |
| अ. | ई-निविदा उपलब्ध कालावधी ;- As per e-tender schedule uploaded on e-portalhttp://mahatenders.gov.in<br>ई-निविदा उघडणे:-(ऑनलाईन नमूद केलेले वेळापत्रक लागू व अंतिम राहील.) | |

१)https://mahatenders.gov.in सूचना फलकावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे. (सदर निविदेसूचनेमध्ये काही बदली होत असल्यास वृत्तपत्रीय शुध्दीपत्रक न देता वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
२. कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प)नागपूर कार्यालयातील सूचना फलक
३.पत्र व्यवहाराकरीता संपर्क व पत्ता :- उपरोक्त नमू केलेल्या ई-मेल किंवा दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.
४. वरील निविदा डाऊनलोडच्या तारखेला ७२ तासात निविदाची तसेच लिफाफा १ मध्ये दस्ताएवजाची प्रत या विभागात सादर करण्यात यावी.

जावक क्र./६५७८/निविदा लिपिक/दि. १३.१०.२०२५
क्र. संमाबज/नाग/५०९/२०२५

कार्यकारी अभियंता
बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प)
नागपूर

# मुलांवरील लैंगिक गुन्ह्यांमध्ये ९४% वाढ

अल्पवयीन मुलामुलींवर लैंगिक अत्याचार, त्यांचे शोषण, अनैसर्गिक कृत्य ही देशासमोरची एक भीषण समस्या आहे. केंद्र आणि राज्य सरकारकडून याला प्रतिबंध लावण्यासाठी वेगवेगळे कायदे केले जात आहेत, काही प्रकरणात आरोपींना शिक्षाही सुनावली जाते. तथापि, अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये घट होण्याऐवजी त्यात वाढच होवू लागली आहे. लहान मुलामुलींच्या पालकांनी यासाठी निव्वळ सरकार, पोलीस यंत्रणा आणि न्याय व्यवस्था यावर निर्भर राहण्याऐवजी स्वतः मुलांकडे लक्ष द्यावयास हवे.

--------------

२०१७ ते २०२२ पर्यंत भारतात मुलांवरील लैंगिक गुन्ह्यांच्या प्रकरणांमध्ये ९४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. लैंगिक गुन्ह्यांपासून बाल संरक्षण (POCSO) कायद्यांतर्गत नोंदवलेल्या अशा प्रकरणांची संख्या ३३,२१० वरून ६४,४६९ झाली आहे.

अहवालात म्हटले आहे की, वाढती आकडेवारी असूनही शिक्षेचे प्रमाण ९० टक्क्यांपेक्षा जास्त आहे, जे मजबूत कायदेशीर कारवाई आणि अहवाल प्रणाली दर्शवते.

चाइल्डलाइट ग्लोबल चाइल्ड सेफ्टी इन्स्टिट्यूटच्या इनटू द लाईट इंडेक्स २०२५ या अहवालानुसार, गुन्हेगारी डेटामधील पारदर्शकता देखरेख आणि जलद कारवाई सुलभ करते. अहवालात याला जागतिक मानवतावादी शोकांतिका म्हणून वर्णन केले आहे.



**२०१२ मध्ये पोक्सो लागू करण्यात आला**

भारतात २०१२ मध्ये लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण (POCSO) कायदा लागू करण्यात आला. सुरुवातीला २०१७ मध्ये ३३,२१० प्रकरणे नोंदवण्यात आली होती, जी २०२२ पर्यंत दुप्पट झाली. वाढत्या अहवालामुळे लोक आता गप्प राहिलेले नाहीत, परंतु प्रत्यक्ष प्रकरणांची संख्या खूप जास्त असू शकते. भारत, नेपाळ आणि श्रीलंकेतील आठपैकी एक मूल लैंगिक शोषणाचा बळी आहे.

अहवालानुसार, भारत, नेपाळ आणि श्रीलंकेतील सर्वेक्षणातून असे दिसून आले आहे की, आठपैकी एका मुलाने १८ वर्षापूर्वी लैंगिक अत्याचार किंवा बलात्काराची तक्रार केली आहे. या तीन देशांमधील अंदाजे ५४ दशलक्ष मुले प्रभावित आहेत, जे एकूण बाल लोकसंख्येच्या १२.५ टक्के आहेत.

**२०२४ मध्ये भारतात २.२५ प्रकरणे नोंदवली गेली**

२०२४ मध्ये दक्षिण आशियामध्ये बाल लैंगिक शोषण सामग्री (CSAM) ची सर्वाधिक प्रकरणे भारत, बांगलादेश आणि पाकिस्तानमध्ये नोंदवली गेली. एकट्या भारतात २.२५ दशलक्ष प्रकरणे नोंदवली गेली.

**एआयच्या गैरवापराबद्दल इशारा**

अहवालात आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या (एआय) गैरवापराविरुद्ध इशारा देण्यात आला आहे. २०२३ ते २०२४ दरम्यान एआय-निर्मित सीएसएएम १,३२५ टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज आहे. मोठ्या टेक कंपन्यांचे निर्णय, जसे की सुरक्षेशिवाय एंड-टू-एंड एन्क्रिप्शन, अशा गुन्ह्यांना शोधणे कठीण करत आहेत.

चाइल्डलाइटचे सीईओ पॉल स्टॅनफिल्ड म्हणाले की, प्रत्येक आकडेवारीमागे एक मूल असते ज्याची सुरक्षा, प्रतिष्ठा आणि भविष्य हिरावून घेतले जाते.



या अहवालात सर्व देशांना बाल लैंगिक शोषणाला सार्वजनिक आरोग्य आणीबाणी म्हणून हाताळण्याचे आवाहन करण्यात आले आहे, ज्याप्रमाणे एचआयव्ही/एड्स आणि कोविड-१९ सारख्याच तत्परतेने.

स्टॅनफिल्ड म्हणाले की, गैरवापर होतो कारण त्याला परवानगी आहे. पुरेशी इच्छाशक्ती असेल तर ते थांबवता येते. मुले वाट पाहू शकत नाहीत; कृती करण्याची वेळ आता आली आहे.

एनसीआरबीच्या ताज्या अहवालानुसार, २०२३ मध्ये मुलांविरुद्धच्या गुन्ह्यांचा दर प्रति १००,००० बाल लोकसंख्येमागे ३९.९ होता, जो २०२२ मध्ये ३६.६ होता. या प्रकरणांमध्ये अपहरण (७९,८८४, ४५%) आणि पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हे (६७,६९४, ३८.२%) हे सर्वात प्रमुख होते.

बहुतेक गुन्हेगार पीडितेच्या ओळखीचे होते. ४०,४३४ प्रकरणांपैकी ३९,०७६ प्रकरणांमध्ये आरोपी ओळखीचे होते. ज्यामध्ये ३,२२४ प्रकरणांमध्ये कुटुंबातील सदस्य, १५,१४६ प्रकरणांमध्ये ओळखीचे आणि २०,७०६ प्रकरणांमध्ये मित्रांचा समावेश होता.


**मुलांवरील गुन्ह्यांमध्ये मध्य प्रदेश पहिल्या क्रमांकावर**


अहवालानुसार, २०२३ मध्ये मुलांविरुद्धच्या गुन्ह्यांचे १.७७ लाख गुन्हे नोंदवले गेले होते, जे २०२२ मध्ये १.६२ लाख होते. याचा अर्थ एका वर्षात ९.२% वाढ झाली आहे, जी महिला आणि वृद्धांच्या तुलनेत सर्वाधिक आहे.

दरम्यान, राज्यांमध्ये एकट्या मध्य प्रदेशमध्ये २२,३९३ प्रकरणे नोंदवली गेली. दररोज सरासरी ४८६ मुलांविरुद्ध गुन्हे नोंदवले जात होते आणि दर तीन मिनिटांनी एक.

मुलांवरील लैंगिक गुन्ह्यांची वाढता आलेख हा भारत आणि इतर काही देशांसाठी चिंतेची बाब आहे. देशाच्या मोठ्या शहरांमध्ये झोपडपट्ट्यांची संख्या, गर्दी, वाढती लोकसंख्या, गरीबी, शिक्षणाचा अभाव अशा अनेक कारणांमुळे मुलांवरील लैंगिक गुन्हे वाढत असून, याविरोधात ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे.

# तरुणांच्या आशेचा दीपस्तंभ





प्रमोद जांभुळकर
नागपूर.
९८२३९६९०९७

डॉ. अवुल पकिर जैनुलाब्दीन अब्दुल कलाम, एक विज्ञानप्रेमी, एक शिक्षक, भारताचे माजी राष्ट्रपती आणि मिसाईल मॅन म्हणून ओळखले जाणारे थोर व्यक्तिमत्त्व. त्यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ रोजी झाला आणि त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने देशाच्या प्रगतीसाठी अपार योगदान दिलं.

डॉ. कलाम यांचा जन्म तामिळनाडू राज्यातील रामेश्वरम या छोट्याशा गावात एका मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे वडील जैनुलाब्दीन हे बोटीनी भाविकांना नेण्याचं काम करत असत, तर आई आशियाम्मा या गृहिणी होत्या. गरिबी असूनही त्यांच्या घरात प्रेम, कष्ट आणि शिक्षणाला महत्त्व दिलं जात होतं.

डॉ. कलाम यांनी आपलं प्राथमिक शिक्षण रामेश्वरम मधील स्थानिक शाळेत पूर्ण केलं. त्यानंतर त्यांनी सेंट जोसेफ्स कॉलेज, तिरुचिरापल्ली येथून भौतिकशास्त्रात पदवी घेतली. पुढे त्यांनी मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मधून एरोनॉटिकल इंजिनिअरिंग मध्ये शिक्षण घेतलं.

डॉ. कलाम यांचा वैज्ञानिक प्रवास DRDO (Defence Research and Development Organisation) मधून सुरू झाला, पण त्यांची खरी ओळख झाली ISRO (Indian Space Research Organisation) मध्ये. तेथे त्यांनी भारताच्या पहिल्या उपग्रह प्रक्षेपण यंत्रणा SLV-3 याच्या यशस्वी उड्डाणात मोलाचं योगदान दिलं.

पुढे DRDO मध्ये परतल्यानंतर त्यांनी 'इंटीग्रेटेड मिसाईल डेव्हलपमेंट प्रोग्रॅम' चं नेतृत्व केलं आणि अग्नी, पृथ्वी, त्रिशूल, आकाश या क्षेपणास्त्रांची निर्मिती केली. त्यामुळेच त्यांना 'मिसाईल मॅन ऑफ इंडिया' ही उपाधी लाभली.

डॉ. कलाम यांनी भारत सरकारच्या विविध वैज्ञानिक प्रकल्पांमध्ये काम केलं. २००२ साली त्यांची भारताचे ११वे राष्ट्रपती म्हणून निवड झाली. ते 'जनतेचे राष्ट्रपती' म्हणून प्रसिद्ध झाले. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी देशातील तरुणांशी सातत्याने संवाद साधला आणि त्यांना स्वप्न बघण्याची प्रेरणा दिली.

डॉ. कलाम यांना त्यांच्या कार्याबद्दल अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविण्यात आलं, त्यात प्रमुख म्हणजेः भारत रत्न (१९९७) : भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान,पद्म भूषण (१९८१),पद्म विभूषण (१९९०) याशिवाय ३० हून अधिक विद्यापीठांकडून मानद डॉक्टरेट.

डॉ. कलाम यांचा विद्यार्थ्यांवर विशेष विश्वास होता. ते नेहमी म्हणायचे, स्वप्न तेच जे झोप लागल्यानंतर नव्हे, तर झोप उडवतात. स्वप्न पहा, आणि ते सत्यात उतरवा. शिकण्याची आणि प्रश्न विचारण्याची सवय लावा. अपयशाने घाबरू नका, तो यशाचा पहिला टप्पा असतो. तुमचं ध्येय स्पष्ट ठेवा, त्यासाठी झपाटून काम करा. शिस्त, मेहनत आणि सकारात्मक विचार यामुळे कोणतीही गोष्ट अशक्य राहत नाही.

डॉ. कलाम यांचे जीवन म्हणजे प्रेरणेचा महासागर आहे. त्यांच्या कार्यांने आणि विचारांनी आजही कोट्यवधी लोक प्रेरित होत आहेत. त्यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो. आजच्या जमान्यातही डॉ. कलाम यांचे विचार, त्यांचे मूल्य, आणि त्यांचा दृष्टिकोन अधिकच महत्त्वाचा वाटतो.

# शिक्षणाचे खाजगीकरण म्हणजे भेदभावपूर्ण शिक्षण व्यवस्थेचे समर्थन

'भारतातील प्रत्येक मुल आणि नागरिक शिक्षित व्हायला पाहिजे-' असं स्वप्न महात्मा फुले, सावित्रीमाई फुले, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकरां बरोबरच या देशातील अनेक महामानवांनी पाहिलेले होते.

परंतु खेदाने सांगावं लागत आहे की, महामानवांनी पाहिलेले हे स्वप्न अजून पर्यंत पूर्ण झाले नाही आणि भविष्यात ते पूर्ण होण्याची शक्यता खूप कमी दिसत आहे. याचे कारण म्हणजे भारतात होत असलेले शिक्षणाचे पूर्ण खाजगीकरण.

शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे भेदभाव पूर्ण शिक्षण व्यवस्था निर्माण होऊन शिक्षण प्रचंड महाग होत आहे. त्यामुळे सामान्यांच्या अवाक्या पलीकडे शिक्षण गेलेले आहे. शिक्षण आणि आरोग्य या दोन महत्त्वपूर्ण क्षेत्राला सरकारने वाऱ्यावर सोडल्याचे दिसत आहे. शाळा आहेत तर इमारती नाहीत, इमारती आहेत तर भौतिक सुविधा नाहीत, आणि भौतिक सुविधा आहेत तर पूर्ण शिक्षक संख्या नाही. अशी सरकारी शाळांची परिस्थिती सरकारने करून ठेवलेली आहे.

म्हणजे शाळेत पूर्ण शिक्षक संख्या नसल्यामुळे शिक्षक असून मुलांना शिक्षण देता येत नाही. शाळेत शिक्षक असेल तर शिक्षकांना मुलांना शिकऊ देण्याची सरकारची इच्छा नाही.




अनिल भुसारी
विभागीय अध्यक्ष,
मराठा सेवा संघ
तुमसर, जि. भंडारा.

कारण हा टपाल द्या, तो टपाल न्या. इथे झाड लावा, तिथे झाड मोजा, मग त्या ॲप वर डाउनलोड करा. हा ॲप डाऊनलोड करा, ते लिंक भरा, आजच द्या - आताच द्या. पुढे कहर म्हणजे ज्या मुलांचे भविष्य घडवायचे आहे त्यांना शिकवायचे सोडून नवभारत साक्षरच्या नावाखाली म्हाताऱ्यांना शिकवण्याचे काम याच शिक्षकांकडे.

म्हणजे ज्यांना शिक्षित करायला पाहिजे त्यांना अशिक्षित करा . मग हे अशिक्षित राहिले म्हणून पुन्हा हे मुलं म्हातारे झाले की यांच्याकरिता पुन्हा प्रौढ शिक्षण. आहे की नाही मजेदार वर्तुळ. सरकारच्या अशा बिनकामी योजनामुळे शिक्षणाचा बट्ट्याधार झालेला आहे.

सरकारी शाळांमधून या सर्व योजना राबविण्यामागचे कारण म्हणजे शिक्षणाचे खाजगीकरण. व्यापाऱ्यांच्या शाळा चांगल्या चालाव्यात म्हणून सरकारी शाळेत या सर्व योजना. असा एकमेकात सरकारने गुंतवलेला हा व्यापार.

खाजगी शाळा म्हणजे भेदभावपूर्ण शिक्षण व्यवस्थेचे समर्थन होय. ज्यांच्याजवळ पैसा त्यांची मुलं मोठ्या शाळेत. ज्यांच्याजवळ जास्तीचा पैसा आहे त्यांची मुलं विदेशात शिकायला. ज्यांच्याजवळ पैसा नाही त्या वंचित, गरीब, मजदूरांची मुलं ज्या शाळेला इमारत नाही, भौतिक सुविधा नाही, पूर्ण शिक्षक नाही त्या शाळेत. मुलांना जर तुम्ही आणि सरकार ईश्वराची लेकरं मानत असणार तर या ईश्वराच्या लेकरांसोबत हा भेदभाव कशासाठी? एकीकडे समान संधीची गोष्ट करणे आणि दुसरीकडे संधी मिळणार नाही यासाठी धोरणं आखणे म्हणजे हे पुतना मावशीचे प्रेम आहे.

हा पुतना मावशीचा प्रेम जनतेने ओळखून धोरणकर्त्यांना जाब विचारला पाहिजे. लोकांनी संविधानिक लोकप्रतिनिधींना पाचही वर्ष नाल्या, रस्ते नी समाजमंदिरे मागण्यापेक्षा जिथं शाळांना वर्ग खोल्या नाहीत तिथे वर्ग खोल्या मागा, शाळेकरिता भौतिक सुविधांची मागणी करा, शिक्षकांची मागणी करा, प्रयोगशाळा - वाचनालय मागा. लोकांनी लोकप्रतिनिधींकडे अशा रचनात्मक मागण्या मागितल्या तर लोकप्रतिनिधी आणि शासनाचा शिक्षण व आरोग्य व्यवस्थेकडे व्यापार म्हणून बघण्याचा दृष्टिकोन बदलून समाज विकासाचा, उत्तम शिक्षण आणि उत्तम आरोग्य निर्माण करण्याचा दृष्टिकोन निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.

समता मुलक शिक्षा और ज्ञान,
अच्छे स्कूल की है पहचान,
राष्ट्रपति की हो या मजदूर की संतान,
सबको शिक्षा मिले एक समान

# वसुबारस (गोवत्स द्वादशी) चे महत्त्व

आश्विन वद्य द्वादशी या दिवशी वसुबारस तसेच गुरुद्वादशी हे सण साजरे केले जातात. वसुबारस हा दिवस दिवाळीला जोडून येतो, म्हणून त्याचा समावेश दिवाळीत केला जातो; पण वस्तूतः हा सण वेगळा आहे. या सणाविषयी तसेच यानिमित्ताने गोपालनाचे महत्त्व थोडक्यात जाणून घेऊया.

--------------

**वसुबारस (गोवत्स द्वादशी)**

श्री विष्णूच्या आपतत्त्वात्मक लहरी कार्यरत होऊन ब्रह्मांडात येण्याचा दिवस म्हणजे वसुबारस! या दिवशी विष्णुलोकातील वासवदत्ता नामक कामधेनु या लहरींचे वहन ब्रह्मांडापर्यंत करण्यासाठी अविरत कार्य करते. या दिवशी या कामधेनूचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करून अंगणात तुळशी वृंदावनाशी धेनु म्हणजेच गाय उभी करून तिचे प्रतिकात्मक रूपात पूजन केले जाते.

या दिवशी आपल्या अंगणातील गाईला वासवदत्तेचे स्वरूप प्राप्त होते, म्हणजेच तिचे एकप्रकारे बारसे होऊन तिला देवत्व प्राप्त होते. यासाठीच या दिवसाला वसुबारस असे म्हणतात. बारस म्हणजे एखाद्या गोष्टीत नवीन चैतन्यबीजाची निर्मिती होणे.

हेच देवत्व तिच्या ठायी कायमस्वरूपी विष्णूरूप पाहून जिवाने टिकवायचे असते आणि तिच्यातून प्रक्षेपित होणाऱ्या चैतन्यलहरींचा लाभ घ्यायचा असतो.

**इतिहास :** समुद्रमंथनातून पाच कामधेनू उत्पन्न झाल्या, अशी कथा आहे. त्यातल्या नंदा नावाच्या धेनूला उद्देशून हे व्रत आहे.

**उद्देश :** या व पुढील अनेक जन्मांतील कामना पूर्ण व्हाव्यात आणि पूजा करत असलेल्या गायीच्या शरीरावर जितके केस आहेत, तितकी वर्षे स्वर्गात रहायला मिळावे. या उद्देशाने या दिवशी गाईची कृतज्ञतापूर्वकपूजा करतात.

**सण साजरा करण्याची पद्धत :** या दिवशी सौभाग्यवती स्त्रिया एकभुक्त राहून सकाळी अथवा सायंकाळी सवत्स गायीची पूजा करतात.

**वसुबारस या दिवशी घरा बाहेर पडून सवत्स गायीची पूजा करावी का? पूजा करणे शक्य नसल्यास काय करावे ? :**

वसुबारस या दिवशी काही कारणाने घरा बाहेर पडून सवत्स गायीची पूजा करण्यास अडचण असेल, तेव्हा घरी एखादी गायीची मूर्ती असल्यास तिची पूजा करावी. घरी मूर्ती नसल्यास गायीचे पाटावर चित्र काढून त्याची पूजा करावी.

**गोपालनाचे महत्त्व :** पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचमहाभूतांच्या आधाराने सृष्टीची निर्मिती झाली आणि तिचे चलनवलनही चालू आहे. या पंचमहाभूतांची गाय ही माता आहे. काळाच्या ओघात तिचीच अवहेलना झाल्याने आज सर्वतऱ्हेचे प्रदूषण गंभीररित्या वाढले आहे.

हे वेळीच रोखायचे असेल, तर गोरक्षण, गोपालन आणि गो उत्पादनांचे संवर्धन याला पर्याय नाही.

वसुबारस या सणाच्या निमित्ताने गोमातेचे महत्त्व लक्षात घेऊन गोरक्षण, गोपालन आणि गो उत्पादनांचे संवर्धन करण्याचा प्रयत्न करूया.

**गुरुद्वादशी :** आश्विन वद्य द्वादशी या तिथीला शिष्य गुरूंचे पूजन करतात. म्हणून या तिथीला गुरुद्वादशी असे म्हणतात.

------------

**संकलन : विद्याधर जोशी**
**९०११०८४४५०**
**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ सण, धार्मिक उत्सव आणि व्रते**

## वाचक लिहितात

# धनत्रयोदशी

धनत्रयोदशी (धनतेरस) हा दिवाळीचा पहिला दिवस असून, आश्विन महिन्याच्या कृष्ण पक्षातील १३ व्या दिवशी येतो.

या दिवशी देवांचे वैद्य भगवान धन्वंतरी यांचा जन्म झाला असल्याने, त्यांची पूजा केली जाते, तसेच लक्ष्मी आणि कुबेराचीही पूजा करून समृद्धीची मागणी केली जाते. या दिवशी सोने, चांदी, भांडी आणि झाडू खरेदी करणे शुभ मानले जाते.

या सणाच्या निमित्ताने नवीन सुवर्णालंकार विकत घेण्याची प्रथा आहे. हा दिवस व्यापारी वर्गासाठी विशेष महत्त्वाचा असतो आणि या दिवशी ते आपापल्या दुकानांमध्ये पूजा करतात. या दिवशी लक्ष्मी मातेची पूजा केली जाते, जी धन आणि समृद्धीची देवी आहे. हिंदू परंपरेनुसार भगवान धन्वंतरी ही आरोग्याची देवता आहे. जे समुद्रमंथनातून प्रगट झाले होते आणि त्यांच्या हातात अमृत कुंभ होता. या दिवशी भगवान धन्वंतरीचे (देवांचा वैद्य) पूजन केले जाते.

धन्वंतरी मंत्र

ओम नमो भगवते वासुदेवाय
धन्वंतरे अमृतकलश हस्ताय
सर्वामयविनाशाय त्रयलोक्यनाथाय
महाविष्णुये स्वाहा.

असा मंत्र म्हणतात.कडुनिंबाच्या पानांचे बारीक केलेले तुकडे आणि साखर असे प्रसाद म्हणून लोकांना देतात.

कडुनिंबाची उत्पत्ती अमृतापासून झाली आहे. कडुनिंबाची पाच-सहा पाने प्रतिदिन खाल्ली, तर व्याधी होण्याची शक्यता नाही. एवढे कडुनिंबाचे महत्त्व आहे; म्हणून या दिवशी तोच धन्वंतरीचा प्रसाद म्हणून देण्यात येतो.

**■ कु. राधा प्रमोद पिंपळापूरे**
**उमरेड.**

# खरे लक्ष्मीपूजन

लक्ष्मीपूजन ही भारतीय संस्कृतीतील एक वैशिष्ट्यपूर्ण पूजा आहे. ही पूजा अश्विन महिन्यातील अमावस्येला, संध्याकाळी केली जाते. शास्त्रानुसार, जेव्हा उपासक लक्ष्मीपूजन करतो, तेव्हा त्या पूजेतून लक्ष्मीचे तत्त्व उपासकाकडे प्रक्षेपित होते. हे तत्त्व आपण सतत साधनेच्या रूपात अंगीकारले, तर लक्ष्मी आपल्या सोबत राहते. परंतु उपासकाच्या मनात अहं निर्माण झाला, तर ती लक्ष्मी निघून जाते. खऱ्या अर्थाने लक्ष्मीपूजनाचा आनंद घ्यायचा असेल, तर आपण लक्ष्मीचे तत्त्व असलेल्या प्रत्येक गोष्टीत तिचे रूप पाहून त्याचा योग्य उपयोग करायला हवा.

जल हे लक्ष्मीला अतिशय प्रिय आहे, कारण ती समुद्राची कन्या आहे. समुद्रमंथनातून लक्ष्मी प्रकट झाली. त्यामुळे दैनंदिन जीवनात आपण वापरत असलेले जल योग्य पद्धतीने वापरले, तर लक्ष्मी स्थिर राहते. धनलक्ष्मी आपण लक्ष्मीला धनाची देवी मानतो. म्हणून धनाचा योग्य विनियोग करून, दानधर्म करणे, तसेच सत्पात्राला दान देणे हे आवश्यक आहे. यामुळे लक्ष्मी स्थिर राहते.

धान्य म्हणजेच लक्ष्मी. अन्नाचीही ती देवता आहे, जिची आपण अन्नपूर्णा म्हणून पूजा करतो. अन्न वाया न घालवता, आवश्यक तेवढाच उपयोग केल्यास लक्ष्मी प्रसन्न राहते आणि आपल्या घरी स्थिर होते. लक्ष्मीपूजन दिव्याच्या प्रकाशात केले जाते. दिवा पाहून लक्ष्मी येते असे मानले जाते. दिवा म्हणजे प्रकाश.आजच्या काळात हा प्रकाश म्हणजे वीज. आपण वीज योग्य प्रकारे वापरली, तरही लक्ष्मी आपल्या घरात स्थिर राहते. दिवाळी म्हणून एका दिवसापुरता खर्च करून मिळणारा आनंद क्षणिक असतो; पण लक्ष्मीपूजनाचा खरा आनंद रोज लक्ष्मीचे स्मरण ठेवून योग्य कृती करण्यात आहे.

**■ सौ. रमा देशमुख, नागपूर.**

# भारतीय जेवण रुचकर परंतू आरोग्यासाठी हानिकारक



भारतीय लज्जतदार जेवण त्याच्या स्वादासाठी जगभरात प्रसिद्ध आहे. परंतू इंडियन काऊंन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (ICMR) एका नवीन अहवालाने भारतीय जेवणातील पदार्थ रुचकर असले तरी आरोग्यासाठी पोषक नाहीत असे म्हटले आहे. भारतीय आहारात कार्बोहायड्रेटचे प्रमाण खूपच जास्त प्रमाणात आहे. आणि त्यात प्रोटीनचे प्रमाण खूपच कमी असल्याचे म्हटले आहे.

भारतीय आहारामुळे शरीराचे फारसे पोषण होत नाही. उलट या आहाराने देशातील लठ्ठपणा आणि डायबिटीजचे प्रमाण वाढत चालले आहे. आणि स्नायू कमजोर होत चालले असल्याचे आसीएमआरच्या अहवालात म्हटले आहे.

**रिपोर्टमध्ये नेमके काय म्हटले आहे ?**

आयसीएमआर आणि नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ न्यूट्रीशनच्या वतीने केलेल्या या संशोधनात भारतीय लोकांच्या डाएटचे विश्लेषण केले गेले. त्यानुसार झालेल्या संशोधनात असे आढळले की लोकांचे पोट तर या आहारने भरले जाते. परंतू शरीराला आवश्यक पोषण त्यातून मिळत नाही.

अहवालानुसार रिपोर्टमध्ये हे समोर आले की भारतीय आहारात ६५ ते ७० टक्के कार्बोहायड्रेट असते. तर प्रोटीनचे प्रमाण केवळ १० टक्के असते. या अहवालानुसार भारतीय जेवणातील थाळीत भात, रोटी आणि बटाट्या सारखे कार्बोहायड्रेट पदार्थ प्रचंड प्रमाणात खाल्ले जातात.

आयसीएमआरच्या मते त्यांच्या जास्त प्रमाणामुळे शरीरातील साखरेची पातळी खूप वाढते आणि फॅट जमा होते. त्यामुळे वजन वाढणे, थकवा येणे आणि डायबिटीजसारखे आजार होतात.

**प्रोटीनच्या कमतरतेने कमजोरी**

रिपोर्टनुसार प्रत्येक व्यक्तीला रोज ६० ग्रॅम प्रोटीनची गरज असते. परंतू बहुतांशी भारतीयांच्या जेवणात केवळ ३५ ते ४० ग्रॅम प्रोटीन असते. डाळ, दूध, अंडी आणि सोयासारखे पदार्थ भारतीय ताटातून गायब आहेत. त्याचा परिणाम इम्युनिटी आणि मसल स्ट्रेन्थवर होत आहे.

आयसीएमआरच्या रिसर्चनुसार दक्षिण भारतीय लोक तांदूळावर अवलंबून असतात.तर उत्तर भारतात गहूचा वापर सर्वाधिक होतो. तूर पूर्वोत्तर राज्ये आणि किनारी प्रदेशात मासे आणि नारळाने थोडे चांगले प्रोटीन मिळते. परंतू एकूण संपूर्ण देशाच्या डाएट संतुलनाचा अभाव आहे.

**आयसीएमआरचा इशारा**

आयसीएमआरने लोकांना आपल्या डाएटमध्ये सुधार करण्याचा इशारा दिला आहे. अहवालानुसार लोकांनी त्यांच्या डाएटमध्ये प्रोटीन आणि हेल्दी फॅटचा समावेश केला नाही तर येणा?या काळात आजारांचे प्रमाण वाढेल. आयसीएमआरने सल्ला दिला आहे की थाळीत २५ टक्के प्रोटीन, ५० टक्के कार्ब्स आणि २५ टक्के हेल्दी फॅटचे संतुलन राखणे गरजेचे आहे. तुम्ही रोज थाळीत डाळ, दूध, अंडी आणि दही सोया आणि भाज्यांचा समावेश करु शकता.

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### चाहुल ..!

निवडणूका येता जवळी
गावात माजते खळबळी
पक्षांनाही येतो चेव
सुरु करतात चळवळी .. !

पाच वर्षात जे नेते
गावात नाही फिरकले
निवडणूकीची लागता चाहुल
पॅटर्न त्यांनी बदलले ...

आश्वासनांची आता
सर्वत्र होईल खैरात
भावी उमेदवार येतील
घेऊन कार्यकर्त्यांची वरात ..

# पाठीच्या मणक्याच्या आरोग्याची काळजी– जागतिक स्पाइन दिनानिमित्त उत्कृष्ट सेवेचा सन्मान



**नागपूर, १७ ऑक्टोबर :** आजच्या काळात पाठदुखी आणि मानदुखी हे सर्वसामान्य आरोग्य समस्या बनल्या आहेत. बसून काम करणारी जीवनशैली, जास्त कामाचे तास, चुकीची बसण्याची पद्धत आणि शारीरिक क्रियाशीलतेचा अभाव ह्या सर्वांचा परिणाम म्हणून पाठीच्या मणक्याशी संबंधित आजारांचे प्रमाण वाढले आहे. अनेक लोक सतत पाठदुखी, पायांमध्ये मुंग्या येणे, कडकपणा किंवा हालचाल करण्यात अडचण यासारख्या सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष करतात आणि त्यांना तात्पुरता त्रास मानतात. मात्र, हे लक्षणे पाठीच्या मणक्याशी संबंधित गंभीर समस्यांचे संकेत असू शकतात, ज्यांच्यावर वेळेत लक्ष देणे गरजेचे आहे. जागतिक स्पाइन दिनानिमित्त, मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नागपूरने पाठीच्या मणक्याच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्याचा संकल्प केला आहे.

डॉ. मोहम्मद फैज़ान, डायरेक्टर, स्पाइन सर्जरी, मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नागपूर यांनी सांगितले, पाठीच्या मणक्याची काळजी घेणे म्हणजे फक्त उपचार नव्हे, तर प्रतिबंध आणि जागरूकता देखील तितकीच महत्त्वाची आहे. योग्य पोस्चर ठेवणे, जास्त वेळ बसून न राहणे, नियमित स्ट्रेचिंग करणे आणि सक्रिय जीवनशैली ठेवणे, ह्या सोप्या उपाययोजनांनी पाठीच्या मणक्याशी संबंधित अनेक समस्या टाळता येऊ शकतात. जर वेदना किंवा अस्वस्थता सतत राहिली, तर तज्ज्ञांचा वेळेत सल्ला घेणे परिस्थिती गंभीर होण्यापासून आणि जीवनमानावर परिणाम होण्यापासून वाचवू शकते.

त्यांनी पुढे सांगितले की, वैद्यकीय विज्ञानातील प्रगतीमुळे पाठीच्या मणक्याशी संबंधित आजारांवर उपचार करण्याच्या पद्धतींमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. इन्ट्राऑपरेटिव्ह नेव्हिगेशन सिस्टम्स, हाय-रिझोल्यूशन इमेजिंग, न्युरोमॉनिटरींग आणि स्पाइन सर्जरीसाठी खास डिझाईन केलेल्या ऑपरेटिंग सूट्ससारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे सर्जरी अधिक सुरक्षित आणि अचूक झाली आहे. आजच्या रुग्णांना मिनिमली इनवेसिव्ह आणि एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरीसारख्या आधुनिक तंत्रांमुळे फायदे होतो. या पद्धतींमुळे छोट्या छिद्रांद्वारे जटिल परिस्थिती हाताळता येते, ज्यामुळे दुखणे कमी होते, रक्तस्राव कमी होतो, हॉस्पिटलमध्ये राहण्याचा कालावधी कमी होतो आणि रुग्ण लवकर बरे होतात. ह्या पद्धतींनी पाठीच्या मणक्याची काळजी घेण्याची संकल्पना बदलली आहे आणि रुग्णांना त्यांच्या दैनंदिन जीवनात लवकर परत येण्याची संधी दिली आहे.

शेवटी त्यांनी सांगितले, या जागतिक स्पाइन दिनानिमित्त आपण सर्वांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की पाठीच्या मणक्याचे आरोग्य हे संपूर्ण शरीराच्या आरोग्याचा पाया आहे. योग्य पोस्चरकडे लक्ष देऊन, सक्रिय राहून आणि वेळेवर वैद्यकीय सल्ला घेऊन, आपण अनेक मणक्याशी संबंधित आजार टाळू शकतो. आणि जेव्हा उपचारांची गरज भासते, तेव्हा आजची आधुनिक तंत्रज्ञान आणि सर्वांगीण काळजी रुग्णांना सुरक्षित, प्रभावी आणि परिणामकारक उपचार उपलब्ध करून देते, ज्यामुळे त्यांना निरोगी आणि उत्साही जीवन मिळते.

# जॅरो एज्युकेशनने टियर–२ शहरांमध्ये उपस्थिती मजबूत करत प्रतिभेला घडवण्यासाठी आणि विकसित भारत घडवण्यासाठी पुढाकार घेतला

**नागपूर, १७ ऑक्टोबर :** कार्यकारी आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील भारतातील आघाडीच्या कंपन्यांपैकी एक असलेल्या जॅरो एज्युकेशनने कोलकाता, नागपूर, जयपूर आणि इंदूरमध्ये नवीन काउंसलिंग सेंटर्स सुरू करून टियर–२ शहरांमध्ये आपली उपस्थिती वाढवली आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षण, मार्गदर्शन आणि करिअर सल्ला सर्वांसाठी उपलब्ध करून देण्याच्या जॅरो एज्युकेशनच्या ध्येयात हे विस्तार एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. हे महानगरांपलीकडील विद्यार्थ्यांना सक्षम बनवते आणि विकसित भारताच्या दृष्टीकोनात योगदान देते.

गेल्या काही वर्षांत टियर–२ शहरांमधून असाधारण प्रतिभा पुढे येताना आम्ही पाहिली आहे. हे प्रदेश केवळ वाढते बाजार नाहीत, तर भारताच्या पुढील प्रतिभेचे प्रतिनिधित्व करतात, असे जॅरो एज्युकेशनच्या सीईओ रंजीता रमन यांनी सांगितले. आमच्या वाढलेल्या उपस्थितीद्वारे, आम्ही विद्यार्थ्यांना अशा कार्यक्रमांकडे मार्गदर्शन करण्याचे उद्दिष्ट ठेवतो जे त्यांचे करिअर बदलतील आणि त्यांना विकसित व कुशल भारताच्या निर्मितीत सक्रिय योगदान देण्यास सक्षम करतील

प्रतिभा सर्वत्र असते, त्यामुळे संधीही सर्वत्र असायला हवी, असे जॅरो एज्युकेशनचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय सळुंखे यांनी सांगितले. कोलकाता, नागपूर, जयपूर आणि इंदूरसारख्या शहरांमध्ये आमचे काउंसलिंग नेटवर्क मजबूत करून, आम्ही भारताच्या भविष्यातील कार्यबलामध्ये गुंतवणूक करत आहोत आणि अशा प्रतिभेला घडवत आहोत जी जागतिक स्तरावर स्पर्धात्मक आणि सर्वसमावेशक राष्ट्र घडवण्यासाठी मदत करेल

या रणनीतिक विस्ताराद्वारे, जॅरो एज्युकेशन प्रतिभा घडवणे, करिअरमध्ये परिवर्तन घडवणे आणि सर्वसमावेशक वाढ साधणे यासाठीची आपली बांधिलकी पुन्हा अधोरेखित करते ज्यामुळे देशाच्या प्रत्येक कोपऱ्यातील विद्यार्थी त्यांची पूर्ण क्षमता गाठू शकतील आणि विकसित भारताचा भाग बनू शकतील.

# एचडीएफसी बँके ने दिली डिजिटल फसवणूकीच्या घटने नंतर करावयाच्या कार्यवाही विषयी माहिती

**मुंबई, १७ ऑक्टोबर :** एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी बँके तर्फे ज्यावेळी त्यांच्यासोबत डिजिटल फसवणूकीची घटना घडते त्यानंतर करावयाच्या तीन गोष्टींची माहिती देण्यात आली आहे. या एलबीडब्ल्यू ॲक्शन घेण्याची विनंती करण्यसात येत असून यामुळे ग्राहकांना वेगाने काम करून त्यांचे नुकसान कमी करण्या बरोबरच क्रिकेटच्या संकल्पनेतून योग्य माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

या विषयी माहिती देतांना एचडीएफसी बँकेच्या क्रेडिट इंटेलिजन्स आणि क्रेडिट कंट्रोल चे सिनियर एक्झिक्युटिव्ह व्हाईस प्रेसिडेंट श्री मनीष अग्रवाल यांनी सांगितले, आम्ही नेहमीच आमच्या ग्राहकांना डिजिटल व्यवहार करतांना सतर्क राहण्याचे आवाहन करत असतो. गुन्हेगार हे नेहमीच त्यांच्या पध्दती बदलत असतात आणि लोकांच्या भावनांशी खेळण्यासाठी विविध तंत्रांचा वापर करत असतात. कधीकधी नागरिक हे या नाविन्यपूर्ण सामाजिक इंजिनियरींगच्या तंत्रांना बळी पडतात. डिजिटल गुन्हा घडण्याच्या दुर्दैवी प्रकारानंतर ग्राहकांनी काही सोप्या टप्प्यांचा वापर करुन केवळ गेलेला निधी परत मिळवता तर येतोच पण त्याच बरोबर ते भविष्यात अशा प्रकारच्या होणाऱ्या प्रसंगांपासूनही स्वत:चा बचाव करु शकतात.

एचडीएफसी बँके तर्फे ग्राहकांना नवीन गुन्हे जसे डिजिटल अरेस्ट सारख्यांपासून बचाव करण्याचा सल्ला देण्यात येतो. यावेळी गुन्हेगार हे पोलीस अधिकारी असल्याची बतावणी करुन त्यांना डिजिटल अरेस्ट ची धमकी ही कर चुकवणे, नियमांचा भंग, वित्तीय अनियमितता अशा कारणांनी धमकावत असतात. सर्वसाधारणपणे असलेल्या अन्य फ्रॉड्स मध्ये गुंतवणूक स्कॅमचा समावेश असून यांत गुन्हेगार हे स्टॉक्स, आयपीओज, क्रिप्टोकरन्सी इत्यादी मध्ये गुंतवणूकीतून अधिक परतावा देण्याचे प्रलोभन दाखवून खोट्या ऑटोमेटेड इन्व्हेस्टमेंट प्लॅटफॉर्म्स चा वापर हा समाजमाध्यमांवरुन करतात. एपीके स्कॅम मध्ये गुन्हेगार हे सामाजिक इंजिनियरींगचे तंत्र वापरुन बँकेचे कर्मचारी किंवा सरकारी असल्याचे भासवतात आणि अगदी चांगला विश्वसनीय स्त्रोत असल्याची बतावणी करत एपीके फाईल डाऊनलोड करायला सांगतात. ज्या क्षणी फाईल इन्स्टॉल होते त्यावेळी तुमच्या फोनचा संपूर्ण ताबा हा गुन्हेगारांकडे जातो. गुन्हेगार कधीकधी तुमच्या भावनांशी खेळून जीटीएच –ग्रीड, थ्रेट आणि हेल्प पध्दतींचा वापर करुन हे गुन्हे करतात.

एचडीएफसी बँकेने नेहमीच ग्राहकांमध्ये सायबर सुरक्षे विषयी जागरुकता निर्माण करण्यावर भर दिला असून सातत्याने नियामकांबरोबरही ते काम करण्यावर भर दिला आहे. त्याच बरोबर पोलीस आणि बाजारपेठेतील घटकांसह काम करुन सुरक्षित डिजिटल बँकिंग करण्यावरही भर दिला आहे.

एचडीएफसी बँके ने नेहमीच सायबर गुन्हेगारी विषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी संपूर्ण भारतात कार्यशाळांचे आयोजन करुन सुरक्षित बँकिंग उपक्रमासह सुरक्षित डिजिटल बँकिंग विषयीही माहिती देण्यात येते. या कार्यशाळांच्या माध्यमातून ग्राहकांना, पोलीसांसह वरिष्ठ नागरीक, स्वयंसहायता ग्रुप्स, शैक्षणिक संस्था, विक्रेते, भागीदार आणि कर्मचारी यांच्या मध्ये जागरुकता निर्माण करण्यावर भर दिला जातो.




# ॲक्सिस बँक आणि हिताची पेमेंट सर्व्हिसेस यांच्या सहकार्याने एक्सप्रेस बँकिंग: भारतातील पहिले डिजिटल बँकिंग पॉइंट सुरू केले

**मुंबई, १७ ऑक्टोबर :** भारतातील अग्रगण्य खासगी क्षेत्रातील बँकांपैकी एक असलेल्या ॲक्सिस बँकने, पेमेंट आणि कॉमर्स सोल्यूशन्समधील आघाडीच्या हिताची पेमेंट सर्व्हिसेससोबत भागीदारी करून देशातील पहिले डिजिटल बँकिंग पॉइंट एक्सप्रेस बँकिंग सुरू केले आहे. या अभिनव ऑम्नी-चॅनल सोल्यूशनमुळे शाखा बँकिंगची नवी परिभाषा तयार होत असून, ग्राहकांना कॉम्पॅक्ट फॉरमॅटमध्ये सर्व बँकिंग सेवा उपलब्ध होणार आहेत. हिताची पेमेंट सर्व्हिसेसच्या बँकिंग तंत्रज्ञान आणि पेमेंट सोल्यूशन्समधील कौशल्याचा लाभ घेत, या डिजिटल बँकिंग पॉइंटची रचना सुलभता आणि सोयीसाठी करण्यात आली आहे.

लॉन्चबद्दल प्रतिक्रिया देताना ॲक्सिस बँकेचे प्रेसिडेंट व हेड ब्रँच बँकिंग (उत्तर, पूर्व आणि टीएएससी बिझनेस) श्री. रेनॉल्ड डीसूझा म्हणाले, डिजिटल बँकिंग पॉइंट ही केवळ तांत्रिक नवकल्पना नाही, तर ती एक्सप्रेस बँकिंगमधील एका नव्या तत्त्वज्ञानाचे प्रतीक आहे. सुरक्षित डिजिटल सेवांचे अखंड एकत्रीकरण करून हा किऑस्क भारतभरातील ग्राहकांना, मग ते महानगरात असोत किंवा ग्रामीण भागात असोत, सातत्यपूर्ण आणि विश्वासार्ह बँकिंगचा अनुभव देतो. हा उपक्रम बँकिंगचे नव्याने व्याख्या करणे, ग्राहक अनुभव उंचावणे आणि विविध ग्राहकवर्गाच्या बदलत्या गरजा भविष्योन्मुख उपायांद्वारे पूर्ण करण्याच्या आमच्या सातत्यपूर्ण बांधिलकीचे द्योतक आहे.

हिताची पेमेंट सर्व्हिसेसचे मॅनेजिंग डायरेक्टर आणि चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर कॅश बिझनेस, श्री. सुमील विकमसी म्हणाले: भारताचे पहिले डिजिटल बँकिंग पॉइंट सादर करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. बँकिंग सेवा पुरवण्याच्या पद्धतीत हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. तंत्रज्ञान–चालित बँकिंगच्या नव्या युगाची सुरुवात करत, हा उपक्रम संपूर्ण देशभरातील बँकिंग सेवांपर्यंतचा प्रवेश वाढविण्यात आणि सेवा डिजिटायझेशनमध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल. पारंपरिक बँकिंग आणि डिजिटल बँकिंग यांच्यातील अंतर कमी करताना, आम्हाला विश्वास आहे की डिजिटल बँकिंग पॉइंट भारतातील ग्राहकांसाठी सुलभ आणि सोयीस्कर बँकिंग अनुभवाकडे मोठ्या प्रमाणावरील संक्रमणाचा पाया घालेल.

# लंडनमधील अदाणी ग्रीन एनर्जी गॅलरीने दहा लाखाहून अधिक अभ्यागतांच्या भेटीचा टप्पा पार

**लंडन, १७ ऑक्टोबर :** जगाला ऊर्जा अधिक शाश्वत पद्धतीने निर्माण करण्याचा आणि वापरण्याचा मार्ग दाखवणारी, लंडनमधील सायन्स म्युझियममधील पुरस्कारप्राप्त मोफत ग्रीन एनर्जी रिव्होल्यूशन: द अदाणी ग्रीन एनर्जी गॅलरीने मार्च २०२४च्या अखेरीस सुरू झाल्यापासून दहा लाख हुन अधिक अभ्यागतांचे स्वागत केले आहे.

ही गॅलरी आपल्या काळातील सर्वात मोठ्या आव्हानांपैकी एक जलद ऊर्जा संक्रमण आणि हवामान बदल मर्यादित करण्यासाठी लागणारी डिकार्बोनायझेशन या विषयाचा अभ्यास करण्यासाठी समर्पित आहे. येथे समकालीन व ऐतिहासिक वस्तू, आकर्षक डिजिटल प्रदर्शने आणि खास तयार केलेले मॉडेल्स पाहायला मिळतात, ज्यातून आपण ऊर्जा प्रणालींचे भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य मानवाच्या कल्पनाशक्ती आणि नवकल्पनांद्वारे कसे आकार घेतात हे जाणून घेऊ शकतो.

श्री सागर अदाणी, कार्यकारी संचालक, अदाणी ग्रीन एनर्जी, यांनी सांगितले, एनर्जी रिव्होल्यूशन: द अदाणी ग्रीन एनर्जी गॅलरी एक दशलक्ष लोकांना प्रेरणा देत आहे आणि शाश्वतता व नवकल्पना यावर चर्चा सुरू करत आहे हे पाहून आम्हाला अभिमान वाटतो. अदाणी ग्रीन एनर्जी येथे आमचा असा विश्वास आहे की शाश्वत भविष्य धाडसी नवोपक्रम आणि सामूहिक कृतीवर आधारित असते. हा टप्पा एकत्रित प्रयत्नांचा परिणाम आहे आणि हरित भविष्याच्या निर्मितीत शिक्षणाची शक्ती कशी काम करते हे दर्शवतो. आम्ही सायन्स म्युझियम ग्रुपचे या महत्त्वाच्या यशाबद्दल अभिनंदन करतो आणि अशा गॅलरीला पाठिंबा देताना आम्हाला गर्व वाटतो, जी उत्सुकतानिर्माण करते आणि स्वच्छ, अधिक टिकाऊ जगासाठी उपाय शोधण्यास मदत करते.



सायन्स म्युझियम ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संचालक, सर इयान ब्लॅचफोर्ड यांनी सांगितले, या अद्भुत गॅलरीत दहा लाख अभ्यागतांचे स्वागत केल्याबद्दल आम्हाला आनंद होत आहे, ज्यामुळे अभ्यागतांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आणि ऊर्जा अधिक शाश्वत पद्धतीने निर्माण व वापरण्याची गरज यावर चर्चा सुरू झाली. हा उल्लेखनीय टप्पा गॅलरीच्या पुरस्कारप्राप्त डिझाइन आणि प्रदर्शनात असलेल्या उल्लेखनीय वस्तूंमागील कथांचे प्रतीक आहे. गॅलरी शक्य केल्याबद्दल मी अदानी ग्रीन एनर्जीचा त्यांच्या उदार प्रायोजकत्वाबद्दल आभारी आहे.

# अभिनेत्रींनी उज्ज्वल भविष्य आणि समृद्धतेसाठी त्यांच्या धनत्रयोदशी परंपरांबाबत सांगितले!



**मुंबई, १७ ऑक्टोबर :** दिवाळी सणाचा पहिला दिवस धनत्रयोदशी भारतातील कुटुंबांमध्ये आनंद, भक्ती आणि समृद्धतेचा क्षण आहे. असा विश्वास आहे की, या दिवशी केलेली खरेदी व विधी व्यक्तीच्या जीवनात उज्ज्वल भविष्य आणि सकारात्मक ऊर्जा घेऊन येते. कुटुंबं हा शुभ दिवस साजरा करण्यासाठी तयारी करत असताना एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री प्रियमवदा कांत (लतिका, 'घरवाली पेडवाली'), हिमानी शिवपुरी (कटोरी अम्मा, 'हप्पू की उलटन पलटन') आणि विदिशा श्रीवास्तव (अनिता भाबी, 'भाबीजी घर पर है') शुभ लाभ आणि समृद्धतेसाठी त्यांच्या धनत्रयोदशीला पालन करणाऱ्या काही परंपरा आणि विधींबाबत सांगत आहेत. एण्ड टीव्हीवरील आगामी मालिका 'घरवाली पेडवाली'मध्ये लतिकाच्या भूमिकेत पाहायला मिळणाऱ्या प्रियमवदा कांत म्हणाल्या, ''धनत्रयोदशी सण माझ्यामध्ये कृतज्ञता आणि समृद्धता जागृत करते. माझा हा दिवस साध्या, पण अर्थपूर्ण पद्धतीने साजरा करण्यावर विश्वास आहे. दरवर्षी मी पहाटे लवकर उठून दिवा लावते आणि आरोग्य व आनंदासाठी लक्ष्मीदेवीची प्रार्थना करते. मी काहीतरी धातूच्या वस्तू, सामान्यत: चांदीची नाणी किंवा भांडी खरेदी करते, कारण ते उज्ज्वल भविष्य घेऊन येतात असे मानले जाते.''

# टाटा मोटर्स कमर्शियल वेईकल्सने प्रमुख एलपीओ १८२२ बस चेसिसच्या लॉंचसह इंटरसिटी गतीशीलतेला नव्या उंचीवर नेले



**मुंबई, १७ ऑक्टोबर :** टाटा मोटर्स कमर्शियल वेईकल्स या भारतातील व्यावसायिक गतीशीलतेमधील अग्रणी कंपनीने आज आतापर्यंतचे त्यांचे सर्वात प्रगत इंटरसिटी प्लॅटफॉर्म नवीन टाटा एलपीओ १८२२ बस चेसिस लॉंच केले. लांब पल्ल्याच्या प्रवासी वाहतूकीमध्ये नवीन मापदंड स्थापित करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेले एलपीओ १८२२ आरामदायीपणा, कामगिरी आणि कार्यक्षमतेमधील अग्रणी झेप आहे, ज्यासह मास मोबिलिटीच्या भविष्याला आकार देण्यामध्ये टाटा मोटर्सचे नेतृत्व अधिक दृढ झाले आहे.

टाटा एलपीओ १८२२ फुल-एअर सस्पेंशन आणि कमी एनव्हीएच (नॉइज, व्हायब्रेशन व हार्शनेस) पैलूंच्या माध्यमातून सर्वोत्तम राइड अनुभव देते, ज्यामधून प्रवाशांना व ड्रायव्हर्सना थकवा न येता प्रवासाचा आनंद मिळतो. ३६ ते ५०-आसनीपर्यंतचे स्थिर कॉन्फिगुरेशन्स आणि स्लीपर लेआऊट्ससह चेसिस भारतातील विस्तारित होत असलेल्या परिवहन क्षेत्रामधील ताफा ऑपरेअर्सच्या सर्वसमावेशक गरजांची पूर्तता करण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे.

या लॉंचबाबत मत व्यक्त करत टाटा मोटर्स कमर्शियल वेईकल्सच्या कमर्शियल पॅसेंजर वेईकल बिझनेसचे उपाध्यक्ष व प्रमुख श्री. आनंद एस. म्हणाले, ''भारतातील इंटरसिटी परिवहन परिसंस्थेमध्ये परिवर्तन होत आहे, ज्याचे श्रेय वाढती कनेक्टीव्हीटी आणि ग्राहकांच्या वाढत्या अपेक्षांना जाते. टाटा एलपीओ १८२२ प्रगत उत्पादन आहे, ज्यामध्ये उच्च राइड दर्जा, प्रबळ रचना आणि सर्वोत्तम वैशिष्ट्ये आहेत, जी अद्वितीय मूल्य देतात. प्रवासी, ड्रायव्हर्स आणि ताफा मालकांसाठी हे लाभदायी आहे, जेथे आरामदायीपणामध्ये वाढ करण्यात आली आहे, सुरक्षितता वाढवण्यात आली आहे अणि अधिक लाभाची खात्री मिळते.''

मूल्य तत्त्व अधिक वाढवत एलपीओ १८२२ टाटा मोटर्सच्या नेक्स्ट जनरेशन कनेक्टेड वेईकल प्लॅटफॉर्म फ्लीट एजच्या पूरक चार वर्षांच्या सबस्क्रिप्शनसह येते. फ्लीट एज ऑपरेटर्सना रिअल-टाइम डायग्नोस्टिक्स, अंदाजात्मक देखभाल आणि डेटा-संचालित फ्लीट ऑप्टिमायझेशनसह सक्षम करते, ज्यामधून स्मार्ट, अधिक लाभदायी कार्यसंचालनांची खात्री मिळते.

# समृद्धी, प्रकाश आणि सगळ्यांना एकत्र आणणाऱ्या धनत्रयोदशीच्या परंपरांविषयी सांगत आहेत सोनी सबचे कलाकार



**मुंबई, १७ ऑक्टोबर :** धनत्रयोदशीपासून दिवाळीची मंगल सुरुवात होते. हा दिवस समृद्धी, सौभाग्य आणि नवीन शुभारंभाचे प्रतीक आहे. घर दिव्यांनी सजवले जाते आणि सर्व कुटुंबीय एकत्र येऊन सुख, आरोग्य, धनसंपदेसाठी देवाची पूजा-अर्चना करतात. हा विशेष दिवस साजरा करताना करुणा पांडे, ऋषी सक्सेना, रजत वर्मा आणि मोहित मलिक आपल्या धनत्रयोदशीच्या आठवणी आणि या सणाचे माहात्म्य सांगत आहेत.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पाची भूमिका करणारी करुणा पांडे म्हणते, माझ्यासाठी धनत्रयोदशी हा कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि नवीन शुभारंभाचा आनंद साजरा करण्याचा सण आहे. दर वर्षी, मी आणि माझा नवरा मिळून घर स्वच्छ करून सजवतो, दिव्यांनी घर उजळून टाकतो आणि चांदीच्या नाण्यासारखी सकारात्मकतेचे प्रतीक असणारी एखादी वस्तू खरेदी करतो.

इत्ती सी खुशी मालिकेत संजयची भूमिका करणारा ऋषी सक्सेना म्हणतो, लहान असताना मला आठवते आहे, धनत्रयोदशीपासून आमचा दिवाळीचा आनंदोत्सव सुरू होत असे. माझे आईवडील सायंकाळी पूजा करत असत आणि आम्ही नव्या नव्या गोष्टी खरेदी करायचो.

इत्ती सी खुशी मालिकेत विराटची भूमिका करणारा रजत वर्मा म्हणतो, धनत्रयोदशी मला दिवाळीच्या फटाक्यांपूर्वीची शांतता वाटते. एक शांतपणे विचार करण्याचा क्षण, स्वच्छता करण्याचा आणि शुभ ऊर्जेचे स्वागत करण्याचा क्षण.

'गणेश कार्तिकेय' मालिकेत शंकराची भूमिका करणारा मोहित मलिक म्हणतो, माझ्यासाठी धनत्रयोदशी म्हणजे पुढील मार्गक्रमणासाठी देवाचा आशीर्वाद घेण्याचा सण. मी स्वतः आध्यात्मिक परंपरा भक्तिभावाने जपतो, त्यामुळे माझ्यासाठी आपले उद्दिष्ट योग्य दिशेने वळवण्याचा, सकारात्मकतेने आणि देवाच्या कृपेने नवीन सुरुवात करण्याचा हा दिवस आहे. आपल्या कुटुंबासोबत लक्ष्मीचे पूजन करताना घरात शांती आणि प्रकाशाचा संचार झाल्यासारखे वाटते.


## आज का अंदाज

शनिवार १८ ऑक्टोबर २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | मुंबई बाजार |
|---|---|
| २ ३ ६ ९ | जोडी |
| २०० १३९ १६९ २३४ | |
| ३९० २३८ ४५७ ४७८ | जोडी |
| ४८० ३३७ ३३० ५५९ | |
| २४ ३४ ६१ ९१ | |
| २७ ३७ ६५ ९५ | |
| २८ ३८ ६४ ९४ | |

**१८ ऑक्टोबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १० | ४० | ७९ | ८९ |
| १२ | ४२ | ७३ | ८३ |
| १६ | ४६ | ७५ | ८५ |
| ४७० | ४०० | ३७७ | २६० |
| ५६० | ५९० | ४५८ | ३५० |
| ३८० | ६८० | ५५७ | ४४० |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


# श्रद्धा आर्याने रचना मिस्त्री आणि विजयेंद्र कुमेरियाचे केले कौतुक



**मुंबई, १७ ऑक्टोबर :** झी टीव्ही ही वाहिनी नेहमीच मनोरंजनाचा नवीन अर्थ सांगत आली आहे. भारतीय संस्कृतीचा सार आणि प्रेक्षकांचा त्यांच्या आवडत्या कलाकारांशी असलेला भावनिक संबंध साजरा करणाऱ्या नवनवीन संकल्पना त्यांनी नेहमीच सादर केल्या आहेत. आपल्या नवीन ब्रँड तत्वज्ञानाशी प्रामाणिक राहत झी टीव्ही पुन्हा एकदा रंगीबेरंगी आणि मनाला स्पर्शणारा सोहळा झी रिश्तों का मेला घेऊन येत आहे. हा भव्य उत्सवाचा दिवाळी विशेष भाग असून प्रेक्षकांना त्यांच्या टीव्ही स्क्रीनवर जादू अनुभवायला मिळणार आहे.

या कार्यक्रमात झी टीव्हीचे आवडते कलाकार प्रेक्षकांसोबत साजरा करताना अप्रतिम परफॉर्मन्सेस, भावस्पर्शी क्षण आणि अविस्मरणीय फॅन इंटरॅक्शन पाहायला मिळणार आहे. या सोहळ्याची रंगत आणखी वाढवण्यासाठी ऊर्जावान जोडी श्रद्धा आर्या आणि जय भानुशाली सूत्रसंचालन करत आहेत. त्यांच्या आकर्षक व्यक्तिमत्वाने, विनोदी शैलीने आणि उत्साहाने ते नात्यांचा, भावनांचा आणि मनोरंजनाचा हा भव्य सोहळा अधिक खास बनवणार आहेत.

कार्यक्रमादरम्यान, कुंडली भाग्य या मालिकेत प्रीता म्हणून प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणाऱ्या श्रद्धा आर्याने जागृति एक नयी सुबह या मालिकेतील मुख्य कलाकारांचे कौतुक केले. ती म्हणाली, करण-प्रिताची आठवण करून दिलीत.

## राशीभविष्य

**मेष :** कामात घाई टाळा.गुंतवणुकीत घाई नको, मोठ्यांचा सल्ला घ्या. व्यवसायात गांभीर्याने काम करा आणि मार्गदर्शन घ्या. कामाच्या ठिकाणी प्रियजनांची मदत घ्या, तुमचे काम यशस्वी होईल.

**वृषभ :** आज तुम्हाला व्यवसायात चांगला नफा मिळेल, ज्यामुळे तुमची स्वप्ने लवकरच पूर्ण होतील. तुमचे वैवाहिक जीवन आनंदी राहील आणि तुमची मुलेही मनापासून अभ्यास करतील.

**मिथुन :** आज तुम्ही एखादा मोठा वैयक्तिक निर्णय घेऊ शकता, ज्याला सकारात्मक प्रतिसाद मिळेल. आज तुमचा व्यवसाय भरभराटीला येईल आणि भौतिक सुखसोयी वाढतील. तुमचे आरोग्य चांगले राहील.

**कर्क :** वैयक्तिक बाबींवर लक्ष केंद्रित करा. जुन्या समस्यांपासून तुम्हाला आराम मिळेल. तुम्हाला इतरांकडून पाठिंबा आणि सल्ला मिळेल. तुम्हाला परदेशातून चांगली बातमी मिळू शकते.

**सिंह :** आज तुम्हाला नवीन रोजगाराच्या संधी मिळतील, ज्यामुळे तुमच्या आर्थिक समस्या सोडवण्यास मदत होईल. तुमच्या कायदेशीर बाबी एखाद्याच्या मदतीने सोडवल्या जातील, ज्यामुळे दिलासा मिळेल.

**कन्या :** आज तुम्ही अध्यात्मात काही वेळ घालवाल, ज्यामुळे तुमच्या मनाला शांती मिळेल. तुम्हाला दीर्घकाळापासून असलेल्या समस्येतून आज आराम मिळेल. महिला आज नवीन प्रकल्प सुरू करू शकतात.

**तुळ :** तुम्ही ऑफिसच्या कामात व्यस्त असाल आणि थोडा थकवा जाणवू शकतो. अनुभवी लोकांचा सल्ला तुमच्या व्यवसायाला एक नवीन दिशा देईल. तुमची आर्थिक परिस्थिती सामान्य राहील.

**वृश्चिक :** तुम्हाला वडीलधाजयांच्या सेवांचा लाभ होईल आणि त्यांचे आशीर्वाद तुमच्या जीवनातील कोणत्याही समस्या सोडवण्यास मदत करतील. अनेक दिवसांपासून रखडलेले काम पूर्ण होईल.


**धनु :** आज, कोणतेही काम गांभीर्याने केले तर यश मिळेल. तुम्ही तुमचा व्यवसाय वाढवण्यासाठी एक नवीन शाखा उघडू शकता. तुम्ही मालमत्तेत गुंतवणूक करण्याची योजना देखील आखू शकता.

**मकर :** आज, तुम्हाला एका मोठ्या कंपनीकडून नोकरीची ऑफर मिळेल आणि तुम्ही तुमची मुलाखत यशस्वीरित्या उत्तीर्ण व्हाल. तुम्हाला एका शारीरिक समस्येपासून मुक्तता मिळेल.

**कुंभ :** आज, तुम्ही तुमची कामे पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित कराल आणि तुमचे बहुतेक प्रयत्न यशस्वी होतील. नवीन वाहन खरेदी करण्याबद्दल तुम्ही उत्साहित असाल.

**मीन :** तुम्ही एक नवीन टप्पा गाठण्यात यशस्वी व्हाल आणि तुमचे कौतुक होईल. आज तुम्ही सामाजिक कार्यात सहभागी व्हाल, ज्यामुळे तुमची प्रतिमा उंचावेल. सरकारी योजनेचा लाभ घेण्यास तुम्ही यशस्वी व्हाल.

## शब्दकोडे क्रमांक २२४२



**आडवे शब्द :–**
१) अंत नसलेला, पुष्कळ
३) प्रहार, घाव
५) पायापर्यंत लोंबणारा अनेक पदरी माळ
१०) नोकरी करणारा
१२) असुर
१४) आश्चर्याची गोष्ट
१७) प्रवासातील टप्पा
१८) शक्ती, बळ
१९) मनाचा ओढा
२०) कोवळा अंकुर
२१) धनुष्यातून बाण सोडणे
२४) तमाशातील प्रसिद्ध गीत प्रकार
२५) हिंदीत पत्र
२६) सर्वत्र आनंदी वातावरण असलेले एक गीत ***
*** ** इकडे तिकडे चोहीकडे
२९) डोसा, भाजण्याचे उथळ पात्र
३०) चौर्यकर्म करणारा
३१) चक्र
३२) भ्रम, जादू
३४) सोन्याची साखळी
३६) मृद
३७) किंचित छोटे
३८) उदार मनाचा, दानवीर, कर्णाचे एक विशेषण
४०) अरण्य
४१) हरामी, विश्वासघातकी
४४) गव्हाचे बारीक पीठ
४५) वारा घेण्याचे एक साधन
४८) पालिकेतील लोकप्रतिनिधी
५०) युद्ध
५२) बाळाच्या डोक्यावरचे जन्मजात केस
५३) अनुमती, मान्यता
५४) एक खनिज द्रव याला संस्कृतमध्ये पारद म्हणतात
५५) च्या साठी
५७) एकाद्याची मुलेबाळे, संतती
५७) राबता, उपभोग, जाणयेणे
६०) जपजाप्य
६३) सामान
६४) पवित्र
६६) ढग
६७) लेख लिहिणारा
६८) सरस्वती
७०) लक्ष्मीचे एक नाव
७१) दिव्यांचा झगमगता प्रकाश

**उभे शब्द :–**
१) अत्यंत गरजेच्या वेळी
२) घोड्याचे घर
३) बोलणे, जीभ
४) आभूषणे, दागदागिने
५) जास्तीत जास्त
६) स्वाभिमानी, बाणेदार
७) सुकामेव्यातील सुरकुतलेला पदार्थ
८) मोठी टोपली
९) रक्षण करणारा
११) पैंजणाचा पांढरा धातू
१३) पुरुषांच्या हातातील शौर्याचे, किंवा मंतरलेले कडे
१५) दिखाऊ
१६) परमेश्वर
१८) बलवान, ताकद असलेला
२२) पहारेकरी
२३) स्वा. सावरकरांनी शिक्षा भोगलेले भारताचे एक बेट
२६) नाविक दल
२७) जाणणे, माहिती होणे, ग्रहण होणे
२८) हरविलेले सापडणे
२९) अंधार
३३) भांडण, बितुष्ट
३४) महात्मा गांधीजींचे अखेरचे शब्द
३५) संगीतात छेडलेली लकेर
३९) युद्ध करताना आलेला मृत्यू
४०) कमीशन, बट्टा
४२) कमळ
४३) खरा नसलेला
४४) दक्षिणेकडच्या समुद्रापासून उत्तरेकडच्या हिमालयापर्यंत
४६) विशेष
४७) सुताराकडील दातेरी हत्यार
४८) नमस्कार
४९) अलमारी
५१) झकास
५२) एक सुगंधी फूल
५३) खूप रागावलेला
५६) उदा., ज्ञानेश्वर, तुकाराम
५८) एक द्विदल धान्य
५९) मूर्ख
६०) पाणी
६१) शौर्याचे चिन्ह असलेला बिल्ला
६२) संपूर्ण
६४) गवताचे पान
६५) धनमी
६६)सातू, एक बारीक धान्य
६८) पाण्याचा प्रवाह, फळी
६९)रम्य

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# नेहरु मैदानाच्या संरक्षणासाठी काँग्रेस पक्ष जनआंदोलन उभारणार

■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. १७ :**




नेहरु मैदानाच्या संरक्षणासाठी काँग्रेस पक्ष जनआंदोलन उभारणार असल्याची घोषणा आज, मंगळवारी येथे करण्यात आली. काँग्रेसचे महानगर अध्यक्ष बबलू शेखावत, माजी अध्यक्ष किशोर बोरकर आणि तीन माजी महापौरांच्या उपस्थितीत श्रमिक पत्रकार भवनात झालेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली. त्याचवेळी, कचरा उचलण्याचे कंत्राट नव्याने देण्याच्या महानगरपालिकेच्या भूमिकेला काँग्रेसने पाठिंबा दर्शवला.

नेहरु मैदान हे अमरावती शहराचा मानबिंदू असून, शहराच्या मध्यभागी असलेले हे एकमेव मैदान आहे. या मैदानावर अनेक ऐतिहासिक सभा आणि राष्ट्रीय पातळीवरील क्रीडा स्पर्धा, ज्यात महापौर चषक कबड्डी स्पर्धेचा समावेश आहे, आयोजित करण्यात आल्या आहेत. हे मैदान समाजासाठी एक महत्त्वपूर्ण देणगी असून, महानगरपालिकेच्या नवीन इमारतीसाठी ते नष्ट करणे योग्य नाही, असे काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी म्हटले.

महानगरपालिकेने या ठिकाणी बहुपयोगी इमारत बांधण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यात तळमजल्यावर व्यापारी गाळे आणि वरच्या मजल्यावर प्रशासकीय कार्यालये असतील. तसेच, मनपाच्या जुन्या जागेवरही व्यापारी संकुल उभारण्याचा प्रशासकीय प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. स्थानिक आमदार सुलभाताई खोडके आणि विधानपरिषद सदस्य संजय खोडके यांनी या प्रस्तावाला पाठिंबा दिला असला तरी, नेहरु मैदानाचे व्यापारीकरण कदापिही होऊ देणार नाही, यासाठी जनआंदोलन उभारले जाईल, असा पुनरुच्चार काँग्रेसने केला.

या पत्रकार परिषदेला माजी महापौर विलास इंगोले, काँग्रेसचे नेते मुन्ना राठोड, माजी महापौर आणि काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते मिलींद चिमोटे, माजी महापौर अशोक डोंगरे, युवक काँग्रेसचे समीर जवंजाळ व वैभव देशमुख, मनपा स्थायी समितीचे माजी सभापती बाळासाहेब भुयार आणि एनएसयुआयचे संकेत कुलट यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

शहरात काही व्यक्ती कचरा माफिया बनले असून, महानगरपालिकेच्या प्रशासकीय राजवटीत काही लोकप्रतिनिधींच्या जवळच्या व्यक्तींनाच कचरा उचलण्याचे कंत्राट मिळाल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. यावर लगाम घालणे आवश्यक असल्याचेही काँग्रेसने म्हटले.

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा-चांडक यांनी या संदर्भात कठोर पाऊल उचलले असून, सध्याचे कचरा कंत्राट बदलण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेसने आयुक्तांच्या या भूमिकेचे स्वागत केले असून, त्यांच्या या स्तुत्य कार्याला पाठिंबा दर्शवला आहे.

## 'ई ऑफीस' डिजिटल प्रशासनाच्या दिशेने पाऊल

### जिल्हाधिकारी कुंभेजकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण

■ महासागर प्रतिनिधी
**वाशीम , दि. १७ :**



शासकीय कामकाजात पारदर्शकता, वेग आणि कार्यक्षमता आणण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, वाशीम येथे ई-ऑफिसप्रणालीबाबतचे प्रशिक्षण जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या प्रशिक्षणामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय तसेच विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. प्रशिक्षणात ई-ऑफिस प्रणालीचा उद्देश, फायदे, वापरण्याची पद्धत, फायलींचे डिजिटायझेशन, मंजुरी प्रक्रिया, दस्तऐवजांची नोंदणी आणि ट्रॅकिंग प्रणाली याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र जाधव, उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव, कारंजा उपविभागीय अधिकारी कैलास देवरे, वाशीम उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, तहसीलदार, सर्व गटविकास अधिकारी उपस्थित होते.

प्रशिक्षणादरम्यान जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ‌प्रशासनाच्या कामकाजात वेग, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्यासाठी ई-ऑफिस प्रणाली अत्यंत आवश्यक आहे.

पारंपरिक कागदावर आधारित कार्यपद्धतीला डिजिटल रूप देऊन प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्याने या प्रणालीचा प्रभावी वापर करणे गरजेचे आहे. डिजिटायझेशन हे आजच्या प्रशासनाचे मूलभूत अंग बनले असून, त्याद्वारे नागरिकांना अधिक तत्पर आणि अचूक सेवा देता येते, असे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व शाखांना आता ई-ऑफिसप्रणालीवर काम करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याने या डिजिटल प्रक्रियेचे ज्ञान आत्मसात करून कार्यक्षमता वाढवावी, असे आवाहन करण्यात आले. या प्रशिक्षणामुळे जिल्हा प्रशासनाच्या कामकाजात गती येणार असून, डिजिटल गव्हर्नन्सच्या दिशेने जिल्ह्याचे एक पाऊल असणार असल्याचे प्रतिपादन उपस्थित अधिकाऱ्यांनी केले. उपस्थितांना प्रणालीतील सर्व टप्प्यांची माहिती प्रशिक्षणादरम्यान डीपीएम राहुल काकड यांनी ई-ऑफिसप्रणालीचे प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांना प्रणालीतील सर्व टप्प्यांची माहिती दिली. ऑनलाइन फाईल तयार करणे, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवणे, मंजुरी मिळविणे आणि नोंदी ठेवण्याच्या प्रक्रियेचे सविस्तर प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

## धर्म हे वैश्विक मानवतेचे साध्य असावे : डॉ. खोब्रागडे

■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. १७ :**



वर्तमान जगात धर्माने सर्वत्र मांडलेला उच्छाद पाहता धर्म ही सत्ता गाजवण्याचे साधन आहे का, असा प्रश्न पडतो. धर्माचे आचरण करणे म्हणजे इतरांवर जबरदस्ती, श्रेष्ठत्व सिद्ध करणे हे असूच शकत नाही. मात्र सध्या माझा धर्म कसा श्रेष्ठ आहे. याची जणू चढाओढ लागली आहे. धर्म हे सत्तेचे साधन नाही, तर वैश्विक मानवतेचे साध्य असायला पाहिजे.

पारंपरिक धर्म संकल्पनेत माणूस हा केवळ कुठल्याशा बाह्यशक्तीच्या हातचे बाहुले असून, ती शक्ती त्याच्याकडून आराधनेची अपेक्षा करते, त्याला कर्मकांडात गुंतवून, ते न केल्यास शिक्षेचा धाक दाखवते, त्याच्या 'स्व'च्या अस्तित्वावर गदा आणून त्याचे स्वातंत्र्य नाकारते. खऱ्या अर्थाने धर्म हा नीतीमत्तेवर आधारित असला पाहिजे. धर्मात श्रेष्ठ कनिष्ठ असा भेद नसावा. धर्मात माणूस आणि परात्पराचा संबंध नसावा. धर्म विवेकनिष्ठ, विज्ञाननिष्ठ असावा.

धर्माने प्रत्येक व्यक्तीला समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय प्रदान केले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी यासंदर्भात जगातील सर्वच धर्मांचा सखोल आणि चिकित्सक अभ्यास केला आणि बुद्ध धम्माला परिशुद्ध करून स्वीकार केला.

बुद्धाचा धम्म हा आचरणाचा धम्म आहे, असे विचार विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. रत्नशील खोब्रागडे यांनी मांडले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभाग, विद्यार्थी अभ्यास मंडळाच्या वतीने आयोजित 'धम्मचक्र प्रवर्तन-डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि आजचे वास्तव' या विषयावर ते अध्यक्षीय भाषण करत होते.

या वेळी व्याख्याते म्हणून सिनेट सदस्य डॉ. रवींद्र मुंद्रे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागाचे डॉ. वामन गवई, डॉ. भीमराव वाघमारे, डॉ. पवन तायडे, प्रा. सुरेश पवार, प्रा. असित गुर्जर, प्रा. तेजस गुर्जर, प्रा. दादाराव मुटकुरे, अभ्यास मंडळाचे अध्यक्ष बी. एल. वानखडे, उपाध्यक्ष संजय घरडे उपस्थित होते.

डॉ. खोब्रागडे म्हणाले, बुद्धाचा धम्म स्वीकारणे किंवा पालन करणे हे केवळ बाह्य वर्तनाने शक्य नाही. प्रसन्न चित्ताने केलेले कोणतेही कार्य बुद्धाच्या धम्माचे पालन होय. बुद्धांनी मनाच्या ६४ अवस्था सांगितल्या असून, माणसाने चित्ताची शुद्धी करणे गरजेचे आहे. आपले काय चुकते हे लक्षात ठेवून मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असेही ते म्हणाले.

या वेळी सविता मेश्राम, विद्याशीती गुडधे, वंदना काळपांडे आणि चमूने भीमरायांनी देशावरती हे गीत सादर केले. सुरेखा लांडगे, डॉ. रवींद्र खंडारे, भंते अमर ज्योती, प्रफुल्ल कडू, मदन गायकवाड या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा अभ्यासक्रमाच्या प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन अलका वर्धे व सुबोध काळे यांनी केले. तर अभ्यास मंडळाचे सचिव गौतम खंडारे यांनी आभार मानले. गझलकार सुदाम सोनुले, धर्मशील गेडाम, विलास थोरात, आर. एस. तायडे, जगदीश गोवर्धन, वाघमारे, संदीप राऊत, अमरावती शहरातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते, अभ्यासक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी अभ्यास मंडळाचे सहसचिव अरुण गजभिये, पद्मवी आठवले, गोंडाणे, सुधाकर तलवारे, प्रविणा चिंचोले यांनी परिश्रम घेतले. डॉ. रवींद्र मुंद्रे म्हणाले, जग ही संकल्पना केवळ महासागर, पर्वत वा नदीनाले, जंगले नाहीत, तर जग म्हणजे या पृथ्वीतलावर राहणारा प्रत्येक मानवी समूह आणि त्या समूहाच्या जीवन जाणिवा, त्याचा विचार आचार, त्याची समुचित संरचना होय. या जगात दुःख आहे हे शाश्वत सत्य आहे.

दुःखाचे कारण तृष्णा आहे. त्याचे निरसन हे तृष्णेच्या त्यागाने शक्य आहे. ही आर्य सत्ये सांगून जगातील मानवाला 'स्व'चा शोध घेण्याचे स्वातंत्र्य बहाल करणारा बुद्ध विचार, बुद्धांच्या धम्माला इतर धर्मापासून वेगळा ठरवतो. आजच्या वास्तवात धर्म हा सत्तेचा गुलाम आणि सत्ता ही द्वेषाची गुलाम होत चालली आहे. या द्वंद्वात माणूस मात्र माणसापासून तुटत चालला आहे. हा धोका ओळखून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञांचा अवलंब आपल्या आचरणात करून माणसाला समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय देणारी धम्म ... डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेली जगाची पुनर्रचना केली पाहिजे. असेही ते म्हणाले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयात 'वाचन प्रेरणा दिन' साजरा

■ महासागर प्रतिनिधी




**अकोला, दि. १७ :** डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्म रामेश्वरम येथे एका अत्यंत गरिब कुटुंबात झाला. मी स्वतः त्यांच्या निवासस्थानी भेट दिली आहे. त्यांनी सर्व अडचणींवर मात करत शिक्षणाला सर्वाधिक प्राधान्य दिले. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी शिक्षणाच्या बळावर ते राष्ट्रपती झाले. त्यांनी जगाला दाखवून दिले की, शिक्षणच माणसाला उंचीवर नेते, असे प्रतिपादन डॉ. धनंजय नालट यांनी केले.अशोक नगर, पिंपळ फाईल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालयात, भारताचे माजी राष्ट्रपती आणि सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. धनंजय नालट बोलत होते. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशोक रामटेके यांनी पुष्पगुच्छ देऊन डॉ. धनंजय नालट यांचे स्वागत केले. सुरुवातीला डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर अशोक रामटेके यांनी सांगितले की, भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन म्हणजेच १५ ऑक्टोबरला वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. ते भारताचे अकरावे राष्ट्रपती होते .अब्दुल कलाम यांचे अग्निपंख हे आत्मचरित्र संपूर्ण जगात प्रसिद्ध आहे.

मराठी भाषेचे जतन व संवर्धन करणे मराठी भाषेचा सुगंध चारही दिशेने दरवळण्यासाठी आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. त्यामुळे वाचन संस्कृती टिकेल. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आज अत्यंत गरजेचे आहे, असे विचार अशोक रामटेके यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाला आशा रामटेके, शुभम रामटेके, अनिल महाजन, दीपा महाजन, नरेंद्र माने, सुनील रामटेके ,संगीता रामटेके, जयाली गजभिये , मनस्वी गजभिये तसेच सभासद, नागरिक उपस्थित होते.

## येवद्याच्या दिव्यांग सृष्टीची नृत्यकलेत भरारी

■ महासागर प्रतिनिधी
**येवदा , दि. १७ :**

जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर आयुष्यातील सर्व अडथळ्यांवर मात करत आपले स्वतंत्र स्थान निर्माण करणारी येवदा येथील दिव्यांग (मूकबधीर) नर्तकी सृष्टी सविता प्रकाश तायडेने नृत्यकलेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. दिव्यांग असूनही सृष्टीने आतापर्यंत ५० हून अधिक स्पर्धा व राज्यस्तरीय नृत्य स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळवून भरारी घेत कलेचे वर्चस्व सिद्ध केले आहे.

अमरावती येथील सेंट थॉमस प्रशासकीय महाविद्यालयातील एम. ए. (योगशास्त्र) अभ्यासक्रमाची विद्यार्थिनी असलेली सृष्टी तायडे नुकत्याच कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक येथे झालेल्या 'इंद्रधनुष्य-निवड फेरी २०२५-२०२६' स्पर्धेत कथ्थक नृत्य (सोलो) या प्रकारात प्रथम क्रमांकाची विजेती ठरली आहे. तिची निवड आता राज्यस्तरीय अंतिम फेरीसाठी (जळगाव) झाली आहे. कथ्थकमध्ये तिला गायनसाथ विवेक गावंडे यांनी केली.सृष्टीला बालवयापासूनच नृत्याची आवड होती. तिने कथ्थक या शास्त्रीय नृत्यप्रकाराचे शिक्षण घेतले. इतरही नृत्यात ती पारंगत आहे. मुंबईच्या अंधेरी (पश्चिम) येथील प्रसिद्ध किंग्स अकॅडमीत तिने वेस्टर्न नृत्याचे प्रशिक्षण घेतले. शास्त्रीय नृत्याबरोबरच सृष्टीने बॉलिवूड, फोक, फ्युजन, चित्रपट गीते, रंगोली, मेहंदी, क्राफ्ट वर्क आणि डेकोरेशन यासारख्या विविध कलांमध्येही प्रावीण्य मिळवले आहे. सृष्टी तायडे ही कलासंस्कार अकादमी, दर्यापूर येथील कथ्थक गुरु अर्चना जितेश रापर्तीवर यांच्या मार्गदर्शनात प्रशिक्षण घेत आहे. तिने यशाचे श्रेय कुटुंबीयांसह गुरु अर्चना व जितेश रापर्तीवर यांना दिले आहे. सेंट थॉमस कॉलेज अमरावतीचे अध्यक्ष डॉ. सिकंदर मनवरे, प्राचार्या संजीवनी मनवरे, प्रा. प्रणय मनवरे, प्रा.स्वप्निल ईखार, प्रा. शांता गाडगे, प्रा. सुमेध गावंडे, प्रा. शिल्पा गजभिये, प्रा. कल्पना राऊत तसेच कर्मचारी पंकज गजभिये व आकाश मेश्राम यांनी तिचा सत्कार केला.

## दिवाळीत गरिबाच्या 'आनंदाचा शिधा' हरवला

■ महासागर प्रतिनिधी



**दिग्रस दि. १७ :** यंदाच्या दिवाळीत शिधापात्र कुटुंबांचा 'आनंदाचा शिधा' हिरावला असून, सणासुदीच्या काळात गोडव्यालाही तडा गेला आहे. सार्वजनिक वितरण प्रणालीतून (राशन दुकानांद्वारे) मिळणाऱ्या शिध्यात गेल्या काही महिन्यांपासून साखरेचे वाटप पूर्णपणे बंद आहे. त्यामुळे दिवाळीच्या ताटातला गोडवा हरपल्याची भावना लाभार्थ्यांकडून व्यक्त होत आहे. सध्याच्या शिधा वितरणानुसार प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना फक्त ३ किलो तांदूळ आणि २ किलो ज्वारी, तर अंत्योदय लाभार्थ्यांना १५ किलो ज्वारी व २० किलो तांदूळ इतकाच शिधा मिळत आहे. मात्र साखर वाटप बंद असल्याने गरीब कुटुंबांना सणासुदीचा गोडवा अनुभवता आलेला नाही. या शिवाय मागील चार महिन्यांपासून रास्त भाव दुकानदारांना कमिशन न मिळाल्याने तेही आर्थिक अडचणीत आले आहेत. शासनाच्या उदासीन धोरणामुळे लाभार्थी आणि दुकानदार दोघेही हवालदिल झाले आहेत. मागील वर्षी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सरकारकडून 'आनंदाचा शिधा किट' वाटप करण्यात आले होते. त्यात १ किलो साखर, १ किलो तेल, अर्धा किलो पोहा, अर्धा किलो रवा, अर्धा किलो चनादाळ आणि अर्धा किलो मैदा यांचा समावेश होता. मात्र यंदा ही योजना थांबविण्यात आल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

## शॉक लागल्याने शेतकऱ्याचा मृत्यू

**यवतमाळ :** जंगली प्राण्यांच्या त्रासापासून शेतीचे रक्षण करण्यासाठी शेतात विद्युत तारा लावण्यात आल्या. या तारेच्या संपर्कात आल्याने धानोरा (वडगाव) येथील अंकुश अरुण नेवारे (३३) यांचा मृत्यू झाला. अंकुश आपल्या शेतात पाहणीसाठी गेले असता, त्यांचा चुकून कंपाऊंडला असलेल्या तारेस स्पर्श झाला. विद्युत प्रवाहाच्या तीव्रतेमुळे ते जागीच कोसळले. घटनेनंतर ग्रामस्थांनी धाव घेतली, मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. घटनेची माहिती मिळताच वडगाव जंगल पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. अंकुश नेवारे यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, मुलगा, मुलगी असा मोठा परिवार आहे.

## हेमंत (मन्नू) लिल्हारे यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

**प्रतिनिधी / गोंदिया**

जिल्ह्याच्या तसेच तिरोडा शहराच्या राजकारणात आज एक महत्त्वपूर्ण राजकीय घडामोड घडली आहे. खासदार प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून मनसेचे जिल्हाध्यक्ष हेमंत (मन्नू) शोभेलालजी लिल्हारे यांनी आपल्या समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. या निर्णयामुळे मनसे पक्षाला मोठा धक्का बसला असून राष्ट्रवादी काँग्रेसच्या संघटन बळकटीसाठी हा प्रवेश लाभदायक ठरणार आहे.

हा पक्ष प्रवेश माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत तिरोडा येथे संपन्न झाला. यावेळी त्यांच्या हस्ते हेमंत लिल्हारे व प्रकाश फटिंग,यांना पक्षाचा दुपट्टा परिधान करून औपचारिक प्रवेश देण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी लिल्हारे यांचे मनापासून स्वागत करून भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला राजेंद्र जैन, डॉ अविनाश जायस्वाल, अजय गौर, जिब्राईल पठाण, नरेश कुंभारे, प्रभू असाटी, राजेश गुनेरिया, धोंडूजी लिल्हारे, सलीम जवेरी, ओमप्रकाश येरपुडे, बबलू ठाकूर, नागेश तरारे, भोजराम धामेचा, रामकुमार असाटी, विजय बनसोड, संदीप मेश्राम, जगदीश कटरे, प्रशांत डहाटे तसेच इतर अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## Public Notice

If is hereby informed of the public at large that **Mr. Sharad Sudhakar Nagulkar**. Owner of the vehicle

**1) Bajaj Pulser (MH-31 - CT 3614)**
**2) Honda Aviator (MH 31 - DL 9106)**
**3) Tata Motor Indigo Manza (MH - 31 - DC 7471)**

has Expired , **Mr. Sarang Sharad Nagulkar (Son)**, R/O , PL NO 52 ASHIRWAAD JESWAN, SOCIETY SHASTRI LEYOUT, NAGPUR, NAGPUR, NAGPUR, 440025, MAHARASHTRA, has been succeeded by **Smt. Mr. Sarang Sharad Nagulkar (Son)** and he is resident of, R/O , PL NO 52 ASHIRWAAD JESWAN, SOCIETY SHASTRI LEYOUT, NAGPUR, NAGPUR, NAGPUR, 440025, he being the successor of possession of above mentioned vehicle to confer intent to use the vehicle accordingly, he has applied to **RTO Nagpur** City for the transfer of vehicle on his name any person having any claim or objective in thos regara should inform within 7 days from the date of publication of this notice and bring such fact to that notice of RTO /Transport authority.

Name of Successor
**Mr. Sarang Sharad Nagulkar (Son)**
R/O , PL NO 52 ASHIRWAAD JESWAN,
SOCIETY SHASTRI LEYOUT, NAGPUR,
NAGPUR, NAGPUR, 440025

## Public Notice

If is hereby informed of the public at large that **Mr. Hemangi Sharad Nagulkar**. Owner of the vehicle

**1) Honda Aviator (MH 31 - WS - 0314)**
**2) Maruti Suzuki Celerio (MH - 31 - EU 3571)**

has Expired , **Mrs. Neha Sharad Nagulkar (Daughter) (Old Name) Smt. Neha Nilesh Ghorad (New Name)**, R/O , 159/2 silver alaknanda bungalows near dental collage off pleasure club manipur (bopal) ahmedabad, gujrat - 382115, has been succeeded by **Smt. Neha Nilesh Ghorad (New Name)**, R/O , 159/2 silver alaknanda bungalows near dental collage off pleasure club manipur (bopal) ahmedabad, gujrat - 382115, she being the successor of possession of above mentioned vehicle to confer intent to use the vehicle accordingly, he has applied to **RTO Nagpur** City for the transfer of vehicle on his name any person having any claim or objective in thos regara should inform within 7 days from the date of publication of this notice and bring such fact to that notice of RTO /Transport authority.

Name of Successor
**Smt. Neha Nilesh Ghorad**
R/O , 159/2 silver alaknanda bungalows
near dental collage off pleasure club manipur (bopal)
ahmedabad, gujrat - 382115

## जाहीरनामा

**कोर्ट विद्यमान श्रीमती पुनम कदम, अप्पर तहसीलदार, देवलापार यांचे न्यायालय**

प्र. क्र. / एम आर सी-८१/२०२५
मौजा पिपरिया, ता. रामटेक
जिल्हा नागपूर

ज्याअर्थी श्री.किरान सखाराम वरखडे, रा. हिवरा, ता. रामटेक. जिल्हा. नागपूर यांनी त्यांचे वडील नामे सखाराम कोद्दा वरखडे यांच्या मृत्यू दिनांक ०९/१२/१९८६ रोजी मौजा पिपरिया, ता. रामटेक येथे झाला परंतु त्यावेळेस अर्जदाराच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीनी अर्जदारांच्या वडीलांच्या मृत्यूची नोंद संबंधीत गट ग्रामपंचायत कार्यालय पिपरिया, ता. रामटेक येथे केली नाही. त्याबाबत गट ग्रामपंचायत पिपरिया यांनी दिनांक २०/०८/२०२५ रोजी प्रमाणपत्र दिले आहे. करिता अर्जदार यांच्या वडिलांच्या मृत्यूची नोंद गट ग्रामपंचायत पिपरिया, ता. रामटेक येथे करण्याबाबत आदेश देणे करिता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे सुचित करण्यात येते की, उपरोक्त नामे सखाराम कोदा वरखडे, यांचा मृत्यू दिनांक ०९/१२/१९८६ ची नोंद मौजा पिपरिया, ता. रामटेक येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक २५/१०/२०२५ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक १०/१०/२०२५ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्थळ :- देवलापार
दिनांक :- १०/१०/२०२५

कार्यकारी दंडाधिकारी,
तथाअप्पर तहसिलदार, देवलापार

## शेतजमीन विक्री चे टोकनपत्र / पावती

मौजा रुयाड प.ह.न. क्र ५१ ता. कुही, जि.नागपूर

सौदा प्रति एकर रु. ३२३१०००/-प्रमाणे

टोकन पत्र लिहून घेणार : श्री श्रीमती तेकराम लखनलाल पटले वय ४२ वर्षे, धंदा शेती, रा. तरोडी (नागपूर)

टोकन पत्र लिहून देणार : श्री. श्रीमती चंद्रकांता विष्णूजी मदनकर, धंदा शेती, रा. कामठी

मी लिहून देणार तुम्हाला म्हणजे लिहून घेणार यांना शेती विक्रीच्या टोकनपत्र / पावती लिहून देतो की खालील दर्शवलेली शेती माझे मालकी हक्काची व कब्जेवहीवाटीची आहे.

खास मौजा - रुयाड, प.ह.न. ५१, तह - कुही, जि. नागपूर येथील सर्वेक्रमांक १३७ आ.हे.आर ७२ जमा १.३६ हक्क वर्ग १

याप्रमाणे माझी शेतजमीन असून सदर शेत जमीन मी आपणास रुपये ३२३१०००/- (अक्षरी बत्तीस लाख एकतीस हजार)प्रति एकर विकण्याच्या पक्का करार केला असून दिनांक १६/१०/२०२५ रोजी करार प्रमाणे टोकन पावती दखल रुपये ३१०००/- (अक्षरी एकतीस हजार रुपये) नगदी आपणाकडून भरून पावलो आहे. त्यानंतर दिनांक ३०/१०/२०२५ रोजीचे आत आपणास रीतसर विसारपत्र / विक्रीपत्र करून देईल. कोणतीही टळाटळ करणार नाही. करीता हे रक्कम मिळाल्याचे टोकनपत्र / पावती लिहून दिली आहे.

दिनांक : १६/१०/२०२५
टोकनपत्र लिहून देणार
चंद्रकांत विष्णूजी मदनकर
टोकनपत्र लिहून घेणार
तेकराम लखनलाल पटले

## Change Of Name

MY OLD NAME WAS **RUQAIYA BANO.** NOW MY NEW NAME IS **RUQAIYA BEGUM.**
**ADD :** NEAR KACCHU KIRANA STORES TAKIYA DIWAN SHAH MOMINPURA NAGPUR 440018.

MY OLD NAME WAS **SHEIKH MOHD SHIFANUDDIN MOHD NAZIMUDDIN.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD SHIFANUDDIN.**
**ADD :** SHOUKAT ALI CHOWK OPP, HAJ HOUSE GANJIPETH NAGPUR 440018.

MY OLD NAME WAS **SHAZIYA RIZWAN.** NOW MY NEW NAME IS **SHAZIA RIZWAN.**
**ADD :** 264,SULEMAN MANZIL, SADAR NAGPUR-440001.

MY OLD NAME WAS **SRANVEER KAWARE.** NOW MY NEW NAME IS **RANVIR KAWARE.**
**ADD :** PLOT NO.939, DESHPANDE LAYOUT, NAGPUR 440008.

MY OLD NAME WAS **MOHAMMAD ASRAF RATHOR.** NOW MY NEW NAME IS **MOHD ASHRAF ALTAF HUSAIN RATHOD .**
**ADD :** PLOT NO.84/A NETAJI NAGAR PATDI NAGPUR 440035 PASSPORT NO. N4321498.

MY OLD PASSPORT NO, N0546517, MY OLD NAME WAS **MAYANK GOPALRAO DANDARE.** NOW MY NEW NAME IS **MAYANK GOPALRAO DANDHARE.**
**ADD :** PLOT NO.47, KRUSHNARPAN DURGA NAGAR MANEWADA ROAD NAGPUR 440024.

MY OLD NAME WAS **ALI SABAHAT AFRINE ASHFAQUE.** NOW MY NEW NAME IS **SABAHAT AFRIN ASHFAQUE ALI .**
**ADD :** GALLI NO.10,NEAR TAJ HARDWARE,HASANBAG, NAGPUR MS. 440009 MS

MY OLD NAME WAS **NARENDRA SINGH BAIS.** NOW MY NEW NAME IS **NARENDRA LAXMANSINGH BAIS.**
**ADD :** P. NO. 24, MATOSHREE BHAVAN, NEAR NIRMAL NAGARI MIRE LAYOUT, BAPU NAGAR, NAGPUR CITY - 440009

MY OLD NAME WAS **RUPALI BAIS.** NOW MY NEW NAME IS **DEEPMALA BAIS.**
**ADD :** P. NO. 24, MATOSHREE BHAVAN, NEAR NIRMAL NAGARI MIRE LAYOUT, BAPU NAGAR, NAGPUR CITY - 440009

MY OLD NAME WAS **UMA SWARNKAR.** NOW MY NEW NAME IS **MANJU SWARNKAR.**
**ADD :** P. NO. FLAT NO. 202 GANGWANI IMPERIAL NARI RING ROAD UPPALWADI NAGPUR CITY - 440026

MY OLD NAME WAS **SADAF RAFIKKHA PATHAN.** NOW MY NEW NAME IS **SADAF RAFIQUE KHAN PATHAN.**
**ADD :** AT-DONGARTAL, POST-DEOLAPAR, SUB DISTRICT-RAMTEK NAGPUR - 441401

MY OLD NAME WAS **ISHARATALI AFSARALI SAYYAD.** NOW MY NEW NAME IS **ISHRAT ALI AFSAR ALI SAYYAD.**
**ADD :** QTR 220/1, SOMWARIPETH, NAGPUR, 440009

MY OLD NAME WAS **SHEIKH NISAR SHEIKH USMAN.** NOW MY NEW NAME IS **SHAIKH NISAR SHAIKH USMAN.**
**ADD :** NAVI ABADI HADGAON DISTRICT NANDED 431712.

MY OLD NAME WAS **RESHMA BEGUM SHAIKH MUKHTAR.** NOW MY NEW NAME IS **RESHMA PARVIN SHEKH SAMIR.**
**ADD :** NURI MOHALLA KALAMNURI HINGOLI 431702

MY OLD NAME WAS **SAKEENA BI MOHAMMAD YASIN/ SAKEENA BI MOHAMMED YAHSIN.** NOW MY NEW NAME IS **SAKINA BI SAIYYAD AHMAD RAZA.**
**ADD :** HAIDARPURA KHADAN AKOLA 444001

MY OLD NAME WAS **TABASSUM FATHIMA.** NOW MY NEW NAME IS **TABHASSUM .**
**ADD :** 1-1-93/A SHANTHI NAGAR ADILABAD TELANGANA 504001

MY OLD NAME WAS **YASMEEN PARVEEN ABDUL SALAM.** NOW MY NEW NAME IS **YASMEEN IMRAN KHAN.**
**ADD :** HANUMAN NAGAR NAGPUR GAREJ KE PICHE TUKUM CHANDRAPUR 442401

MY OLD NAME WAS **ASHLEY XAVIER.** NOW MY NEW NAME IS **ASHLEY ANTHONY XAVIER.**
**ADD :** P.NO.151/1 MONT ROAD NR 7 DAY SCHOOL NAGPUR-440001

MY OLD NAME WAS **ASHAD SHEIKH.** NOW MY NEW NAME IS **ASAHAD SHAFIK SHEIKH.**
**ADD :** TAKIYA WARD BACK SIDE JAIL NR KHAN MARRIGE HALL NAGPUR-441904

MY OLD NAME WAS **MOHD DANISH MOHD YUSUF/MOHMAD DANISH YUSUF.** NOW MY NEW NAME IS **DANISH SAIYED YUSUF.**
**ADD :** NEAR ZEC HOUSE NEW GANDHI LAYOUT GODAWARI NAGAR ZOPADPATTI,NAGPUR - 440013

MY OLD PASSPORT NO. K8196606. MY OLD NAME WAS **JAIVANTA GOVINDA TAKSANDHE** NOW MY NEW NAME IS **JAYWANTA GOVINDA TAKSANDE.**
**ADD :** PLOT NO.241, RAMESHWARI ROAD NEAR NIT GARDEN NAGPUR

RNINO-20789/71 **Mahasagar Nagpur** Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Tekdi Road, Sitabuldi, Nagpur. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak.
**Main office phone numbers:** 7447735851/9922970023/7447735853.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक २०७८९/१९७१ **महासागर नागपूर** **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, टेकडी रोड, सिताबर्डी, नागपूर, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, **समूह संपादक :** संदीप रामराव काळे, **प्रबंध संपादक :** पंकज श्रीकृष्ण चांडक
**फोन :** ७४४७७३५८५१, ७४४७७३५८५३



# बालांगण



## अतिभव्य राष्ट्रीय उद्यान

वाचा तर खरं

दक्षिण आफ्रिकेतलं दोन राष्ट्रीय उद्यानांनी मिळून तयार झालेलं त्साओ राष्ट्रीय उद्यान ही वन्य जीवप्रेमींसाठी पर्वणीच. त्साओ ईस्ट नॅशनल पार्क आणि त्साओ वेस्ट नॅशनल पार्क अशी ही दोन अभयारण्यं आहेत. केनियातल्या कोस्ट प्रांतात वसलेलं हे राष्ट्रीय उद्यान नैरोबी शहर आणि मोंबासा यांच्या मध्यभागी आहे. मोंबासाला केनियाच्या दुर्गम भागांना जोडणारा रेल्वेमार्ग याच राष्ट्रीय उद्यानातून जात असल्यामुळे त्याचे दोन भाग करण्यात आले. त्साओ ईस्ट हे केनियातल्या सर्वात जुन्या राष्ट्रीय उद्यानांपैकी एक. १३,७४७ चौरस किलोमीटर एवढ्या प्रचंड भूभागावर पसरलेलं हे राष्ट्रीय उद्यान म्हणजे एक आश्चर्यच. त्साओ वेस्ट राष्ट्रीय उद्यानाचा विस्तार ९०६५ चौरस किलोमीटर एवढ्या परिसरात झाला आहे. १९४८ च्या एप्रिल महिन्यात हे उद्यान सर्वसामान्यांसाठी खुलं करण्यात आलं. या दोन्ही राष्ट्रीय उद्यानांमध्ये वैविध्यपूर्ण जंगल सफारींचा आनंद लुटता येतो. त्साओ ईस्ट राष्ट्रीय उद्यानात सिंह, काळे गेंडे, केप बफेलो, बिबटे आणि हत्ती हे प्राणी पाहता येतात. यासोबतच हिप्पोपोटेमस, जिराफ, झेब्रा, बबून असे प्राणीही इथे आहेत. या भागात वेगवेगळ्या प्रजातींचे पक्षीही सुखाने नांदतात. म्हणूनच पक्षी निरिक्षकांसाठीही या अभयारण्यात बरंच काही आहे. ही दोन्ही अभयारण्यं सुमारे २२ हजार चौरस किलोमीटर परिसरात पसरली आहेत. केनियाचा चार टक्के भूभाग या अभयारण्यांनीच व्यापला आहे. या अभयारण्यांमधला काही भाग फक्त वन्य जीवांसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. इथे पर्यटकांना जाण्यास बंदी घालण्यात आली आहे. या अभयारण्यांमध्ये जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी बरेच प्रयत्न केले जातात.

## मोमोतारो

जपानी लोककथा

खूप वर्षांपूर्वी जपानमधील एका छोट्या गावात एक वृद्ध शेतकरी आणि त्यांची बायको राहत होती. त्यांना मूल नव्हतं. एके दिवशी ती वृद्ध स्त्री नदीवर कपडे धुण्यास गेली. तिला पाण्यातून एक मोठे पीच वाहत



येताना दिसले. तिने ते घरी आणले. घरी आल्यावर ती आणि तिचा नवरा पीच कापण्यासाठी बसले. पीच उघडताच त्यातून एक गोंडस बाळ बाहेर आले. त्यांनी त्या मुलाला नाव दिलं मोमोतारो. म्हणजे 'पीचमधून जन्मलेला मुलगा'

मोमोतारो जसा जसा मोठा होत गेला तसा तो खूप ताकदवान बनला. गावकरी त्याला सांगत,की दूरच्या बेटावर काही राक्षस राहतात. ते लोकांना त्रास देतात. वस्तू लुटतात. एकदा खरोखरीच त्या राक्षसांनी मोमोतारोच्या गावावर हल्ला केला आणि गावात होते नव्हते ते सारे लुटून नेले. राक्षसांशी लढून आपल्या गावातल्या लोकांच्या वस्तू परत आणायच्या असे मोमोतारोने ठरवले. आईने त्याच्यासाठी खास तांदळाच्या पुऱ्या दिल्या. प्रवासात



मोमोतारोला एक कुत्रा, एक माकड आणि एक कावळा भेटले. मोमोतारोने आपल्याजवळच्या पुऱ्या त्यांना दिल्या. त्यामुळे त्यांची मोमोतारोशी मैत्री झाली. 'राक्षसांशी लढायला आम्ही तुझ्याबरोबर येतो.' ते म्हणाले. ते चौघेही ते राक्षसांच्या बेटावर गेले. त्यांची खूप मोठी लढाई झाली.आपल्या



पराक्रमाने आणि चतुराईने मोमोतारोने राक्षसांना हरवले. राक्षसांनी गावकऱ्यांचा खजिना परत दिला. विजयी मोमोतारो आपल्या मित्रांसह गावात परत आला. लोकांनी त्याला आपल्या गावाचा राजा बनवले. त्यानंतर सर्वजण सुखाने राहू लागले.



## कुतुहलजनक गोरिला

रंजक ग्यान

गोरिला हा माणसांशी साधर्म्य साधणारा प्राणी आहे. माणूस आणि गोरिला यांच्या जनुकांमध्ये फक्त तीन टक्के फरक आहे. गोरिला हसू शकतात. त्यांना दुःख होतं. तसंच ते इतर भावभावनाही व्यक्त करू शकतात. प्रत्येक गोरिलाच्या बोटांचे ठसेही वेगवेळे असतात. गंमत म्हणजे प्राणिसंग्रहालयातलेच नाही तर जंगलात राहणारे गोरिलाही सांकेतिक आणि बोली भाषा आत्मसात करतात. गोरिला जवळपास दोन हजार शब्द शिकू शकतात. म्हणूनच त्यांची गणना जगातल्या बुद्धिवान प्राण्यांमध्ये केली जाते. गोरिलाच्या हातांची लांबी पायांच्या लांबीपेक्षा जास्त असते. म्हणूनच गोरिला चार पायांवर चालणं पसंत करतात. हा प्राणी माणसांप्रमाणे दोन पायांवरही चालू शकतो. पण हात आणि पाय या दोहोंचा वापर करून चालल्यामुळे त्यांना शरीराचं संतुलन साधता येतं. शिवाय झाडावर किंवा उंचवट्यावर चढणं सोपं जातं. गोरिला समूहात राहतात. एका समूहात साधारणपणे दहा गोरिला असतात. गोरिलांच्या समूहाला 'ट्रूप्स' म्हटलं जातं. माणसाच्या गर्भातल्या बाळाची पूर्ण वाढ व्हायला नऊ महिने लागतात तर गोरिलाची मादी ८.५ महिन्यांनी बाळाला जन्म देते. प्रौढ गोरिला दिवसाला साधारणपणे ४० पाउंड अन्न खातो. गोरिला आणि माणसांच्या जनुकांमध्ये साम्य असल्यामुळे माणसांना होणारे बरेचसे विकार गोरिलानाही जडू शकतात. म्हणूनच गोरिला सफारीमध्ये गोरिला आसपास असतील तर तोंडावर हात ठेऊन खोकण्याचा किंवा शिंकण्याचा सल्ला दिला जातो. गोरिलाची मादी पिल्लू तीन वर्षांचं होईपर्यंत काळजी घेते.

चला रंगवा



ठिपके जुळवा



## करिअर... वेगळ्या वाटांवरचं

कोण होणार?



मोठं झाल्यावर कोण होणार, असं विचारल्यावर तुमच्यातले बरेचजण डॉक्टर, इंजिनिअर, बँक अधिकारी, सीए, एमबीए असं काही तरी सांगतात. पण मुलांनो, आज करिअरचे अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. तुम्हाला या नेहमीच्या वाटेवर न चालता वेगळं काही करायचं आहे का? मग या पर्यायांचा नक्की विचार करा.

▶ तुम्हाला राजकारणात रस असेल तर पॉलिटिकल कॅम्पेन मॅनेजर म्हणून काम करता येईल. हे काम वाटतं तितकं सोपं नाही. यासाठी तुम्हाला बरंच डोकं चालवावं लागतं. एखाद्या पक्षाची राजकीय मोहीम यशस्वी करून दाखवण्यासाठी निरनिराळ्या कल्पना लढवाव्या लागतात. अनेकदा तणावाची परिस्थिती हाताळावी लागते. या क्षेत्रात काम करण्यासाठी तुमच्याकडे संवादकौशल्य असायला हवं. तसंच पॉलिटिकल सायन्स या विषयाचा अभ्यास करता येईल.


▶ इमोशनल इंटेलिजन्स डिझायनर म्हणूनही काम करता येईल. कॉम्प्युटर सायन्स किंवा सायकॉलॉजी या विषयाचं ज्ञान घेऊन तुम्हाला पुढे जाता येईल. सायकॉलॉजी हा विषय घेऊन पदवी घेता येईल. तसंच या विषयात उच्च शिक्षणही घेता येईल.

▶ सध्याच्या काळात प्रत्येकालाच स्मार्ट घरं हवी असतात. म्हणूनच गृहसजावटीला प्रचंड महत्त्व आलं आहे. तुमच्यात कल्पकता, कलात्मकता असेल, घराच्या सजावटीच्या विविध कल्पना असतील तर क्रिएटिव्ह होम डेकोर क्षेत्राकडे वळता येईल. या क्षेत्रात काम करण्यासाठी विशिष्ट पदवीची गरज नसते. अंगभूत कौशल्यांच्या बळावर तुम्ही या क्षेत्रात पुढे जाऊ शकता.

## नवबांचं शहर लखनऊ

सफर शहरांची

मित्रमैत्रिणींनो, लखनऊ ही उत्तर प्रदेशची राजधानी. या शहराला खूप मोठा इतिहास आहे. लखनऊ नवाबांचं शहर म्हणूनही ओळखलं जातं. इथले लोक पाहुण्यांचं खूप छान स्वागत करतात. चला तर, मग लखनऊची सफर करू या. लखनऊ हे सीसीटीव्हींचं भारतातलं पहिलं शहर आहे. या शहरात अनेक सीसीटीव्ही बसवण्यात आले आहेत. संपूर्ण शहरात जवळपास चार हजार सीसीटीव्ही आहेत. लखनऊ शहर १८५७ च्या उठावाच्या प्रमुख केंद्रांपैकी एक. ब्रिटिशविरुद्धचा हा उठाव लखनऊपासून कानपूरपर्यंत आणि नंतर पुढे बंगालपर्यंत पसरला. लखनऊमध्ये खाण्यापिण्याची चंगळ असते. माखन मलई, शाही तुकडा, मलई की गिल्लोरी, गुलाबी चाय आणि लखनवी पान हे पदार्थ खूपच प्रसिद्ध आहेत. त्यामुळे खवय्यांसाठी लखनऊला जाणं ही खूप मोठी पर्वणी ठरते. या शहरात अनेक ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थळं आहेत. शाही बावली ही राजेशाही विहिर इथे आहे. गुजरात आणि राजस्थानमध्ये अशा असंख्य विहिरी पहायला मिळतात. शाही बावली हे लखनऊचं खास आकर्षण आहे. इथल्या विविध इमारतींवरची स्थापत्य कला बघण्यासारखी आहे.



## वीणा

वाद्यांची ओळख

भारतीय संगीतपरंपरेत वीणा या वाद्याला खूप सन्मान दिला जातो. देवी सरस्वतीच्या हातात वीणा असते. त्यामुळेतिलासांस्कृतिक आणि धार्मिक महत्व आहे. वीणा हे अत्यंत प्राचीन वाद्य आहे. वीणेचे विविध प्रकार आहेत. सारंगी वीणा, रवि वीणा, तात वीणा आणि रास वीणा. प्रत्येक प्रकाराची लांबी, स्वर आणि वाजवण्याची पद्धत वेगळी असते. वीणा वाजवण्यासाठी तारांना बोटांनी किंवा सुईसार'या साधनांनी स्पर्श केला जातो.मंदिरांमध्ये आणि संगीत मैफलीत वीणेचा वापर केला जातो. अनेक महान संगीतज्ञांनी वीणेसह संगीताच्या उत्कृष्टरचना सादर केल्या आहेत.

वीणेचे सरस्वती वीणा आणि रुद्र वीणा असे दोन महत्वाचे प्रकार आहेत. देवी सरस्वती यांच्या हातातील वाद्य म्हणून यालासरस्वती वीणाम्हणतात.ही वीणा मोठी आणि लाकडी असते. एका टोकाला मोठा भोपळ्यासारखा भागअसतो.त्याला तुंबा म्हणतात.या वीणेला ४ मु'य आणि ३झंकारासाठी अशा ७धातूच्या तारा असतात.वीणा बसून मांडीवर ठेवून वाजवली जाते. रागांची अभिव्यक्ती गोड, मृदू आणि लयबद्ध असते.डॉ. जयंती कुमारेश, राजेश वैद्य, डी. बालकृष्ण हे सारस्वती वीणावादक आहेत. भगवान शंकरांनीरुद्र वीणानिर्माण केल्याची आ'यायिका आहे. लांबबांबू किंवा लाकडी दांड्यालादोन मोठे भोपळे म्हणजेच तुम्बेजोडलेले असतात.साधारण२४ पट्ट्या आणि७ ताराअसतात.आकाराने मोठी व जड असते.ही वीणा गळ्यात अडकवून किंवा पायावर ठेवून वाजवली जाते. बहाऊद्दीन डागर, झियामोईनुद्दीन डागर, असद अली खान हे प्रसिद्ध रुद्रवीणा वादक आहेत.



## आल्प्स पर्वतरांगा

आल्प्स ही युरोपातील सर्वात मोठी पर्वतरांग आहे. ही सुमारे १२०० किलोमीटर लांब पसरलेली आहे. फ्रान्स, स्वित्झर्लंड, इटली, जर्मनी, ऑस्ट्रिया, स्लोव्हेनिया आणि लिक्टेंस्टाईन या देशांमध्ये आल्प्स पर्वतरांग पसरलेल्या आहेत. नैसर्गिक सुंदरता, उंच शिखरे, हिरवीगार मैदाने, धबधबे, हिमनद आणि तलाव यामुळे ही पर्वतरांग अत्यंत सुंदर आहे. उंचीच्या दृष्टीने आल्प्स पर्वतरांग विविध स्तरांमध्ये विभागली जाते. सपाट आणि झुडुपांनी भरलेली पठारे, मध्यम उंचीची पर्वतरांग, आणि बर्फाने झाकलेलीउच्च शिखरे.



आल्प्स पर्वतरांगांमध्ये विविध प्राणी आणि वनस्पती आढळतात. आइबेक्स, मार्मोट्स, आणि अनेक प्रकारचे दुर्मिळ पक्षी आणि प्राणीया भागात आढळतात. आल्प्समध्ये पर्वतीय फुलझाडे, झुडुपे, आणि अल्पाइनची जंगले आढळतात. लोक ट्रेकिंग, हायकिंग, स्कीइंग, आणि पर्वतारोहण आणि पर्यटन यासाठी आल्प्स पर्वतरांगांना भेट देतात.

आल्प्स पर्वतरांगआर्थिक दृष्ट्या देखील महत्त्वाची आहे. येथे शेतकऱ्यांसाठी पठारावर शेती केली जाते. विशेषतः दुग्धजन्य प्राणी, गवत आणि काही फळांचे उत्पादन केले जाते. पर्यटनामुळे आल्प्स प्रदेशांमध्ये रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत. याशिवाय, आल्प्सच्या नदी आणि तलावांपासून जलऊर्जेचा स्त्रोत देखील मिळतो. या पर्वतामुळे हवामान शीत, समशीतोष्ण आणि बर्फाळ भागांमध्ये विभागलेले आहे.त्याचा युरोपातील नद्या, जंगले आणि शेतीवर परिणाम होतो.नैसर्गिक सौंदर्य, विविध प्रकारच्या जीवसृष्टी आणि पर्वतीय जीवनशैली यामुळे जगभरातील लोकांनाया पर्वतरांगेचे आकर्षण वाटते. विशेष म्हणजे या पर्वतरांगेचा युरोपाच्या इतिहास, कला, पर्यटन, आणि आर्थिक जीवनावर मोठा प्रभाव आहे.

दोस्त हे मस्त

### भीतीदायक कोमोडो ड्रॅगन



कोमोडो ड्रॅगन नावाचा एक प्राणी आहे. इंडोनेशियातल्या कोमोडो, रिंका, फ्लोर्स आणि गिल मोतांग या बेटांवर तो आढळतो. कोमोडो ड्रॅगन हा पालीच्या प्रजातीचा प्राणी आहे. या प्राण्याची लांबी जवळपास १० मीटर असते. त्याचं वजन १३६ किलोपर्यंत असू शकतं. कोमोडो ड्रॅगन ही जगातली सर्वात वजनदार पालीची प्रजाती आहे. हा प्राणी खूप भयानक दिसतो. तो वेगवेगळ्या प्रकारचे प्राणी खातो. एका वेळी तो भरपूर खाऊ शकतो. कोमोडो ड्रॅगन भीतीदायक असले तरी प्रत्यक्षात खूप खेळकर असतात.

खादाडी

### मस्त मसाला इडली



दोस्तांनो, संध्याकाळची किंवा सकाळी केलेली इडली उरली असेल तर त्यापासून मस्तपैकी मसाला इडली बनवता येईल. इडलीचे छोटे तुकडे करा. थोडा कांदा चिरून घ्या. हिरवी मिरची, लसूण, आलं, तिखट, मीठ असं साहित्य घ्या. आता एका कढईत तेल घाला. गरम झाल्यावर थोडी मोहरी(राई) घाला. राई तडतडली की त्यात कांदा घालून परता. आलं आणि लसूण कुटून घ्या. ते घाला. हिरवी मिरची, तिखट, मीठ घाला. मग इडलीचे तुकडे घालून नीट मिक्स करा. वरून कोथिंबिर घाला. तुमची मसाला इडली तयार आहे!

स्टडी टिप्स

### आता सरावावर भर द्या...



दोस्तांनो, परीक्षा जवळ येऊ लागली की खूप ताण येतो. पण या दिवसात नवं काही तरी शिकण्याच्या फंदात पडू नका. आधी केलेल्या अभ्यासाची उजळणी करा. महत्त्वाच्या धड्यांवर भर द्या. नव्या विषयांचा अभ्यास करताना जास्त ताण येऊ शकतो. अखेरच्या टप्प्यात सरावावर भर द्या.

योगा

### चेहरा ठेवा मस्त!



मुलांनो, काहीजणांचा चेहरा खूप फुगीर किंवा जाड दिसतो. त्यांना दोन हनुवट्या असल्यासारखं वाटतं. गव्हालगतही फॅट्स असतात. यामुळे आपलं व्यक्तिमत्त्व चांगलं दिसत नाही. काही योगासनं करून चेहऱ्यावरचे फॅट्स कमी करता येतील. 'सिंहाच्या चेहऱ्यासारखा' व्यायाम केल्यामुळे तुमचा चेहरा बारीक दिसू शकतो. यासाठी मोठा 'आ' करा. जीभ बाहेर काढा. श्वास बाहेर सोडत रहा. डोळे मोठे करा. दोन ते तीन मिनिटं याच स्थितीत थांबा. मग मांडी घालून बसा आणि दीर्घ श्वास घ्या. हा व्यायाम नियमितपणे करा.

### नागपूरच्या शिव अग्रवालने पटकावले
## गोल्फ लीग फायनलचे सुवर्णपदक



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १७ :**
उपराजधानीतील एका औषध उत्पादक कंपनीचे संचालक शिव अग्रवाल यांनी जर्मनीच्या ब्लॅक फॉरेस्टमधील ओशबर्गहोफ गोल्फ कंट्री अँड क्लब येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय गोल्फ लीग फायनलचे विजेतेपद पटकावले.

जर्मन कार उत्पादक मर्सिडीज बेंझने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय गोल्फ लीग अंतर्गत, ६० वेगवेगळ्या देशांतील ६० हजारांहून अधिक गोल्फपटूंनी आपापल्या देशांतून भाग घेतला. त्यापैकी १८० खेळाडूंनी जर्मनीमध्ये झालेल्या वर्ल्ड गोल्फ लीग फायनलमध्ये वैयक्तिक अंतिम फेरी जिंकून भाग घेतला.

तत्पूर्वी पुण्यात झालेल्या राष्ट्रीय अंतिम फेरीत विजय मिळवल्यानंतर, शिव अग्रवालने जर्मनीमध्ये झालेल्या वर्ल्ड फायनलमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. मुळ मुंबई निवासी शीव अग्रवाल यांनी त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करून ऐतिहासिक विजय नोंदवला. गेल्या २४ वर्षात भारतासाठी ही एक उल्लेखनीय कामगिरी मानली जात असून, गोल्फमध्ये भारत आणि नागपूरसाठी अभिमानाचा क्षण आहे.

# खासदार सांस्कृतिक महोत्सवाचे ७ नोव्हेंबर रोजी उद्घाटन



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १७ :**
केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून २०१७ साली खासदार सांस्कृतिक महोत्सवाला प्रारंभ झाला होता. यंदाचे हे महोत्सवाचे दहावे पर्व आहे. वर्षागणिक त्याचे स्वरूप अधिक भव्य होत आहे. मागील वर्षी दोन कोटी लोकांनी प्रत्यक्ष व सोशल माध्यमांवर महोत्सवातील विविध कार्यक्रमांचा आस्वाद घेत उच्चांक गाठला. दोन विक्रमांची नोंद करणारा हा महोत्सव देशातला सर्वात मोठा सांस्कृतिक महोत्सव म्हणून गणला जाऊ लागला आहे.

यावर्षी, खासदार सांस्कृतिक महोत्सव २०२५ चे आयोजन येत्या, ७ ते १८ नोव्हेंबर दरम्यान हनुमाननगरातील क्रीडा चौक येथील ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या पटांगणावर करण्यात येणार आहे.

सकाळ व संध्याकाळ अशा दोन सत्रात होणाऱ्या या महोत्सवात धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी नागपूरकरांना मिळणार असून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या कलाकारांसोबतच स्थानिक कलाकार देखील आपली कला सादर करतील, पत्रकार परिषदेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यासंदर्भात शुक्रवारी घोषणा केली.

मंचावर पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृष्णा खोपडे, प्रवीण दटके, अॅड. सुलेखाताई कुंभारे, डॉ. भूषणकुमार उपाध्याय, डॉ. उपेंद्र कोठेकर, दयाशंकर तिवारी, यांच्यासह खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

**उद्घाटनाचा भव्य सोहळा**

यंदाच्या खासदार सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन ७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता आध्यात्मिक गुरू व श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरी जी महाराज यांच्या हस्ते होणार आहे. चाणक्य, सम्राट पृथ्वीराज यासारख्या कलाकृतींच्या माध्यमातून भारतीय संस्कृती, इतिहास आणि परंपरांना घरोघर पोहोचवणारे लेखक व दिग्दर्शक पद्मश्री डॉ. चंद्रप्रकाश द्विवेदी यांचीही उपस्थिती राहील.

उद्घाटन कार्यक्रमानंतर प्रसिद्ध अभिनेते आशुतोष राणा यांची प्रमुख भूमिका असलेलं नाटक हमारे राम याची प्रस्तुती होणार आहे. प्रभू श्रीराम यांच्या जीवनावर आधारित या नाटकामध्ये आशुतोष राणा यांनी रावणाची भूमिका साकारली आहे.

**सहा लाईव्ह इन कॉन्सर्ट्स**

खासदार सांस्कृतिक महोत्सवात ८ नोव्हेंबर रोजी गायक व संगीतकार विशाल मिश्रा यांची लाईव्ह इन कॉन्सर्ट होणार आहे. १२ तारखेला युवा गायक अखिल सचदेवा, १४ तारखेला संगीतकार विशाल भारद्वाज व गायिका रेखा भारद्वाज तर १६ तारखेला श्रेया घोषाल यांची लाईव्ह इन कॉन्सर्ट होईल.

१७ तारखेला लोकप्रिय गायक व संगीतकार शंकर महादेवन यांची लाईव्ह इन कॉन्सर्ट होणार आहे. कोट्यवधी स्वयंसेवकांसाठी प्रेरक असलेली काही निवडक संघ गीते शंकर महादेवन यांनी नव्याने संगीतबद्ध केली असून ते यावेळी या संघगीतांसोबतच काही देशभक्तीपर गीते सादर करतील. १८ तारखेला समारोपाच्या दिवशी प्रसिद्ध मराठी संगीतकार जोडी अजय-अतुल यांची लाईव्ह इन कॉन्सर्ट होईल.

**फ्यूजन, हास्यजत्रा आणि कविसंमेलन**

९ तारखेला होणाऱ्या फ्यूजन या विविध वाद्यांचा संगम असलेल्या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे बासरी वादक रोणू मजुमदार, संस्कार भारतीचे अखिल भारतीय अध्यक्ष व प्रसिद्ध व्हायोलिन वादक मंजुनाथ महादेवप्पा, प्रसिद्ध तालवादक तौफिक कुरेशी यांच्यासह बिक्रम घोष, सितार व संतूरवादक स्वीकार सुनील कट्टी, मनीष कुळकर्णी, अतुल रनिंगा व श्रीदर पार्थसारथी यांचा सहभाग राहणार आहे.

११ तारखेला 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा अत्यंत लोकप्रिय मराठी विनोदी कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून यात प्राजक्ता माळी, सई ताम्हणकर, प्रसाद ओक, समीर चौगुले, नम्रता संभेराव, गौरव मोरे इत्यादी कलाकारांचा सहभाग राहणार आहे.

१५ रोजी अखिल भारतीय हिंदी कविसंमेलन होणार असून त्यात हरिओम पंवार, दिनेश बावरा, सुदीप भोला अंकिता सिंह, तेजनारायण शर्मा व अमन अक्षर हे कवी सहभागी होतील.

**संत परंपरेचा जागर**

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जीवनावर आधारित २ हजार कलाकारांचा सहभाग असलेला राष्ट्रसंतांची जीवनगाथा हा दृक श्राव्य स्वरूपाचा संगीतमय कार्यक्रम १० तारखेला होणार असून १५ तारखेला बालकला अकादमी निर्मित संत ज्ञानेश्वरांच्या ७५० वा जयंती उत्सवानिमित्ताने ज्ञानियांचा राजा हा कार्यक्रम सादर केला जाणार आहे.

यात नागपुरातील ४०० हून अधिक बालकलाकारांचा यात सहभाग राहील. संस्कार भारतीचा मिट्टी के रंग : भारत की लोकसंस्कृती की संगीत नृत्यमय गाथा हा कार्यक्रम १३नोव्हेंबर रोजी सादर होईल.

**गीता पठणासह भक्तीचा जागर**

खासदार सांस्कृतिक महोत्सवात ८ ते १७ नोव्हेंबर या कालावधीत दररोज सकाळी ७ ते ८.३० वाजेदरम्यान जागर भक्तीचा हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाची सुरुवात गीता पठणाने होणार असून यात ५ वी ते १२वी इयत्तेतील ५०,००० हून अधिक विद्यार्थी एकाच ठिकाणी एकत्र येऊन भगवद्गीतेचा १२वा, १५वा आणि १६वा अध्याय सामूहिकरित्या पठण करतील. यावेळी नितीन गडकरी यांच्या हस्ते गीता पठण कार्यक्रमाचा लोगोचे अनावरण करण्यात आले.

याशिवाय, श्रीराम रक्षा व मारुती स्तोत्र पठण, शिवमहिम्न पठण, श्री गणपती अथर्वशीर्ष स्तोत्र पठण, श्री हरिपाठ पठण, श्री गजानन विजय ग्रंथ २१ वा अध्याय पठण, श्री विष्णू सहस्त्रनाम पठण, हनुमान चालिका व सुंदरकांड पठण, परित्तदेशना (महा परित्राण पाठ) आणि श्री पुरूष सुक्त श्री सुक्त पठण यांचा समावेश राहणार आहे.

**क्युआर कोड स्कॅन करा पासेस मिळवा**

कोणत्याही अडथळ्याविना या महोत्सवाचा आनंद घेण्यासाठी क्युआर कोडद्वारे मोफत पासेस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. जाहिराती, होर्डिंग्ज इत्यादी प्रसिद्धी साधनांवर असलेला क्युआर कोड स्कॅन केल्याबरोबर www.khas-darmahotsav.com हे संकेतस्थळ सुरू होईल व तेथून त्या-त्या दिवसाची मोफत पास प्राप्त करता येतील.

खासदार सांस्कृतिक महोत्सवाला नागपूरकरांनी भरभरून प्रतिसाद द्यावा, असे आवाहन सांस्कृतिक महोत्सव आयोजन समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, उपाध्यक्ष डॉ. गौरीशंकर पाराशर, अशोक मानकर, दिलीप जाधव, सचिव जयप्रकाश गुप्ता, कोषाध्यक्ष प्रा. राजेश बागडी, सदस्य बाळासाहेब कुलकर्णी, हाजी अब्दुल कदीर, सारंग गडकरी, अविनाश घुशे, डॉ. दीपक खिरवडकर, संदीप गवई, संजय गुळकरी, रेणुका देशकर, गुड्डू त्रिवेदी, किशोर पाटील, चेतन कायरकर, आशिष वांदिले, भोलानाथ सहारे, अॅड. नितीन तेलगोटे, मनिषा काशीकर, विजय फडणवीस, महेंद्र राऊत, दिलीप गौर, शैलेश ढोबळे यांनी केले आहे.

### साडेतीन वर्षीय चिमुकलीचा
## विषारी कफ सिरफमुळे मृत्यू



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १७ :**
विषारी कफ सिरपमुळे मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यात मुलांच्या मृत्यूचे सत्र सुरूच आहे. छिंदवाडा जिल्ह्यातील चौरई परिसरातील आणखी एक साडेतीन वर्षांची निष्पाप बालिका, अंबिका विश्वकर्मा, हिचा नागपूरमध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला.

या मृत्यूमुळे मध्य प्रदेशात विषारी सिरप प्रकरणामुळे बळी पडलेल्या मुलांचा आकडा आता २६ वर पोहोचला आहे. सध्या आणखी दोन मुले नागपूरच्या रुग्णालयांमध्ये मृत्यूशी झुंज देत आहेत.

चौरई तालुक्यातील ककई बिल्वा गावची अंबिका विश्वकर्मा हिच्यावर गावाकडे उपचार करूनही प्रकृतीत सुधारणा न झाल्याने तिला १४ सप्टेंबर रोजी नागपूर येथील एका खासगी रुग्णालयात दाखल केले. महिनाभरापासून तिच्यावर उपचार सुरू होते बुधवारी सकाळी अंबिकाने अखेरचा श्वास घेतला. नागपुरात मृत्युमुखी पडलेली ही १८ वी केस असून, सर्व मृत बालके मध्यप्रदेशातील आहेत.

## भुजबळांची समजूत काढली, पण त्यांचा संभ्रम कायम...

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :**
हैदराबाद गॅझेटियर लागू करण्यासाठी सरकारने काढलेल्या जीआरमुळे ओबीसी समाजावर कोणताही अन्याय होणार नसल्याचा दावा राज्याचे महसूल मंत्री तथा मंत्रिमंडळाच्या ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी केली. या मुद्यावर मी मंत्री छगन भुजबळ यांची समजूत काढल्याचेही ते यावेळी म्हणाले.

बावनकुळे शुक्रवारी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, मी छगन भुजबळ यांची मंत्रिमंडळाच्या उपसमितीत समजूत काढली. या जीआरमुळे ओबीसी समाजावर कोणताही अन्याय होणार नाही हे आम्ही त्यांना पटवून देण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचे संभ्रम आहेत. आमच्या सरकारकडून एकही चुकीचे काम होणार नाही. ओबीसी समाजाच्या ताटातले कुणीही काहीही काढणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

## परावलंबित्व कमी करण्याला सर्वोच्च प्राथमिकता



### हवाईदल प्रमुख ए. पी. सिंग यांनी स्पष्ट केली दिशा



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १७ :**
स्वदेशी तंत्रज्ञान विकासाद्वारे क्षमता वाढवण्यासोबतच स्वावलंबन आणि स्वदेशीकरणाचा अवलंब करून परदेशी अवलंबित्व कमी करण्यावर भर दिला जाईल, असे प्रतिपादन हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग यांनी केले. ते मेंटेनन्स कमांड कमांडर्स कॉन्क्लेव्हच्या अध्यक्षपदावरून बोलत होते.

यावेळी मेंटेनन्स कमांडचे एअर ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ एअर मार्शल व्ही. के. गर्ग यांनी त्यांचे स्वागत केले. आगमनानंतर, हवाई दल प्रमुखांना औपचारिक गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. 'स्वदेशी तंत्रज्ञान विकासाद्वारे क्षमता वाढवणे' या संकल्पनेवर हे कॉन्क्लेव्ह आयोजित करण्यात आले होते.

या बैठकीत प्रमुख ऑपरेशनल, देखभाल आणि लॉजिस्टिक्स आव्हानांवर चर्चा झाली. हवाई दल प्रमुखांना परदेशी मूळ उपकरण उत्पादकांवरील अवलंबित्व कमी करणे, प्रणालीची विश्वासार्हता वाढवणे, आयुष्यमान वाढवणे, पुरवठा साखळी कार्यक्षमता आणि तांत्रिक नवोपक्रम वाढवणे या उद्देशाने देखभाल कमांडच्या उपक्रमांबद्दल माहिती देण्यात आली.

भारतीय हवाई दलाच्या ऑपरेशनल तयारीमध्ये आणि स्वावलंबी भारताच्या राष्ट्रीय दृष्टिकोनाशी जुळवून घेण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल त्यांनी देखभाल कमांडच्या कर्मचाऱ्यांचे कौतुक करीत मेंटेनन्स कमांडची महत्त्वाची भूमिका हवाई दल प्रमुखांनी अधोरेखित केली. त्यांनी सर्व कर्मचाऱ्यांना व्यावसायिकता, सुरक्षितता आणि कार्यक्षमतेच्या उच्च दर्जासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले.

## जागतिक व्यापार केंद्रातर्फे दिवाळीसाठी प्रकाश आणि एकतेचा उत्सव

**लोकरंग**



पारंपारिक दिवाळी सजावट, सांस्कृतिक सादरीकरणे आणि राजनैतिक दलांचे प्रतिनिधी, सरकारी अधिकारी आणि व्यावसायिक नेत्यांमधील नेटवर्किंगसह, वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई (WTC मुंबई) ने ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज (AIAI) च्या सहकार्याने विश्व व्यापार केंद्र मुंबई येथे एक उत्साही आणि प्रतिष्ठित राजनैतिक दिवाळी उत्सव आयोजित केला, ज्यामध्ये ४० हून अधिक देशांतील राजनैतिक आणि मान्यवरांना एकत्र आणून दिवाळीचा उत्साह साजरा केला गेला. या उत्सवात आंतर-सांस्कृतिक संवाद आणि जागतिक सहभागासाठी एक व्यासपीठ उपलब्ध झाले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून प्रसिद्ध बँकर, सामाजिक कार्यकर्त्या आणि कलाकार श्रीमती अमृता फडणवीस उपस्थित होत्या. त्यांनी दिवाळीच्या वैश्विक आणि आनंदी भावनेबद्दल मनोगत व्यक्त केले. आपल्या भाषणात, त्यांनी दिवाळीचे वर्णन 'प्रकाशाचा सण, सीमा ओलांडणारा सण, एक मजबूत संदेश देणारा सण' असे केले. हा सण कुटुंबे आणि समुदायांना उत्सवाच्या भावनेने एकत्र आणतो. त्याचप्रमाणे, हा कार्यक्रम राजनैतिक समुदायाला उत्सवाच्या भावनेने एकत्र आणतो, एकूण विकासासाठी जवळचे संबंध आणि नातेसंबंध निर्माण करतो. उत्सवात उपस्थित असलेल्या सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा देताना, त्यांनी एका सुंदर गाण्याच्या सादरीकरणाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले आणि उत्सवाची भावना आणखी वाढवली.

महाराष्ट्र सरकारचे मंत्री जयकुमार रावल आणि श्रीमती सुभद्रा कुमारी रावल यांनी या कार्यक्रमाला पाहुण्या म्हणून उपस्थित राहून दिवाळीच्या सांस्कृतिक महत्त्वावर विचार मांडले.

जयकुमार रावल यांनी भर दिला की, विशेषतः दिवाळीमध्ये साकारलेल्या भारतीय परंपरा, समावेशकता आणि एकतेमध्ये रुजलेल्या आहेत. दिवाळीचा सण आपल्याला दिवे लावून अंधार दूर करण्याची आठवण करून देतो. ह्यते सीमांशिवाय एकत्र येतात, पक्षपात न करता प्रकाश देतात आणि सर्वांना उत्सवाचा भाग होण्यासाठी आमंत्रित करतात, विविधतेत एकतेचा सणाचा शक्तिशाली संदेश देतात. ■ ■ ■

## काळी दिवाळी साजरी करण्याची वेळ

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १७ :**
अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळी पूर्वी मदत मिळण्याची आता शक्यता नाही.राज्यातील शेतकऱ्यांची दिवाळी ही काळी दिवाळी म्हणून साजरी करावी लागेल अशी परिस्थिती सरकारने शेतकऱ्यांवर आणली आहे. आता जो कापूस निघतो आहे त्याला केंद्र सरकारने परवानगी दिलेली नाही, वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

ते म्हणाले की, शेतकऱ्यांना साडेतीन लाख रुपये देऊ हा सरकारचा ३ वर्षांचा कार्यक्रम आहे. जर ३ वर्षे शेतकरी जमिनीची दुरुस्ती करत राहील तर तो खाणार आणि जगणार कसा? दिवाळीपूर्वी मदत होईल असे आता वाटत नाही. शेतकऱ्यांनी काळी दिवाळी साजरी करावी का? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

## महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद राबविणार विद्यार्थ्यांसाठी जनजागृती अभियान

**: साप्ताहिक संवाद :**

महाराष्ट्र शासनाने महत्वाकांक्षी निर्णय घेऊन २०१५ च्या अधिनियमानुसार महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद स्थापन केली आहे. या अधिनियमांतर्गत शासनाने राज्यात ॲक्युपंचर चिकित्सा पदविका अभ्यासक्रम करण्याचा क्रांतिकारक निर्णय घेतला आहे. देशात या स्वरूपाचा अभ्यासक्रम सुरु करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. याच अनुषंगाने महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषदेचे अध्यक्ष डॉ . रुमी बेरामजी यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**ॲक्युपंक्चर परिषदेच्या पदविका अभ्यासक्रमाचे स्वरूप कसे असेल?**

■ परिषदेने शासन आणि अधिनियमाप्रमाणे प्राप्त अधिकारानुसार २०२४-२५ पासून हा अभ्यासक्रम सुरु केला आहे. या अभ्यासक्रमाची पाठ्यक्रमरचना आणि पात्रता निकष महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांनी मेनी केलेले आहेत. सन २०२४ -२५ मध्ये मान्यता प्राप्त १४ संस्थांमध्ये एकूण ४२३ विद्यार्थी प्रवेशित झाले असून त्यापैकी ३२४ विद्यार्थी प्रथम सत्र परीक्षेत यशस्वी झाले आहेत.

ही परीक्षा विद्यापीठ मान्य अभ्यासक्रमानुसार १६ ते २० जुलै २०२५ रम्यान परिषदेमार्फत आयोजित करण्यात आली होती. द्वितीय सत्राचे वर्ग १ सप्टेंबर पासून सुरु झालेले आहेत. तसेच २०२५-२६ या वर्षासाठी परिषदेने १८ संस्थांना मान्यता दिली आहे

**ॲक्युपंक्चर उपचार पद्धतीचे महत्व नेमके काय आहे?**

■ ॲक्युपंक्चर ही अतिप्राचीन परंतु शास्त्राधिष्ठित आणि आधुनिक जीवनशैलीस अनुरूप अशी उपचारपद्धती आहे. यामध्ये औषधाशिवाय, शस्त्रक्रियेशिवाय आणि अत्यल्प खर्चात अत्यंत प्रभावी उपचार केले जातात. यामुळे शहराबरोबरच ग्रामीण भागात देखील ॲक्युपंक्चरचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार होत आहे. जगातील १२० देशांमध्ये हि पद्धती जागतिक आरोग्य संघटनेच्या मान्यतेसह वापरली जाते. चीनमध्ये हि प्रमुख वैद्यकीय उपचार पद्धती मानली जाते. मात्र अद्याप आपल्या देशात या उपचार पद्धतीचा अजूनही पाहिजे तितका प्रचार आणि प्रसार झालेला नाही. म्हणूनच शासनाने या परिषदेची स्थापना केली आहे.

**ॲक्युपंक्चर उपचार पद्धतीच्या प्रसारासाठी परिषद जनजागृती अभियान राबविणार आहे त्याबद्दल?**

■ परिषदेने सुरु केलेल्या पदविका अभ्यासक्रमाची माहिती विद्यार्थी आणि पालक यांचेपर्यंत पोहचावी यासाठी परिषद राज्यभर अक्यूपंचर उपचार आणि पदविका अभ्यासक्रमाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी विद्यार्थी आणि पालक जनजागृती अभियान राबविणार आहे. या अभियानाअंतर्गत मान्यताप्राप्त संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

यामध्ये जनजागृती शिबिरे, आरोग्य मार्गदर्शन सत्रे, वृत्तपत्र, दूरदर्शन,आणि विविध सोशल मीडिया माध्यमातून प्रसार करण्यात येणार असूनविविध शैक्षणिक संस्था, शिक्षणाधिकरी आणि आरोग्य विभागाशी समन्वय साधला जाणार आहे. या अभ्यासक्रमासाठी अधिकाधिक विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी प्रवृत्त करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. ■ ■ ■

## पंजाबमधील प्रसिद्ध पर्यटन स्थळ



पंजाबची जमीन अतिशय सुपीक आहे. म्हणूनच हे राज्य विशेषतः शेतीसाठी ओळखले जाते. पंजाबमध्ये डोंगर आणि समुद्र नसला तरी पाहण्यासारखे खास अनेक ठिकाणे आहेत. अमृतसर हे पंजाबचे प्रमुख पर्यटन स्थळ आहे.

अमृतसरचे नाव घेताच सुवर्ण मंदिराची प्रतिमा मनात निर्माण होते. अमृतसरमधील सुवर्ण मंदिर अतिशय सुंदर आहे. हे शहर जालियनवाला बाग हत्याकांड आणि वाघा बॉर्डरसाठी प्रसिद्ध आहे.चंदीगड ही पंजाब आणि हरियाणा या दोन्ही देशांची राजधानी आहे. चंदीगडची प्रमुख पर्यटन स्थळे म्हणजे रॉक गार्डन, सुखना तलाव, शांती कुंज, मोर्नी हिल्स, छतबीर प्राणीसंग्रहालय, रोझ गार्डन, सरकारी संग्रहालय आणि आर्ट गॅलरी, सरकारिया कॅक्टस गार्डन, टिंबर ट्रेल, बटरफ्लाय पार्क गार्डन इ.पंजाबचे पॅरिस म्हणून ओळखले जाणारे कपूरथला पर्यटकांना आकर्षित करते. याच ठिकाणी 1499 मध्ये गुरु नानक यांना ज्ञान प्राप्त झाले.

जगतजीत पॅलेस, जगतजीत क्लब, एलिसी पॅलेस, पंज मंदिर, कांजली, वेटलँड, शालीमार गार्डन, निहाल पॅलेस, स्टेट गुरुद्वारा आणि मूरीश मस्जिद इत्यादी येथे भेट देण्याची खास ठिकाणे आहेत.सरहिंद फतेहगढ हे पंजाबमधील एक शहर आहे. ज्याचा इतिहासाशी विशेष संबंध आहे. येथे अनेक ऐतिहासिक वास्तू आहेत. जे येथे येणाऱ्या पर्यटकांना आकर्षित करतात.

पठाणकोट हे पंजाबचे एक सुंदर ठिकाण आहे. ते जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेशचे प्रवेशद्वार म्हणून ओळखले जाते. येथे तुम्ही मुक्तेश्वर मंदिर, आशापूर्णी मंदिर, काठगढ मंदिर, नूरपूर किल्ला, रणजीत सागर धरण, हायड्रोलिक रिसर्च स्टेशनला भेट देऊ शकता. पटियालामध्ये तुम्हाला अनेक पर्यटन स्थळे पाहायला मिळतील. पटियालातील मोतीबाग पॅलेस, फोर्ट अँड्रॉन, रंग महाल आणि शीश महाल, काली मंदिर, दरबार हॉल, बीर मोती बाग अभयारण्य इत्यादी ठिकाणे आहेत. ■ ■ ■

**: संकलन व संयोजन :**
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com



महासागर
नागपूर वृत्तसागर
नागपूर, शनिवार, दिनांक १८ ऑक्टोबर २०२५



# शेतकऱ्यांच्या समर्थनार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आक्रमक



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शरदचंद्र पवार गटातर्फे, नागपूर शहर यांनी महाराष्ट्र सरकारच्या शेतकऱ्यांसाठी 'काळी दिवाळी' विरोधात नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयात धरणे आंदोलन केले. त्यांनी संपूर्ण कर्जमाफी आणि बाधित शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी केली. संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत निधीचे तात्काळ वाटप आणि शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्याची मागणीही त्यांनी केली. त्यांनी कृषी उत्पादनांना अधिक आदर देण्याची मागणीही केली. निषेधादरम्यान, "मुख्यमंत्री आणि अतिरिक्त मुख्यमंत्री मुदार्बाद" यासह "राज्य सरकार आणि केंद्र सरकार मुदार्बाद" च्या घोषणा मोठ्याने देण्यात आल्या.

नागपूर जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांनी हे निवेदन राज्य सरकार आणि केंद्र सरकारला पाठवण्याचे आश्वासन दिले. जर मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शरदचंद्र पवार, नागपूर शहर हिंसक निषेध करतील. निवेदनाचे नेतृत्व दुनेश्वर पेठे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नागपूर शहर अध्यक्ष शरदचंद्र पवार यांनी केले, तर राज्याचे माजी गृहमंत्री अनिलबाबू देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. निषेध आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार यांच्यासह सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते, त्यात प्रामुख्याने वेदप्रकाश आर्य, शैलेंद्र तिवारी, अशोक काटेले, महेंद्र भणगे, राजुसिंग चौहान, रविनिश पांडे, पंकज ठाकरे, अनिल बोकडे, डॉ. मिलिंद वाचणेकर, अविनाश पाटील, अविनाश पाटील, गोविंद पाटील, गोविंद पाटील आदी उपस्थित होते. राकेश गांधी, देवेंद्र घराडे, वर्षा शामकुळे, सनी व्यास, बबिता सोमकुवर, संगीता खोब्रागडे, प्रवीण कुटे पाटील, अनिल साठवणे, सुभाष नासरे, चंद्रशेखर कोल्हे, गणेश सावरकर, अशोक राऊत, धनजय देशमुख, अमित जेठे, बाळ ठमाळे, नांदेकर, गोविंद पाटील, साकरे, जतीन जडे, अभिषेक गाठीबांधे, गौरव गजघुमे आदी कामगार उपस्थित होते.

# संजय गांधी निराधार योजनेचे ३०० अर्ज निकाली

■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. १७ :

हिंगणा तालुक्यातील असंख्य गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. आज दिनांक 15/10 २०२५ रोजी तहसील कार्यालयात पार पडलेल्या संजय गांधी निराधार योजना समितीच्या दुसऱ्या सभेत तब्बल 300 अर्ज निकाली काढण्यात आले.

या महत्वाच्या सभेला समितीचे तालुका अध्यक्ष नरेंद्र वाघ, नायब तहसीलदार मेश्राम साहेब, सदस्य दादाराव मुडे, हरिचंद्र अवचट रमेश ढोक प्रविनभाबडा जयराम जाभळे तसेच सौ. विमलताई मोहिततकर श्रावण जुनगरे चेतनलाल पांडे हे उपस्थित होते. या



निर्णयामुळे ज्येष्ठ नागरिक, विधवा महिला, दिव्यांग तसेच समाजातील वंचित घटकांना तात्काळ शासकीय मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

अनेक अर्जदारांना वारंवार तहसील कार्यालयाची पायरी चढावी लागत होती. मात्र आजच्या निर्णयामुळे अर्जांची प्रलंबित प्रकरणे निकाली निघाल्याने अर्जदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. अर्जदारांना तातडीने मदत पोहोचवली जाईल याची हमी समिती अध्यक्ष नरेंद्र वाघ व सदस्यांनी दिली.

हिंगणा तालुक्यातील ही घडामोड शासन योजनांच्या अंमलबजावणीतील एक मोठे पाऊल मानले जात आहे. या निर्णयामुळे अनेकांना सामाजिक व आर्थिक आधार मिळणार असून, नागरिकांत समाधानाचे वातावरण आहे.

# आंबेडकरी आंदोलन दडपण्याचा डाव

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

प्रभाग १ नारा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल पार्क या मागणीसाठी मागील ३८० दिवसांपासून सुरू असलेल्या उपोषण आंदोलनावर प्रशासनाने अचानक कारवाई केली. आशी नगर झोनचे सहाय्यक आयुक्त हरीश राऊत व जरीपटका पोलिस निरीक्षक शिरसाट यांच्या उपस्थितीत मनपा कर्मचाऱ्यांनी पोलिस बंदोबस्तात येऊन बुलडोझरने उपोषण स्थळी उभारलेला पेंडाल पाडला.

लीलाबाई साळवे, जिजाबाई रामटेके, भिमराव तेलंग, दिलीप जनबंधू, अजय खोब्रागडे, बोनी वालदे, सुनीता सांगोळे, वत्सलाबाई बेले, अलकाताई रक्षित, यमुनाताई रामटेके व वनिताताई वालदे हे कार्यकर्ते उपोषणाला बसले होते. कार्यकर्त्यांनी सांगितले की कोणतीही



नारा येथे उपोषण स्थळावर बुलडोझर कारवाई

पूर्वसूचना न देता केलेली ही कारवाई अन्यायकारक असून प्रशासनाने आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला आहे. या घटनेची खबर लागताच उत्तर नागपूरातील शेकडो आंबेडकरी कार्यकर्ते घटनास्थळी दाखल झाले. कार्यकर्त्यांनी पोलिस निरीक्षक शिरसाट यांना निवेदन दिल्यानंतर पोलिस ताफा मागे घेण्यात आला.

मंगेश नागदेवे यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल पार्क नारा येथे उभारला जाणार असून हा भव्य पार्क सर्व समाजासाठी सुविधा-संपन्न असणार आहे. परंतु काही धनाढ्य बिल्डरांच्या नजरेत ही जमीन असल्याने सरकार त्यांच्याकडे झुकत आहे. म्हणूनच ही कारवाई करण्यात आली. या कारवाईचा सर्वत्र निषेध होत असून लवकरात लवकर नियोजित ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल पार्क बांधण्याची मागणी करण्यात आली.या वेळी वामन सोमकुवर, नितीन नागदवणे, विशाल मेश्राम, गोल्डी डोंगरे, संजय फुलझेले, गौतम पाटील, सुबोध साखरे आदी उपस्थित होते.

## ३९५ लिटर डिझेलचा अवैधसाठा जप्त

नागपूर : गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा शाखेच्या पथकाने गोपनिय माहितीच्या आधारावर वाठोडा ठाण्यांतर्गत एका घरावर धाड टाकून ३९५ लिटर डीझेलचा अवैधसाठा जप्त केला. आरोपीने डीझेल हे ज्वलनशिल पदार्थ असल्याचे माहिती असतानाही डीझेलचा साठा करून स्वतःच्या जीवितासह वस्तीतील लोकांचा जीवही धोक्यात घातला होता. पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपीला ताब्यात घेतले आहे. सचिन संतोष बेनीबागडे (२७) रा. आराधनानगर असे आरोपीचे नाव आहे. सचिन हा डीझेलचा काळाबाजार करीत असून त्याने आपल्या घरी मोठ्याप्रमाणात अवैधरित्या ज्वलनशिल पदार्थाचा साठा करून ठेवला असल्याची माहिती सामाजिक सुरक्षा शाखेला मिळाली होती. या माहितीच्या आधारावर रात्री ९.४५ वाजताच्या सुमारास सचिनच्या घरावर धाड टाकण्यात आली.

# सावनेर येथे वर्षावास समापन सोहळ्याचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. १७ :

सालाबादप्रमाणे यंदाही सावनेर खापा रोड येथील पंचशील बौद्ध विहार येथे येत्या १९ तारखेला २७ वा वर्षावास समापन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे पंचशील बौद्ध विहार येथील भदन्त शिलरक्षीत महाथेरो यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले १८ तारखेला महापरीत्रण पाठ व धम्मदेसना, १९ तारखेला सकाळी भिक्षु संघाचा हस्ते ध्वजारोहण नंतर सुत्रपाठ, भोजनदान भिक्षु संघास, धम्मप्रवर्चन, चिवरदान, अष्टपुरस्कार व सायंकाळी उपासक उपासिकांना भोजनदान असे कार्यक्रमाचे स्वरूप राहणार आहे

कार्यक्रमाचे उद्घाटक श्रीलंका येथील आरोग्या फाऊंडेशन जानुनदागामा चे अध्यक्ष पुज्य भंदत उनपान अरिया धम्म महाथेरो यांच्या हस्ते करण्यात येणार आहे तर कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी कोलोंबो येथील श्री नालंदारामया महाविहार चे पतिरांगोडा महारागामा असतील यावेळी पुज्य भदेत संघानंद महाथेरो, नागपूर पुज्य भदंत प्रियदर्शी महाथेरो नागपूर, पुज्य भदंत धम्मसेन महाथेरो, येनिकोनी पुज्य भदंत बोधानंद महाथेरो बुद्धभुमी, पुज्य भदंत प्रज्ञाज्योती महाथेरो बुद्धभूमी खैरी यांच्यासह पंचविस भुक्खूसंघाचे भन्तेजी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचा जयत तयारी करीता सम्यक सार्वजनिक वाचनालय, बहुउदेशीय महिला मंडळ, सावित्रीबाई फुले महिला मंडळ पंचशील नगर सावनेर हे मोलाचे सहकार्य करीत असुन या वर्षावास समापन सोहळ्याला उपासक उपासिका संघ यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन भिक्षू शिलरक्षित महाथेरो यांनी केले आहे.

## १२१९ वाहन चालकांवर कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकुण १२१९ वाहन चालकांवर कारवाई करून ३,२९,४०० रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ३ व एनडीपीएस अन्वये १ अशा ४ प्रकरणात १० आरोपींवर कारवाई करून ३,६४,२९५ रुपयांचा माल जप्त केला. तसेच महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ३ प्रकरणात १५ आरोपींवर कारवाई करून १३,२९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहनचालकांनी वाहन चालविताना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.

## दुकानातून १२ लाखांची रोकड चोरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

अज्ञात आरोपीने मध्यरात्रीला एका ईलेक्ट्रिकल्स दुकानात प्रवेश करून ड्राव्हरमध्ये ठेवलेली १२ लाखांची रोकड चोरून नेली. ही खळबळजनक घटना कोतवाली ठाण्यांतर्गत घडली. या घटनेने परिसरातील दुकानदारांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. पोलिसांनी मनोजकुमार विषणदास खत्री (५६) रा. बालाजी इन्क्लेव्ह, नाईक रोड, तुळशीबागच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

खत्री यांचे महालच्या गांधी गेट परिसरात माधव ईलेक्ट्रिकल्स नावाने दुकान आहे. मंगळवारी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास ते दुकानाला कुलूप लावून घरी गेले होते. मध्यरात्रीला अज्ञात चोराने दुकानाच्या छतावरील टिन वाकवून आत प्रवेश केला. दुकानाच्या ड्राव्हरमध्ये ठेवलेली १२ लाखांची रोकड चोरी करून पसार झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी खत्री दुकान उघडण्यासाठी आले असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# सेंट क्लारेट स्कुलचा खेलो इंडिया वुमेन्स वुशू स्पर्धेत शानदार विजय

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

अलीकडेच नागपूर येथील वीरांगना राणी अवंतिबाई क्रीडा संकुल, कोराडी येथे पार पडलेल्या खेलो इंडिया वुमेन्स वुशू लीग स्पर्धेत सेंट क्लारेट स्कूलच्या खेळाडूंनी अत्यंत प्रभावी कामगिरी करत एकूण ७ पदकं पटकावली.

या मानाच्या स्पर्धेत शाळेच्या खेळाडूंनी २ रौप्य व ५ कांस्य पदकं जिंकत आपली छाप सोडली असून शाळेचं नाव उज्ज्वल केलं आहे. कोमल पांडे, ओवी जाधव यांनी रौप्य पदक जिंकले तर कांस्य पदक साची शेवडे, हंसिका यादव, ईशा डाखोले. आराध्या देवळे, कृतिका मांडे यांनी मिळविले.



सर्व खेळाडूंनी आता झोनल स्तरावरील खेळो इंडिया वुमेन्स वुशू स्पर्धेसाठी आपली जागा निश्चित केली आहे, ही शाळेसाठी अभिमानाची बाब आहे. विजेत्या खेळाडूंनी त्यांच्या यशाचं श्रेय शाळेचे प्राचार्य फादर मार्टिन डिसोझा, मॅनेजर फादर फ्रान्सिस, फादर डायोनिस, सर्व सिस्टर, मुख्य प्रशिक्षक सुमित नागदवने, शिक्षकवर्ग तसेच पालकवर्ग यांना दिलं आहे.सेंट क्लारेट स्कूलचा हा यशस्वी खेळप्रदर्शन भविष्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी नक्कीच आश्वासक मानला जात आहे.

# जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात वेदिक गणित कार्यशाळेचे यशस्वी आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १७ :

येथील जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात गणित विभागाच्या वतीने वेदिक गणित कार्यशाळेचे यशस्वीपणे आयोजन प्राचार्य डॉ. संजय टेकाडे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. या कार्यशाळेचे आयोजन गणित विभाग प्रमुख डॉ. अविनाश नागपुरे आणि प्राध्यापिका ऐश्वर्या गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून डॉ. ऋषी अग्रवाल, डॉ. पितांबर गायकवाड, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. नरेंद्र घारड, डॉ. गजानन झाडे, डॉ. अविनाश इंगोळे प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयीची आवड निर्माण करून वेदिक गणिताच्या माध्यमातून जलद गणना, तार्किक विचार आणि सर्जनशीलता विकसित करणे हा होता. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर पाहुण्यांचा सत्कार, विद्यापीठ गीत आणि गणित विषयावरील प्रेरणादायी भाषणांचा मनमोहक अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला.प्रा. प्रणाली कामटवार यांनी प्रमुख पाहुणे डॉ. ऋषी अग्रवाल यांची ओळख करून दिली. त्यांच्या प्रभावी व्याख्यानातून विद्यार्थ्यांना वेदिक गणितातील सूत्रांची सखोल माहिती मिळाली. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयी नवचैतन्य निर्माण झाले असून अशा उपक्रमांमुळे शैक्षणिक वातावरण अधिक समृद्ध होत असल्याचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे यांनी आपल्या भाषणात नमूद केले.कार्यक्रमाचे संचालन प्रा. ऐश्वर्या गावंडे यांनी तर आभार प्रा. अश्विनी शेंडे यांनी मानले.

# झाडे भेट देऊन वाढदिवस साजरा



■ महासागर प्रतिनिधी
वानाडोंगरी, दि. १७ :

हिंगणा तालुक्यातील वाघधरा येथील रॉयल गायत्री पार्क २ मध्ये राहणाऱ्या कुटुंबातील सदस्य अमोल वासु व त्यांचा मुलगा स्वराशं वासु यांचा वाढदिवस झाडे भेट देऊन साजरा करण्यात आला. वाढदिवसाच्या या शुभप्रसंगी प्रफुल्ल पाटनकर यांनी एक झाड भेट देऊन उपस्थितांना सांगितले की, प्रत्येक सण-उत्सवाला किंवा वाढदिवसाला काहीतरी उपहार देण्याऐवजी एक झाड भेट देणे हे मानव जीवनासाठी अत्यंत उपयुक्त आहे. झाड हे अमूल्य आहे. जसे आंधळेपणाने झाडांची कत्तल होत असल्यामुळे पर्यावरणाला अपार हानी पोहोचते आहे, तसेच त्याचे वाईट परिणाम मानवी जीवनावरही दिसून येत आहेत.

जर आपण अशा आनंदाच्या क्षणांमध्ये प्रत्येकाने एक झाड लावले, तर ते मानवी जीवन आणि पर्यावरणासाठी अत्यंत लाभदायक ठरेल. या प्रसंगी सोसायटीमधील रहिवासी तसेच आजूबाजूच्या भागातून आलेले महिला, पुरुष व लहान मुले मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आपला परिवार या सामाजिक संस्थेचे स्नेहसंमेलन संपन्न



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १७ :

आपला परिवार या कौटुंबिक व सामाजिक संस्थेचे स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाचे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर कामगार प्रशिक्षण केंद्र आकारनगर येथे आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, अधिक्षक अभियंता जयंत कोकाटे होते. तर बिएसएनएलचे उपव्यवस्थापक नरेंद्र गवईकर, एमसिडीचे विभागीय अधिकारी हेमंत वाघमारे , जिल्हा उघोग केंद्राचे अधिक्षक महेंद्र मानके, म.रा.विद्युत मंडळाचे कार्यकारी अभियंता हेमराज ढोके, पाली भाषा अभ्यासक डॉ.सविता सुमेध कांबळे, दैनिक सकाळचे निवासी संपादक प्रमोद काळबांडे, सामाजिक कार्यकर्ते दुर्योधन ढोणे, कार्यकारी अभियंता संजय शृंगारे, आपला परिवारचे अध्यक्ष फकिरचंद्र तायडे, कविवर्य प्रा.हृदय चक्रधर, संस्थेचे प्रमुख संघटक सुखदेवराव मनोहरे, ॲड. दिनेश तायडे.वंचितचे शहर अध्यक्ष मंगेश वानखडे,आपला परिवारचे उपाध्यक्ष गोपालराव इंगळे, कोषाध्यक्ष भानुदास गवई, सहसचिव साहेबराव ढोणे व ज्येष्ठ पत्रकार लिलाधर दाभे विचारमंचावर उपस्थित होते.

सर्वप्रथम ज्येष्ठ-नागरिक, गुणवंत विद्यार्थी व सेवानिवृत्त कर्मचारी व आपला परिवारचे अध्यक्ष फकिरचंद्र तायडे यांचा पाहुण्यांच्या हस्ते शाल,स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.यानंतर डॉ. सविता कांबळे यांनी धम्म व पाली भाषा यावर प्रकाश टाकला.तर हेमंत वाघमारे व महेंद्र मानके यांनी तरुणांना नोकरीच्या मागे न धावता उद्योगाकडे वळून उद्योजक बनण्याचे आवाहन केले.

तसेच नरेंद्र गवईकर, हेमराज ढोके व प्रमोद काळबांडे यांनी सामाजिक ऐक्यावर मनोगत व्यक्त केले. दुर्योधन ढोणे यांनी परिवाराच्या पुढील कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आपला परिवारचे अध्यक्ष फकिरचंद्र तायडे यांनी केले. तसेच त्यांनी आपला परिवार या सामाजिक संघटनेच्या उद्देशांची सविस्तर माहिती दिली. संचालन विनायक इंगळे गुरुजी यांनी तर आभार सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुरेश काळबांडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विठ्ठल काळबांडे, भिमराव काळे, रामचंद्र काळबांडे, सुशांत शृंगारे, भिमराव इंगळे, रुपचंद अवसरमोल, दिनेश भा. तायडे व आपला परिवार संस्थेच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

# मांगलीकरांचा कचरा रस्त्यावर; ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष...

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. १७ :

प्रत्येक गाव स्वच्छ असावे असे शासनाकडून मोठा गाजावाजा करण्यात येतो. गाव स्वच्छ राहिले तर आरोग्य सदृढ राहते असे नेहमीच आरोग्य विभागाकडून सुद्धा सांगितले जाते. गावातील ग्रामपंचायत प्रशासनच ढीम्म, व कामात कामचुकार पना करीत असेल तर गावातील प्रशासन कोणत्या कामाचे? याचाही विचार आता मांगली येथील जनता करू लागली आहे. मुख्य रस्त्यावर काही नागरिक घरातील कचरा फेकत असताना येथील स्थानिक प्रशासन डोळ्यावर पट्टी बांधून घेत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. याकडे खंडविकास



अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन तात्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

मांगली (तेली) हे गाव मुख्य रस्त्यावर असल्याने हा मुख्य रस्ता केदामेढी ते मौदा येथे जोडल्या गेला आहे. मांगली गावात पोहचले की. गावातील मुख्य रस्त्यालगत काही नागरिक घरातील केर कचरा फेकतात. जेथे कचरा फेकल्या जातो त्याच मुख्य रस्त्यावर सरपंच यांचे निवासस्थान सुद्धा आहे. हा सर्व प्रकार त्यांच्याही लक्षात असताना त्यांना का म्हणून दिसत नाही. अशी चर्चा गावात रंगत आहे. या कचऱ्यामुळे इतकी दुर्गंधी पसरली की येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना नाकावर रुमाल किंव्हा तोंडावर नाकावर हात ठेऊन अवागमन करावे लागते, कचऱ्याच्या दुर्गंधी मुळे गावात रोगराई पसरायला वेळ लागणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ग्रामपंचायत कुठल्याच प्रकारचे पाऊल उचलत नसल्याचे दिसून येते.

मांगली तेली येथे अनेकदा याठिकाणी विविध पक्षातील नेत्यांनी येथील ग्रामपंचायत मध्ये सत्ता भोगली आहे. परंतु मुख्य रस्त्याच्या कडेला अनेक शेजारी राहत असून ज्या ठिकाणी कचरा ठाकल्या जातो त्यांठिकाणी स्थानिक ग्रामपंचायतने कचरा गोळा करण्यासाठी कचराकुंड्या ठेवल्या नाहीत. त्यामुळे येथील रहिवाशांना कचरा टाकण्यासाठी ठराविक जागा उपलब्ध नसल्याने कचरा रस्त्याच्या शेजारी टाकला जात आहे. तसेच ग्रामपंचायतीकडूनही हा कचरा उचलला जात नसल्याने जागोजागी कचऱ्याचे ढीग साचले. त्यामुळे या भागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. रस्त्यांच्या शेजारील काही मोकळ्या जागी कचराकुंड्या नसल्यामुळे नागरिकांना नाईलाजास्तव घनकचरा मोकळ्या जागेत टाकावा लागतो. कित्येक दिवस तो कचरा उचलला जात नाही, अशी स्थानिक नागरिकांची मागणी आहे.

### कोल इंडिया इंटर-कंपनी पॉवरलिफ्टिंग, वेटलिफ्टिंग आणि बॉडीबिल्डिंग स्पर्धा २०२५-२६

# डब्लूसीएल संघ ठरला विजेता, एसईसिएलएस संघ ठरला उपविजेता

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

कोल इंडिया इंटर-कंपनी पॉवरलिफ्टिंग, वेटलिफ्टिंग आणि बॉडीबिल्डिंग स्पर्धा २०२५-२६" १४-१६ ऑक्टोबर २०२५ दरम्यान वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड मुख्यालयात आयोजित करण्यात आली होती.डब्लू सी एल संघ विजयी ठरला, तर एस ई सिएल एस संघ ठरला उपविजेता.

एससीसीएल चे श्रीनिवास रेड्डी यांना स्पर्धेत "मिस्टर कोल इंडिया" हा किताब देण्यात आला. डब्लू सी एल चे मोहितराम अंदवन यांनी कोल इंडियाचे स्ट्राँग मॅन, डब्लू सी एल च्या सुश्री हिरामणी मंडल यांनी कोल इंडियाचे स्ट्राँग वुमन हा किताब जिंकला आणि एम सी एल चे रवींद्र बेहरा यांनी कोल इंडियाचे सर्वोत्कृष्ट लिफ्टर हा किताब जिंकला. या प्रसंगी, सि आय एलचे वरिष्ठ अधिकारी आणि अर्जुन आणि द्रोणाचार्य पुरस्कार विजेते विजय मुनीश्वर यांना विशेष सन्मान देण्यात आला. या स्पर्धेत सर्व सीआयएल उपकंपन्यांमधील खेळाडूंनी सहभाग घेतला.




स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी झालेल्या समारोप आणि बक्षीस वितरण समारंभात सीआयएलचे सीएमडी, जे.पी. द्विवेदी प्रमुख पाहुणे होते. वेस्टर्न कोलफिल्ड्स लि. संचालक (वित्त), बिक्रम घोष, संचालक (मानव संसाधन), डॉ. हेमंत शरद पांडे आणि मुख्य दक्षता अधिकारी,अजय मधुकर म्हेत्रे हे विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते.

आपल्या भाषणात सीएमडी जे.पी. द्विवेदी यांनी सांगितले की पॉवरलिफ्टिंग आणि वेटलिफ्टिंगसारखे खेळ शारीरिक आणि मानसिक बळकटीसाठी आवश्यक आहेत. असे मत व्यक्त केले. संचालक डॉ.हेमंत शरद पांडे यांनी स्वागत भाषण केले.आणि सर्व विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले. त्यांच्या भाषणात, सुकाणू समितीचे सदस्य.सी.जे.जोसेफ यांनी विजेते आणि उपविजेत्यांना शुभेच्छा दिल्या. सर्व विजेत्या खेळाडूंना पाहुण्यांच्या हस्ते पदके आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडच्या सुकाणू समितीचे सदस्य. सी.जे.जोसेफ आणि एस.आर. गाबाले तसेच कल्याण मंडळाचे सदस्य या कार्यक्रमात प्रमुख उपस्थित होते.

# सीबीएसई शाळांना दिवाळी, ख्रिसमस व उन्हाळी सुट्ट्या देणे अनिवार्य

## शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे निर्देश



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १७ :

नागपूर जिल्ह्यातील सर्व सीबीएसई शाळांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या १५ सप्टेंबर २०२५ च्या परिपत्रकानुसार दिवाळी, ख्रिसमस व उन्हाळी सुट्ट्या अनिवार्यपणे देणे आवश्यक असल्याचे पुनश्च निर्देश देण्यात आले आहेत. सीस्वा संघटनेच्या योग्य मागणीला न्याय देत शिक्षण विभागाने १५ ऑक्टोबर २०२५ रोजी नवे परिपत्रक जारी केले आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या १५ सप्टेंबर २०२५ च्या परिपत्रकानुसार, नागपूर जिल्ह्यातील सर्व शाळांना दिवाळी सुट्टी १८ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२५ पर्यंत देऊन ३ नोव्हेंबरपासून शाळा पुन्हा सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, काही सीबीएसई शाळांनी या सूचनांचे उल्लंघन करत धनत्रयोदशीच्या दिवशीसुद्धा शाळा सुरू ठेवून केवळ २८ सप्टेंबरपर्यंतच सुट्ट्या जाहीर केल्याचे निदर्शनास आले.

या पार्श्वभूमीवर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी नवीन परिपत्रकाद्वारे सर्व सीबीएसई तसेच इतर सर्व माध्यमिक शाळांना समान नियम लागू असल्याचे स्पष्ट केले आहे. नवीन परिपत्रकानुसार – दिवाळी सुट्टीः १८ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२५ ख्रिसमस सुट्टीः २२, २३, २४ व २५ डिसेंबर २०२५ उन्हाळी सुट्टीः (रविवार व सार्वजनिक सुट्ट्या वगळून) ठराविक कालावधीत देणे अनिवार्य या निर्णयासाठी १२ फेब्रुवारी २०२० रोजी सीबीएसईच्या डेप्युटी सेक्रेटरी (ॲफिलिएशन) यांचे जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांना पाठविलेले पत्र, २४ जुलै २०२५ रोजी विभागीय शिक्षण उपसंचालकांचे पत्र, तसेच ६ सप्टेंबर २०२५ रोजी सीबीएसई स्कूल स्टाफ वेल्फेअर असोसिएशनच्या अध्यक्षा दीपाली महेश डबली यांनी केलेल्या मागणीपत्राचा संदर्भ घेण्यात आला आहे.

# स्वयंचलित सोलर पॅनल झटका मशिनचे राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांचे हस्ते वितरण

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १७ :

शेतकऱ्यांच्या पिकांचे वन्य प्राण्यांपासून संरक्षण व्हावे या उद्देशाने डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास समिती, खुमारी, वनपरिक्षेत्र कार्यालय रामटेक यांच्या वतीने गावातील शेतकऱ्यांना स्वयंचलित सोलर पॅनल झटका मशीनचे वाटप दि. १६ ऑक्टोबर ला करण्यात आले. ही मशीन ७५ टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आली.

यावेळी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी आपल्या भाषणात सांगितले की, शेतकऱ्यांचे पिक वाचवणे हेच खरी सेवा आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्यांच्या समस्या कमी करण्याचे प्रयत्न सुरू ठेवले जातील. यात गावातील एकूण ३० शेतकऱ्यांना स्वयंचलित सोलर पॅनल झटका मशीनचे वितरण करण्यात आले.



यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल शिंदे, माजी जि.प. सदस्य संजय झाडे, क्षेत्र सहाय्यक मुनेश्वर गोंडीमेश्राम, समिती अध्यक्ष अनिल डुमरे, समाजसेवक शैलेश भागडकर, ग्रामपंचायत सदस्या रंजना नारनवरे, तसेच पोलीस पाटील कन्हैया भरडे उपस्थित होते.याप्रसंगी गावातील नागरिक व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# व्हाईस ऑफ मिडिया संघटनेच्या सचिवपदी सचीन लिडर यांची नियुक्ती

■ महासागर प्रतिनिधी, सावनेर, दि. १७ :

व्हाईस ऑफ मिडिया या संघटनेचा सावनेर तालुका अध्यक्ष सुधाकर बागडे यांनी तालुका सचिव पदावर सचिन शंकर लिडर यांची नियुक्ती केली आहे.

लिडर हे अनेक सामाजिक, धार्मिक व सफाई कामगार संघटनेचा पदावर कार्यरत आहेत. उनकी नियुक्ति पर अनुप पठाणे आशीष गोडबोले, सुरेश मधुमटके, दशरथ मतेल आशीष नकासे रेखा मतेल विक्की हजारे व दिक्षा गिरगुसे यांनी अभिनंदन केले.



# टेकाडी शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. १७ :

टेकाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत जीवन मुंगले मित्र परिवार सेवा प्रतिष्ठान तर्फे विद्यार्थ्यांना या पवित्र पर्वाच्या शुभ मुहूर्तावर शालेय साहित्याचे वितरण प्रतिष्ठानचे प्रवर्तक मा. जीवन मुंगले यांचे शुभ हस्ते करण्यात आले.



शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी भाजप नेते, रामटेक जिल्हा उपाध्यक्ष मा.संजय भाऊ मुलमुले तर प्रमुख अतिथी प्रतिष्ठाणचे संस्थापक मा. जीवन मुंगले, पत्रकार किशोर वासाडे, शाळेच्या शिक्षिका जयश्री चवरे, कन्हान मंडल भाजप अध्यक्ष बिरेंद सिंग, टेकाडी (को.ख.) सरपंच विनोद इनवाते, उपसरपंच जितेंद्र चव्हाण उपस्थित होते. याप्रसंगी पं स सदस्य नरेश मेश्राम, अविनाश कांबळे, सुरेंद्र बुधे, लाखेश्वर वासाडे, विलास हूड, कुणाल वासाडे, कन्हान नगरपरिषद माजी नगरसेवक राजेंद्र शेंद्रे, मनोज कुरड कर, नगरसेविका सुषमा चोपकर, अनिता पाटील, संगिता खोब्रागडे, शैलेश शेळके आणि सेवा प्रतिष्ठाण चे पदाधिकारी उपस्थित होते.

माणुस ज्या समाजात जन्माला येतो त्या समाजा प्रति त्यांचे कर्तव्य, एक सामाजिक बांधिलकी, जबाब दारीने सामाजिक ऋण फेडण्याच्या सार्थ उद्देशाने प्रेरित होऊन गरीब व गरजवंत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी व निरंतर शिक्षणाचा प्रवास सुरू राहण्या करिता सेवा प्रतिष्ठान तर्फे शैक्षणिक साहित्याची मदत करण्यात येत असल्याचे सेवा प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष व भाजप मा. लोकसभा विस्तारक मा. जीवन मुंगले हयांनी प्रास्तविकातुन मनोगत व्यक्त करतांना संबोधित केले. प्राथमिक विभागाच्या गरजु व गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्या अंतर्गत कंपास स्कुल बॅग, बूट वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीचा हात पुढे केल्याबद्दल किशोर वासाडे यांनी प्रतिष्ठानचे धन्यवाद व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन नीलकंठ मस्के यांनी तर उपस्थितांचे आभार शिक्षिका जयश्री चवरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विलास हुड, मंगेश काठोके, विशाल सातपैसे, विलास सावरकर आदींनी सहकार्य केले.

# ट्रकच्या धडकेत मजुराचा मृत्यू

**नागपूर :** ट्रक चालकाच्या निष्काळजीपणामुळे एका मजुराला त्याचा जीव गमवावा लागला. ही दुर्दैवी घटना नंदनवन पोलिस ठाण्यांतर्गत खरबी चौकाजवळ घडली. बरसन सिरमोर (४२) रा. धरमनगर, भरतवाडा रोड असे मृताचे नाव आहे. खरबी चौकाजवळ ललित पौनिकर यांचे धान्य गोदाम आहे. या गोदामात बरसन हमाल होता. बुधवारी दुपारी ३.३० वाजताच्या सुमारास ट्रकमधून धान्याचे पोते खाली उतरवत होते. या दरम्यान ट्रक क्र. एमएच-०४/केएफ-१२६७ च्या चालकाने त्याचे वाहन निष्काळजीपणे मागे घेतले. माल उतरवत असलेल्या बरसन याला जबर धडक लागली. दोन्ही ट्रकमध्ये अडकून तो गंभीर जखमी झाला.

# श्री साई ताज पॉलिटेक्निकमध्ये वाचन प्रेरणा दिन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १७ :

दुगधामना येथील श्री साई ताज पॉलिटेक्निकमध्ये भारताचे माजी राष्ट्रपती, महान वैज्ञानिक आणि युवकांचे प्रेरणास्थान डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिनाचा कार्यक्रम पार पडला. व्यासपिठावर संस्थेचे चेअरमन उदय टकाडे, प्राचार्य श्रीकृष्ण विश्वकर्मा उपस्थित होते. सर्वप्रथम डॉ. कलाम यांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन आणि पुष्पांजली अर्पण करण्यात आली. डॉ. कलाम यांनी आयुष्यातील अडचणींना कधीही आड येऊ दिले नाही.

ते साधारण कुटुंबातून येऊनही असामान्य यश प्राप्त करणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे जीवन प्रत्येक विद्यार्थ्यांनी शिकवते की जर मनात दृढ इच्छाशक्ती आणि ध्येयाबद्दल निष्ठा असेल तर कोणतेही स्वप्न अशक्य नाही.विद्यार्थ्यांनी डॉ. कलाम यांच्या आदर्शांना जीवनात अंगीकारावे आणि राष्ट्रनिर्माणात सक्रिय सहभाग घ्यावा. प्राचार्य श्रीकृष्ण विश्वकर्मा यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की वाचन हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून विचारांना परिष्कृत करण्याचे आणि आत्मविश्वास वाढविण्याचे माध्यम आहे. भूषण तितरमारे, दीपक वासनिक, साहिल वासनिक ,जय लाटाये या विद्यार्थ्यांनी डॉ. कलाम यांच्या संघर्षमय जीवन, विनम्रता आणि वैज्ञानिक दृष्टीकोनावर वाचन सादर केले. संचालन प्रा.दीपा चौरसिया यांनी तर आभार प्रा. काजल कात्रे यांनी मानले. यावेळी प्रा. काजल कात्रे, प्रा.दीपा चौरसिया, प्रा.वृषाली सोनेकर, मनीषा उपरे, प्रतीक शेरे, प्रा.केतकी साठवणे, प्रा.आरती रागीट, प्रा.निधी गोसावी, कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# विद्युत कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी इन्सुलेटेड सेफ्टी शूज उपलब्ध

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

मध्य रेल्वे, नागपूर विभागाच्या ट्रॅक्शन डिस्ट्रिब्यूशनविभागाने कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. विभागाने एकूण 160 जोडी डायइलेक्ट्रिक (इन्सुलेटेड) सेफ्टी शूज खरेदी केले आहेत, ज्यामध्ये प्रत्येक टॉवर वॅगनसाठी 10 जोडी शूज वाटप केले आहेत. हे विशेष डिझाइन केलेले शूज 30 पर्यंत विद्युत धारोसापून संरक्षण प्रदान करतात, जे कर्मचाऱ्यांना 25 'ओव्हरहेड इलेक्ट्रिफिकेशन प्रणालीखाली देखभाल व दुरुस्ती काम करताना विद्युत झटक्यांपासून जास्तीत जास्त सुरक्षितता देतात. या इन्सुलेटेड शूजच्या वापरामुळे कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढेल आणि



कार्यस्थळावरील सुरक्षा मानकांमध्येही सुधारणा होईल. ही पुढाकार नागपूर विभागाच्या रेल्वे कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबतच्या बांधिलकीचे उदाहरण आहे. विभागीय रेल्वे व्यवस्थापक विनायक गर्ग यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपाय कार्यस्थळावरील सुरक्षा प्रथम या तत्त्वाला अधिक बळकट करतो. यामुळे विद्युत देखभाल कामांमध्ये सहभागी कर्मचाऱ्यांना सुरक्षिततेचा विश्वास मिळेल आणि ते निश्चिंतपणे आपले काम पार पाडू शकतील.

# १.८९ लाखाच्या मालावर डल्ला

**नागपूर :** कुटुंब बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात आरोपीने घरफोडी करीत रोकड व सोन्याच्या दागिन्यांसह एकूण १ लाख ८९ हजार रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना प्रतापनगर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी मनोज रामभाऊ अमिने (६१) रा. बेलतरोडीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. मनोज यांचे मोठे भाऊ हेमंत (६४) हे प्रतापनगरच्या प्रियदर्शिनीनगर परिसरात राहतात. गत ५ ऑक्टोबरच्या सायंकाळी ते कुटुंबासह मुलीकडे मुंबईला रवाना झाले. जाण्यापूर्वी त्यांनी मनोज यांना घराकडे लक्ष देण्यास सांगितले होते. १५ ऑक्टोबरच्या सकाळी मनोज त्यांच्या घरी पोहोचले असता दाराचे कुलूप तुटलेले होते. कपाटही उघडे होते आणि लॉकरमधील रोख ५ हजार आणि सोन्याचे दागिने असा एकूण १.८९ लाखाचा माल गायब होता. त्यांनी घटनेची माहिती भावाला देऊन पोलिसात तक्रार दाखल केली.

# जवाहरलाल नेहरू हायस्कूलचा संघ राज्यस्तरावर

■ महासागर प्रतिनिधी, सावनेर, दि. १७ :

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नागपूर व सॉफ्टबॉल संघटना यांचे संयुक्त विद्यमाने विभागीय सॉफ्टबॉल स्पर्धा धनवटे नॅशनल कॉलेज नागपूरच्या प्रांगणात आयोजित करण्यात आल्या त्यात सतरा वर्षे मुले वयोगटात जवाहरलाल नेहरू हायस्कूल सावनेर अंतिम सामन्यात नूतन भारत विद्यालय नागपूरच्या 09-01 होम रन्सने धुवा उडवीत" प्रथम "येऊन राज्यस्तरीय स्पर्धेकरता पात्र ठरला.

यात अंकित सूर्यवंशी (कर्णधार )वेदांत माळेकर, वेदांत वैष्णव, वंश पारधी रोहित बोबडे ,रोहन ताजने,यश नेवारे मंथन ठाकरे, मंथन मिरासे, भावेश पटे, भावेश वानखेडे, अथर्वभूतमारे, अंश जुमडे ,स्वरित कोहळे हे सर्व खेळाडू मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय सॉफ्ट बॉल स्पर्धेत सहभागी होतील. शाळेत शाळा समितीच्या सदस्यांची सभा संपल्यानंतर सर्व यशस्वी खेळाडूंचे शाळेच्या वतीने शाळेचे शाळा समिती अध्यक्ष तथा शाळेचे मा. पालक संचालक ॲड. चंद्रशेखर बरेठीया, शाळा समिती



सदस्य माजी नगराध्यक्ष ॲड. अरविंद लोधी, शाळा समिती सदस्य अशोकराव दुबे शाळेच्या मुख्याध्यापिका कमल बु-हान, शिक्षक सदस्य सतीश चौधरी, क्रीडाशिक्षक योगेश बन, शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

तसेच आमदार डॉक्टर आशिष बाबू देशमुख यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन त्यांचे कौतुक केले. सर्व खेळाडू विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील व क्रीडाशिक्षक योगेश बन व सर्व शिक्षकांना दिले.

# कामठी शहर महिला अध्यक्षपदी ईरसत सिद्दिकी यांची नियुक्ती

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. १७ :

कामठी मौदा विधानसभेचे नेते आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष सुरेश भोयर यांनी मला कामठी शहर महिला अध्यक्ष म्हणून नियुक्त करून एक नवीन जबाबदारी दिली. मी या मोठ्या जबाबदारीला निष्ठेने न्याय देण्याचा नक्कीच प्रयत्न करेन. असे ईरशाद सिद्दिकी यांनी मत व्यक्त केले.

या नियुक्तीबद्दल इसरत सिद्दिकी यांनी माजीमंत्री सुनील केदार, रामटेक लोकसभा खासदार श्यामकुमार बर्वे, अखिल भारतीय महिला काँग्रेस अध्यक्षा अलका लांबा, प्रदेशाध्यक्षा संध्या सावळखे, जिल्हा महिला अध्यक्षा कुंदा राऊत यांचे आभार मानले. याप्रसंगी सविता रंगारी, राजेश बनसिंगे, सुमेध रंगारी, कॉंग्रेसचे पदाधिकारी उपस्थीत होत्या.



# ४ महिलांसह ६ दारूविक्रेते हद्दपार

**नागपूर :** नागरिकांना दिवाळी आनंदात साजरी करता यावी आणि परिसरात कायदा सुव्यवस्था कायम राखण्याच्या उद्देशातून परिमंडळ क्र. ५ चे पोलिस उपायुक्त निकेतन कदम यांनी झोन अंतर्गत येणाऱ्या विविध ठाण्यांच्या हद्दित अवैधरित्या दारूची विक्री करणाऱ्या ६ दारूविक्रेत्यांना ४ महिन्यांकरिता जिल्ह्यातून हद्दपार केले आहे. यामध्ये चार महिलांचाही समावेश आहे. दीपाली चंद्रशेखर पराते (३३) रा. नवी मंगळवारी, भारती अनिल खरे (३५) रा. इंदिरानगर, शारदा प्यारेलाल चव्हाण (५५) रा. भीमनगर, लक्ष्मी नीलकमल सुखदेवे (४०) रा. कुंभारे कॉलनी, कामठी, गोविंदा विठ्ठोबाजी बावणे (३९) आणि ईश्वर मोतीराम तडस (५०) दोन्ही रा. बिनाकी मंगळवारी अशी हद्दपार केलेल्या आरोपींची नावे आहेत. आरोपींविरुद्ध यशोधरानगर, जरीपटका, नवीन कामठी ठाण्यात अवैध दारूविक्री, भांडण व शिविगाळ केल्यावरून अनेक गुन्ह्यांची नोंद आहे. वारंवार प्रतिबंधक कारवाई करूनही त्यांच्यात कोणतीही सुधारणा होत नव्हती. त्यामुळे तिन्ही ठाण्यांच्या पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध तडीपारीचा प्रस्ताव तयार करून पोलिस उपायुक्त कदम यांच्याकडे पाठवला होता.

# डिकन्स्ट्रक्टने डर्मेटॉलॉजिस्ट्सच्या साथीने सर्वात मोठे स्किनकेअर लाइव्हस्ट्रीम म्हणून गिनिज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये केला विक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

डिकन्स्ट्रक्ट स्किनकेअर हा विज्ञानाधारित ब्रँड आपल्या अत्यंत परिणामकारक, तरीही मृदू या तत्वासाठी ओळखला जातो. नुकत्याच पार पडलेल्या २४ तासांच्या डर्मेथॉन या पहिल्यावहिल्या उपक्रमाच्या माध्यमातून त्यांनी गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये सर्वात मोठे स्किनकेअर लाइव्हस्ट्रीम म्हणून नवा विक्रम नोंदवला आहे.

राष्ट्रीय स्तरावरील त्वचेच्या काळजी संदर्भातील शैक्षणिक उपक्रम म्हणून साकारण्यात आलेल्या डर्मेथॉनच्या माध्यमातून मोठ्या शहरांपासून अगदी लहान नगरांपर्यंत प्रत्येकाला इंटरनेटच्या माध्यमातून तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हा मूळ उद्देश होता. या 24 तासांच्या उपक्रमात डॉ. अनुप्रिया गोयल, डॉ. नेहा सोळंकी, डॉ. आदित्य वलिंगकर, डॉ. राधिका तिवारी, डॉ. देवेंद्र, डॉ. राशी सोनी आणि डॉ. विदेही अशा अनेक डर्मेटॉलॉजिस्टचा समावेश होता. यात ॲक्ने, पिगमेंटेशन, सूर्यकिरणांपासून संरक्षण, घटकांबद्दलची माहिती आणि सुरुवातीच्या टप्प्यातील दैनंदिन सवयी अशा त्वचेची काळजी घेण्यासाठीच्या विविध मुद्द्यांचा समावेश होता. यूट्यूब लाइव्ह चॅटच्या माध्यमातून प्रेक्षकांनी तज्ज्ञांशी रिअल टाईम संवाद साधला. या मुक्त आणि थेट संवादामुळे खऱ्या अर्थाने त्यांना त्वचेची काळजी घेण्यासाठी नवा मार्ग सापडला.



या यशाबद्दल डिकन्स्ट्रक्ट स्किनकेअरच्या संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मालिनी अदापुरेड्डी म्हणाल्या, डर्मेथॉन ही आमच्यासाठी फार महत्त्वाची घटना आहे. गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड्स मध्ये नोंद झाली हे कारण आहेच. शिवाय, देशभरातून मिळालेल्या अतुलनीय प्रतिसादाने आम्ही भारावून गेलो आहोत.

स्किनकेअरचे क्लिष्ट विज्ञान सोपे करण्यात, ते वापरता यावे असे बनवण्यात आणि तज्ज्ञांचे ज्ञान आणि रोजचा वापर यातील दरी कमी करण्यात डर्मेटॉलॉजिस्ट फार महत्त्वाची भूमिका बजावतात. मोठ्या प्रमाणावरील, तज्ज्ञांचे मार्गदर्शन असलेला उपक्रम स्किनकेअरमध्ये दीर्घकालीन विश्वासाचे नाते निर्माण करू शकतो, या आमच्या विश्वासाला या संवादामुळे पाठबळ मिळाले आहे. भारतात स्किनकेअर क्षेत्र विकसित होताना विज्ञानाधारित मार्गदर्शन केंद्रस्थानी आणण्याची आमची बांधिलकीही यातून अधिक दृढ झाली आहे.

# गाडगेबाबांना भारतरत्न द्या

## केंद्रीयमंत्री रामदास आठवले यांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. १७ :

तेजस संस्थे तर्फे गाडगेबाबांना भारतरत्न देण्यासाठी जोरदार मोहीम राबवत आहे. आज, १६ ऑक्टोबर २०२५ रोजी, नागपूरमधील दीक्षित नगर येथे हॉस्पिटल उद्घाटनप्रसंगी केंद्रीय मंत्री रामदास आठवले आले होते त्यांची वेळ घेऊन संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर अरगुलेवार, उपाध्यक्ष देविदास पेटारे, संस्थाचे कानूनी सल्लागार आणि माजी सरकारी वकील विलास राऊत, सदस्य अर्जुन उपासे, नागपूर हंसापुरी नवयुवक बहुउद्देशीय संस्थाचे सचिव कैलाश चौधरी, सामाजिक कार्यकर्ता रेखा पाटील, सामाजिक कार्यकर्ता सविता पांडे, संत गाडगेबाबा समिती महासंघ मध्य प्रदेशचे सुधाकर निंबुलकर, सामाजिक कार्यकर्ता ज्ञानेश्वर बोरकर, सामाजिक कार्यकर्ता तारेश दुरुगकर, सामाजिक कार्यकर्ता भास्कर गिरडे, उद्घाटन हॉस्पिटलचे संचालक डॉ. मनोज मेश्राम, त्यांचे मोठे बंधू संजय मेश्राम यांच्या उपस्थितीत, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांना तेजस संस्था तर्फे पुष्पगुच्छ देऊन सम्मानित केले आणि गाडगेबाबांना भारतरत्न प्रदान करण्यांत यावे.



२३ फेब्रुवारी रोजी सुट्टी जाहीर करावी, स्वच्छ भारत अभियानच नाव गाडगेबाबांच्या नावाने करा, या विषयावर संस्थाचे वतीने केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांना निवेदन देण्यात आले. आठवले साहेबांनी निवेदनला स्वीकार करून निवेदन ला पूर्णपणे वाचले आणि म्हणाले गाडगेबाबाला भारतरत्न अगोदरच भेटायला पाहिजे होते. मग कुठेतरी समाजाची कमी असल्यामुळे आतापर्यंत गाडगेबाबाला भारतरत्न भेटले नाही ही खूप मोठी शोकांतिका आहे.

याबद्दल मी संसदेत चर्चा करून मागणीला उचलणार आणि प्रधानमंत्रीला विनंती करणार की गाडगेबाबाला भारतरत्न सन्मानाने सन्मानित करावा 23 फरवरीला सुट्टी घोषित करावा आणि स्वच्छ भारत अभियानाच्या नाव गाडगेबाबा च्या नावावर करावा, हे मागणी मी शान साद मध्ये उचलणार असा आश्वासन रामदास आठवले साहेबना दिले संस्थातर्फे आठवले साहेबांचे खूप खूप आभार मानले.

# महाज्योतीच्या भव्य इमारतीचे भूमिपूजन रविवारी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांची उपस्थिती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेली महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर आता एका नव्या पर्वात प्रवेश करीत आहे. ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी प्रवगार्तील विद्यार्थ्यांसाठी ज्ञान, प्रशिक्षण आणि आत्मनिर्भरतेचा दीप प्रज्वलित करणाऱ्या या संस्थेच्या ७ माळ्याचे प्रशासकीय इमारत आणि १२ माळ्याचे प्रशिक्षण केंद्राच्या भव्य वास्तूचे भूमिपूजन येत्या रविवारी १९ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४.३० वाजता होणार आहे.



या भूमिपूजन सोहळ्याचा शुभारंभ राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी भूषविणार आहेत. शुक्रवारी आयोजित पत्रकार परिषदेत महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मा. मिलिंद नारिंगे यांनी सांगितले की, महाज्योती ही केवळ संस्था नसून सामाजिक परिवर्तनाचा दीपस्तंभ आहे. नव्या वास्तूमुळे प्रशिक्षण, संशोधन आणि विद्यार्थ्यांसाठी सर्वांगीण सुविधा अधिक प्रभावीपणे राबवता येतील.

भूमिपूजन कार्यक्रमाला प्रमुख उपस्थितीत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री तसेच महाज्योतीचे अध्यक्ष मा. अतुल सावे, आणि वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार मंत्री मा. ॲड. आशिष जयस्वाल यांचा समावेश आहे. तर विशेष अतिथीमध्ये खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार अभिजीत वंजारी, सुधाकर अडबाले, डॉ. परिणय फुके, कृपाल तुमाने, संदीप जोशी, डॉ. नितीन राऊत, कृष्णा खोपडे, प्रविण दटके, मोहन मते, विकास ठाकरे, समिर मेघे, चरणसिंग ठाकूर, आशिष देशमुख, संजय मेश्राम आदींची उपस्थिती लाभणार आहे. याशिवाय, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलिस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंगल, मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, एनएमआरडीएचे महानगर आयुक्त संजय मिणा, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी हे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहतील. संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव मा. ए. बी. धुळाज (भा. प्र. से.), महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मा. मिलिंद नारिंगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मा. प्रशांत वावगे, तसेच प्रकल्प संचालक मा. कुणाल शिरसाठे यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. महाज्योतीने गेल्या काही वर्षांत राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि आत्मनिर्भरतेची दिशा दिली आहे. या नव्या इमारतीमुळे समाजाला अधिक सक्षम करण्याच्या प्रयत्नांना नवी गती मिळेल, असे शेवटी मा. मिलिंद नारिंगे यांनी सांगितले.

### ७ मजली प्रशासकीय इमारत आणि १२ मजली प्रशिक्षण केंद्र होणार

महाज्योती संस्थेच्या स्वप्नवत प्रकल्पाचा आज नवा टप्पा सुरू झाला आहे. राज्यातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, प्रशिक्षण आणि संशोधनासाठी उभारली जाणारी ही दोन भव्य इमारती ७ माळ्याची प्रशासकीय इमारत आणि १२ माळ्याचे महात्मा ज्योतिबा संशोधन व प्रशिक्षण केंद्र व वसतीगृहाचे यांचे बांधकाम नागपूर सुधार प्रन्यास (एनआयटी) मार्फत होत आहे. या संपूर्ण प्रकल्पाचा अंदाजे खर्च ११४ कोटी रुपये असून, महाज्योतीच्या कार्यक्षमतेत आणि सेवाक्षमतेत अभूतपूर्व वाढ घडवणारा हा पायाभूत उपक्रम ठरणार आहे.

# गिट्टीचा ट्रक सोडविण्यासाठी मागितले चार हजार

## सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यासह लिपीकास अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

ओव्हरलोडचे चालान असलेल्या ट्रकला सोडविण्यासाठी चार हजार रुपयांची लाच घेणाऱ्या ग्रामीण प्रादेशिक परिवहन कार्यालयातील सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यासह कनिष्ठ लिपिकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने शुक्रवारी (ता.१७) सायंकाळी रंगेहाथ अटक केली. अनुप सानप असे ग्रामीण प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याचे तर मोहन दिवटे असे कनिष्ठ लिपिकाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरटीओकडून काही दिवसांपूर्वी एका ट्रकवर ओव्हरलोड गिट्टी नेत असल्याने कारवाई करीत ५० हजार ७५० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. त्यानंतर ट्रक सोडविण्यासाठी मालकाकडून आरटीओ कार्यालय गाठून त्याने चालानची रक्कम भरून ट्रक सोडविण्याची विनंती केली. मात्र, सानप यांनी मोहन दिवटे या कनिष्ठ लिपिकाच्या मदतीने तो ट्रक क्रॉसिंग न करता सोडविण्यासाठी पाच हजार रुपयांची मागणी केली. यावेळी तक्रारकर्ता चार हजार रुपये देण्यास तयार झाला. मात्र, याविरोधात त्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. तक्रारीची शहानिशा करीत पोलिस अधीक्षक डॉ. दिंगबर प्रधान, अपर पोलिस अधीक्षक माधुरी बाविस्कर, विजय माहुलकर, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजकिरण येवले, जितेंद्र वैरागडे, हवालदार भरत ठाकूर, शिपाई हेमराज गांजरे, दिपाली भगत, होमेश्वर वाईलकर, राजेंद्र जांभुळकर यांनी सापळा रचला. शुक्रवारी सायंकाळी मोहन दिवटे याने चार हजार रुपये स्वीकारताच त्याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने अनुप सानप यांच्या सांगण्यावरून पैसे घेतल्याची माहिती दिली. त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून अटक केली.

# रामटेक येथे राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १७ :

आपला शहर स्वच्छ व सुंदर व्हावं हे प्रत्येक शहरवासी यांचे एक स्वप्न आहे. आपला लोकप्रतिनिधी म्हणून हे स्वप्न पूर्ण करणं माझं आद्यकर्तव्य आहे. आणि त्या अनुषंगाने माझे अविरतकार्य चालले, त्याचाच एक भाग म्हणून रामटेक शहरातील विविध ठिकाणी विकास कामाची सुरुवात करून त्याचा दिनांक १६ ऑक्टोबर २०२५ रोजी भूमिपूजन व लोकार्पण सोहळा राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते पार पडला. लवकरच हे विकास कामे पूर्ण होऊन याचा फायदा शहरवासी यांना होणार आहे. असे प्रतिपादन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी केले.



नगर परिषद स्विमिंग पूल चे नूतनीकरण व आधुनिकरण करणे,अंबाळा वॉर्ड येथे तेली समाज धर्मशाळा ते सितारामदासजी स्वामी आश्रम पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधकाम, न.प. मठकर प्राथमिक शाळा येथे पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणेकरीता खोली बांधकाम करणे,अंबाळा येथे गुरुद्वारा ते अंबाला तलाव पर्यंत आर.सी.सी. ड्रेन चे बांधकाम करणे,आझाद वार्ड येथे संजय बांगडकर ते सुनील चौधरी यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. ड्रेन चे बांधकाम करणे, नगरपरिषद क्षेत्रातील संपूर्ण वार्डाकरिता आवश्यक ठिकानी पेवर्स चे कामे करणे, महात्मा फुले वार्ड येथे चंदू कामठे ते सुरेश नागोसे यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. ड्रेन चे बांधकाम करणे, आझाद वार्ड येथे आदिवासी होस्टेल ते अशोक बर्वे यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. ट्रेनचे बांधकाम करणे, सुभाष वार्ड येथे संजू शेंडे ते कुरेशी यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. नाली कवरचे बांधकाम करणे,शिवाजी वार्ड येथे गंगाधर पडोळे ते रमजान शेख यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. ट्रेन कवरचे बांधकाम करणे,सुभाष वार्ड येथे सजू लेंडे ते कुरेशी याच्या घरापर्यंत आर.सी.सी. नाली कवरचे बांधकाम करणे,आझाद वार्ड बाहत्तर घरकुल येथील अशोक बर्वे ते वासुदेव राऊत यांच्या घरापर्यंत बीटी रोडचे बांधकाम करणे.

रामाळेश्वर वार्ड येथे कैलाश खड्से ते आनंद हटवार ते होंडा शोरूम आर.सी.सी. ड्रेन व रोड चे बांधकाम करणे,राजाजी वार्ड येथील मानकर हॉटेल ते प्रशांत प्रिंटींग प्रेस पर्यंत बीटी रोडचे बांधकाम करणे,सुभाष वार्ड येथील संत रोहिदास समाज भवन समोरील बीटी रोडचे बांधकाम करणे, राधाकृष्ण वार्ड येथे ताई गोळवलकर कॉलेज ते पोलीस स्टेशन येथे आर.सी.सी. ट्रेन कवरचे बांधकाम करणे,श्री अठराभुजा मंदिर परिसर विकास बांधकाम करणे व संत गोरोबा काका चौक या कामांचा समावेश आहे.

# रेशीमबागमध्ये तीन दिवसीय दिवाळी महोत्सव

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :

प.पू. नाना महाराज तराणेकर इंदुर संस्थान यांच्या मार्गदर्शनाखाली श्री दत्त जयंती हिरक महोत्सव व डॉ. बाबासाहेब तराणेकर अमृत महोत्सवी वर्षानिमित्त, अखिल भारतीय त्रिपदी परिवार, नागपूर शाखेतर्फे तीन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रेशीमबाग येथील संत तुकाराम उद्यानात होणार असून, या प्रसंगी आमदार मोहन मते प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

पहिल्या दिवशी, रविवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.३० वाजता श्रीदत्तयाग संपन्न होणार आहे. दीपावलीच्या मंगल वातावरणात सर्व भक्तांनी या पवित्र यज्ञात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. नरकचतुर्दशीच्या निमित्ताने, सोमवार, दि. २० ऑक्टोबर रोजी पहाटे ५.३० वाजता कीर्तन पहाट हा विशेष कार्यक्रम होणार असून, ते स्व. प्रदीप केशव पलांदुरकर यांना समर्पित आहे. या कीर्तनात ह.भ.प. विश्वासबुवा पाचपोर यांचे कीर्तन होईल. त्यांना तबल्यावर श्रीरंग नारदखानी आणि संवादिनीवर प्रशांत उपगडे साथसंगत करणार आहेत.

लक्ष्मीपूजनाच्या शुभपर्वावर, मंगळवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी पहाट वारा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, तो स्व. श्रीमती अनिता अरविंद बैतुले यांना समर्पित आहे. या कार्यक्रमात हिंडोल पेंडसे, स्वस्तिका ठाकूर, निलेश सावरकर आणि प्राची मुळे हे गायक कलाकार आपली कला सादर करणार आहेत. त्यांना राहुल मानेकर, उदय राजकारणे, आशिष सुपारे, निशिकांत देशमुख आणि श्रीकांत मारवडकर वाद्यवृंदावर साथ करणार आहे. कार्यक्रमाचे संगीत संयोजन रवी सातफळे, तर सूत्रसंचालन किशोर गलांडे करणार आहेत.अतिथी गयक किशोर कुमार फेम सागर मधुमटके आवर्जून उपस्थित रहाणार आहे. या संपूर्ण कार्यक्रमासाठी श्री जगदंबा माता देवीस्थान रेशीमबाग, कलासंगम व केशव नगर सांस्कृतिक सभा यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

















